साप्ताहिक
संस्थापक
साने गुरुजी
साधना
Date of issue
शनिवार,
२० जानेवारी २०१८
मूल्य रु.४०
(एकूण पृष्ठे : ८४)



साहित्य

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार २०१७

समाजकार्य





महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार निवडीचे निकष

मराठी ललित किंवा वैचारिक साहित्याच्या क्षेत्रांत आपल्या आयुष्यभराच्या कार्याने मोलाची भर घालणाऱ्या साहित्यिकाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्याचा सन्मान करण्यासाठी दोन लक्ष रुपये आणि मानचिन्ह असा एक जीवनगौरव पुरस्कार दिला जातो.
दरवर्षी ललित किंवा वैचारिक यांपैकी एकाच विभागात हा पुरस्कार दिला जातो.
या जीवनगौरव पुरस्कारासाठी नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या जातात.

जीवनगौरव : ललित साहित्याच्या संदर्भात...

▶ ज्यांच्या साहित्यातून मानवी स्वातंत्र्य, समता, न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाची जाणीव व्यक्त झाली आहे.
▶ ज्यांच्या साहित्यातून मानवी जीवनाचे समर्थ दर्शन घडविले गेले आहे.
▶ ज्यांच्या साहित्यातून सार्वकालीन व सार्वजनिक मूल्यांचा आविष्कार झालेला आहे.
▶ ज्यांच्या साहित्यामुळे मराठी साहित्याच्या संचितात मोलाची भर पडली आहे किंवा ज्यांचे साहित्य मराठी साहित्याच्या इतिहासात महत्त्वाचे ठरले आहे.

जीवनगौरव : वैचारिक साहित्याच्या संदर्भात...

इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, राजकारण, अर्थशास्त्र, विज्ञान, साहित्य-संशोधन व समीक्षा यांसारख्या वैचारिक क्षेत्रांत ज्यांच्या मराठी लेखनामुळे महत्त्वाची भर पडली आहे.
▶ त्या त्या क्षेत्रात ज्या साहित्यिकांनी निःस्पृह वृत्तीने व निर्भयपणे तात्त्विक सत्याचा शोध घेतला आहे.
▶ ज्यांची जाणीव मानवी स्वातंत्र्य, समता व न्याय यांच्या प्रस्थापनेसाठी सामाजिक परिवर्तनाच्या प्रेरणेने उद्युक्त झाली आहे.
▶ मराठी समाजाच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने ज्यांचे लेखन महत्त्वाचे ठरले आहे.

ग्रंथांसाठी पुरस्कार :

समकालीन मराठी साहित्याला प्रोत्साहन म्हणून तीन मराठी ग्रंथांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचे पुरस्कार दिले जातात. पुरस्कार दिल्या जाणाऱ्या वर्षालगतच्या मागील तीन वर्षातील पुस्तकांचा विचार केला जातो. या वर्षी जानेवारी २०१४ ते डिसेंबर २०१६ या तीन वर्षांतील पुस्तके विचारात घेतली आहेत.

रा. शं. दातार नाट्य पुरस्कार

नाटक या प्रकारासाठी २००३ सालापासून हा पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार महाराष्ट्र फाउंडेशनतर्फे दिला जातो. एखाद्या महत्त्वाच्या सामाजिक समस्येविषयी आशयसंपन्न नाट्यकृती सादर करण्यात मोलाचा वाटा असणाऱ्या नाट्यकर्मीला हा पुरस्कार देण्याची योजना आहे.

समाजकार्य पुरस्कार

१९९६ पासून 'समाजकार्य पुरस्कार योजना' सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान करावा या हेतूने हे पुरस्कार सुरू केले.
समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन, संरक्षण तसेच परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य, दलितांचे प्रश्न आणि जातीय सलोखा या क्षेत्रांतील व्यक्तींना प्रत्येकी पन्नास हजार रुपयांचा कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो.

२००५ पासून समाजबदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. दोन लाख रुपये व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.
या गौरव पुरस्कारासाठी व्यक्तींच्या नावाचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या.
१.ज्या व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्ये रुजवण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहेत.
२.पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत.
३.ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणीवा वाढत आहेत आणि अन्यायाविरुद्ध झगडण्याची त्यांची ईर्ष्या जागृत होत आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनच्या कोणत्याही पुरस्कारासाठी अर्ज करावे लागत नाहीत. निवड समित्यांचे सदस्य त्या त्या क्षेत्रांतील जाणकारांशी चर्चा करून प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील निवड समितीला करतात आणि त्यातून अंतिम निवड केली जाते.

Invest in future of those
with no future...
So they can reinvest




महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)
साहित्य व समाजकार्य पुरस्कार २०१७

संयोजन
केशव गोरे स्मारक ट्रस्ट (मुंबई) आणि साधना ट्रस्ट (पुणे)



महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) साहित्य व समाजकार्य पुरस्कार २०१७

अनुक्रम

Date of Issue
२० जानेवारी २०१८
वर्ष ७० / अंक : २३

संपादक :
विनोद शिरसाठ

सहयोगी संपादक मंडळ :
अभय टिळक,
अतुल देऊळगावकर,
मनोहर जाधव,
रझिया पटेल

मुखपृष्ठ मांडणी :
गिरीश सहस्रबुद्धे

अंकनिर्मिती व्यवस्थापक व अक्षररचना :
सुरेश माने

मुद्रितशोधन :
मिलिंद बोरकर

हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., पुणे येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
Ph.: (020) 24451724
Mob.: 7028257757
weeklysadhana@gmail.com
web.weeklysadhana.com







साधना मीडिया सेंटर
(पुस्तकविक्री विभाग)
Ph.: (020) 24459635

वार्षिक वर्गणी :
एक वर्षासाठी : ७०० रुपये
दोन वर्षासाठी : १४०० रुपये
तीन वर्षासाठी : २१०० रुपये

नाव, पत्ता, फोन नं व इ-मेल इत्यादी तपशील कळवून रोख/म.ऑ./डी.डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, वर्गणीची रक्कम साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, खाते क्र. 60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र, बाजीराव रोड शाखा, पुणे येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल/फोन करून कळवावेत.

(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

हा विशेषांक
केशव गोरे स्मारक ट्रस्ट (मुंबई)
यांच्या वतीने वाचकांना
भेट देण्यात आलेला आहे.



स्थापण्या समता शांती ठेवुनी शुद्ध साधनां ।
करिती साधना त्यांना ठेवो उत्स्फूर्त साधना ।।

रौप्य महोत्सवाच्या उंबरठ्यावर

अमेरिकेत स्थायिक झालेल्या मराठी माणसांनी स्थापन केलेल्या महाराष्ट्र फाउंडेशन या संस्थेच्या वतीने, १९९४ पासून साहित्य क्षेत्रातील तर १९९६ पासून समाजकार्य क्षेत्रातील व्यक्तींना वा संस्थांना त्यांच्या उल्लेखनीय व अनुकरणीय कामासाठी पुरस्कार देऊन गौरविले जाते. म्हणजे साहित्य पुरस्कारांचे हे २४ वे तर समाजकार्य पुरस्कारांचे हे २२ वे वर्ष आहे. आत्तापर्यंतच्या २४ वर्षांत, साहित्य व समाजकार्य या दोन्ही क्षेत्रांत मिळून ३१० पुरस्कार प्रदान केले गेले आहेत. या विशेषांकाच्या शेवटी आतापर्यंतच्या सर्व पुरस्कारप्राप्त व्यक्ती, संस्था व संघटना यांची यादी दिलेली आहे. त्या यादीवरून ओझरती नजर टाकली तरी किती विविध प्रकारातील व विविध सामाजिक स्तरांतील व्यक्ती, संस्था वा संघटना यांना पुरस्कार दिले गेले आहेत याचा अंदाज येईल. आणि अर्थातच मराठी साहित्य व महाराष्ट्रातील समाजकार्य या दोन्ही क्षेत्रांत या पुरस्कारांमुळे किती लोकांना प्रेरणा, पाठिंबा, व प्रोत्साहन मिळाले असेल याचीही कल्पना येईल. या सर्व प्रक्रियेत सातत्य राहिले आणि या पुरस्कारांचा दर्जा व विश्वासार्हता कायम राहिली यात अनेक घटकांचा सहभाग राहिला आहे. अर्थातच, अनेकविध घटकांचे सहकार्य व सहभाग मिळवण्यासाठी, या पुरस्कारांचे प्रवर्तक सुनील देशमुख यांनी आपली ऊर्जा सातत्याने खर्ची घातली आहे. त्यांनी केवळ पुरस्कार सुरू करून दिले असे नाही, तर दरवर्षी पुरस्कारांची कार्यवाही यथायोग्य पद्धतीने होत राहील यावर लक्ष ठेवून या प्रक्रियेत सहभागी असलेल्या सर्व घटकांची स्वायत्तता जपण्याबाबतही ते जागरूक राहिले आहेत. परिणामी महाराष्ट्र फाउंडेशनचे हे पुरस्कार रौप्यमहोत्सवी वर्षाच्या उंबरठ्यावर आहेत.

या पार्श्वभूमीवर, आत्तापर्यंतच्या पुरस्कारांची निवडप्रक्रिया व कार्यवाही आणि त्यातून अपेक्षित साध्य यांचा आढावा घेऊन आवश्यक ते बदल, दुरुस्त्या, सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र फाउंडेशन व संयोजक संस्था विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी चर्चा-मंथन करणार आहेत. त्यामुळे पुढील म्हणजे २५ व्या वर्षीपासून या पुरस्कार प्रक्रियेला नवी झळाळी प्राप्त होईल असा विश्वास वाटतो.

प्रस्तुत विशेषांकात २०१७ या वर्षीचे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत अशा नऊ व्यक्तींच्या मुलाखती आहेत. त्यातून त्या-त्या व्यक्तींची वैचारिक जडणघडण, जीवनविषयक दृष्टिकोन, स्वत:च्या कार्यक्षेत्रावर दृष्टिक्षेप आणि आजच्या समाजजीवनावर भाष्य या चतु:सूत्रीची झलक काहीअंशी तरी अनुभवायला मिळेल. या प्रत्येकाची निवड का केली हे या मुलाखती वाचून सहज कळेल, त्यामुळे त्याविषयी इथे सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु मागील वर्षी हमीद दलवाई यांना मरणोत्तर (त्यांच्या मृत्यूनंतर ४० वर्षांनी) समाजकार्य जीवनगौरव देणे आणि या वर्षी वयाची ९५ वर्षे पूर्ण केलेल्या गंगाप्रसाद अग्रवाल यांना समाजकार्य जीवनगौरव पुरस्कार देणे, याविषयी काही लोकांच्या मनात शंका किंवा संभ्रम निर्माण होणे साहजिक आहे. त्यासंदर्भात थोडक्यात स्पष्टीकरण द्यायचे तर एवढेच म्हणता येईल की, कोणताही पुरस्कार दिला जातो तेव्हा त्या व्यक्तीचा वा संस्था/संघटनेचा गौरव होणे हा अनुषंगिक भाग असतो; त्या व्यक्तीने वा संस्थेने/संघटनेने केलेले वैचारिक व कृतिशील योगदान याकडे समाजमनाचे लक्ष वेधणे आणि त्या प्रकारच्या योगदानाची आवश्यकता अधोरेखित करणे हा त्या पुरस्कारांमागचा प्रधान हेतू असतो. हमीद दलवाई यांनी मुस्लिम समाजातील सामाजिक सुधारणांचा संबंध राष्ट्रीय एकात्मतेशी आणि आधुनिक व धर्मनिरपेक्ष भारत घडविण्याशी जोडला होता, त्याचा काहीसा प्रत्यय या वर्षी (तिहेरी तलाकच्या संदर्भात बरीच सामाजिक घुसळण झाल्याने) आला. अगदी तसेच, गंगाप्रसाद अग्रवाल यांना जीवनगौरव म्हणजे म.गांधींना अभिप्रेत असलेले विचार व कार्य करणाऱ्यांना बळ देणे असा आहे. पुढील वर्षी महात्मा गांधींचे १५० वे जयंतीवर्ष साजरे होणार आहे, त्याचा संदर्भ गंगाप्रसादजींच्या या पुरस्काराशी जोडून पाहिला तर यातील औचित्य कळेल, पटेल!



साहित्य जीवनगौरव पुरस्कार
(स्मृतिचिन्ह व दोन लाख रुपये)

अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार
(स्मृतिचिन्ह व पंचवीस हजार रुपये)


ललित ग्रंथ पुरस्कार
(स्मृतिचिन्ह व पंचवीस हजार रुपये)

रा. शं. दातार नाट्य-पुरस्कार
(स्मृतिचिन्ह व पंचवीस हजार रुपये)



साहित्य पुरस्कारांचे स्वरूप

डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति पुरस्कार
(स्मृतिचिन्ह व एक लाख रुपये)



समाजकार्य पुरस्कारांचे स्वरूप

समाजकार्य जीवनगौरव :
(स्मृतिचिन्ह व दोन लाख रुपये)

कार्यकर्ता पुरस्कार : असंघटित कष्टकरी
(स्मृतिचिन्ह व पन्नास हजार रुपये)

कार्यकर्ता पुरस्कार : प्रबोधन
(स्मृतिचिन्ह व पन्नास हजार रुपये)

कार्यकर्ता पुरस्कार : सामाजिक प्रश्न
(स्मृतिचिन्ह व पन्नास हजार रुपये)



साहित्य जीवनगौरव

अनिल अवचट



खरं सांगू का, तसा मी स्वभावाने भित्रा-बुजरा, पण या बाबतीत मात्र मला भीती वाटली नाही हे खरं बुवा. हे असे लेख सुरू झाले तेव्हा मला काहीजण म्हणायचे की, 'तू हे असं उघड लिहू नको. लिहिलंस तर कुठे तरी लपून बस.' पण मी तसं कधी केलं नाही. लिहिणं हेच माझं सामाजिक काम होतं. मग त्यात आपण पूर्ण निर्भय असायला हवं असं मला वाटायचं. फार फार तर काय होईल? मेलो तर प्रश्नच नाही. पण मारहाण होईल, हात फ्रॅक्चर होईल. किती वेळ लागतो हाड भरून यायला? एक महिना- दीड महिना- जास्तीत जास्त सहा महिने. असं किती वेळा होईल? फार फार तर पाच-सहा वेळा. मग झालंच तसं तर आयुष्यातली तीन-पाच वर्षं त्याला दिली असं मानायचं. असा साधा-सरळ हिशोब होता माझा. त्यामुळे मी निर्धास्तपणे लिहू शकायचो.



अनिल अवचट, पुणे
Mob. 9822061064



दिसलं ते सांगण्याच्या ऊर्मीतून लेखन झालं...

समाजाच्या विविध थरांतल्या विविध मानवसमूहांचं जगणं, त्यांच्या व्यथा, त्यांचे प्रश्न आपल्या लिखाणातून मांडून पांढरपेशा-मध्यमवर्गी वाचकांना सांस्कृतिक धक्का देण्याचं, त्यांचा परीघ विस्तारण्याचं काम अनिल अवचट यांनी केलं. सुरुवातीला विविध नियतकालिकांमधून प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या लेखांची पुढे पुस्तकं झाली. पूर्णिया, माणसं, कोंडमारा, धागे आडवे उभे, प्रश्न आणि प्रश्न, संभ्रम, धार्मिक अशी अवचटांची पुस्तकं म्हणजे समाजाभिमुख पत्रकारितेचा वस्तुपाठ आहेत.

अनिल अवचटांचं सामाजिक विषयावरचं पुस्तक उघडून वाचायला लागलं की आजही एका क्षणात आपण त्या विषयाकडे खेचले जातो. त्यांच्यातला पत्रकार-अभ्यासक प्रत्येक विषयाचे ताणेबाणे समजून घेतो आणि त्यांच्यातला लेखक ती सगळी गुंतागुंत आपल्याला एखाद्या डॉक्युमेंट्रीप्रमाणे उलगडून दाखवतो. आपणही लेखासाठी फिरणाऱ्या अवचटांसोबत आहोत, असं वाटायला लावणारा हा अनुभव. थेट लोकांच्या जगण्याला भिडणारा. तो अनुभव घेताना प्रत्येक वेळी अवचटांच्या लिखाणाबद्दल नव्याने प्रश्न पडतात.

प्रश्न – तुमची पुस्तकं उपेक्षितांचं आजवर दृष्टीआड असलेलं जगणं वाचकांसमोर आणतात. भटके-विमुक्त असतील, हमाल असतील, वेश्याव्यवसायात अडकलेल्या बायका असतील किंवा मच्छीमार असतील. आम्हाला वाटणारी उत्सुकता अशी, की तुम्हाला हे जग कसं दिसू लागलं?

– लहानपणापासूनच माझी सधन मुलांबरोबर मैत्री नव्हती. मी गरीब मुलांमध्येच रमायचो. माझे एक गुरुजी दलित होते. त्यांच्याशी माझं छान जुळायचं. त्यामुळे मी त्यांच्या वस्तीतच असायचो. सुतारांसारख्या कसबी मंडळींभोवती घोटाळायचो. त्यांच्याकडून काही तरी शिकायचा प्रयत्न करायचो. खरं तर मी सधन कुटुंबातला होतो. वडील डॉक्टरच होते ना! पण माझं मन कधी शाळेतल्या अभ्यासात रमलं नाही. पाढे यायचे नाहीत. स्पेलिंगं पाठ व्हायची नाहीत. त्यामुळे मी कायम कुचंबलेला असायचो. त्या न्यूनगंडातूनच मी कदाचित सर्वसामान्य लोकांमध्ये जास्त मिसळू लागलो असेन. जे काही असेल ते, पण अगदी लहानपणापासून तसं होतं खरं.

पुढे कॉलेजसाठी पुण्याला आलो तेव्हाही शहरातल्या झोपडपट्ट्या पाहून चकित झाल्याचं मला आठवतं. आमच्या गावाला गरिबांची वस्ती होती, पण ती घरं मातीची असली तरी घरं असायची. त्यांच्या आजूबाजूला मोकळी जागा असायची. पण इथल्या झोपडपट्ट्यांमध्ये उभं राहायलाही जागा नव्हती. मी पहिली झोपडपट्टी पाहिली ती वडारवाडी. तेव्हा मी त्या भागात नुसता फिरायचो. लोकांना काहीबाही विचारायचो आणि ते विसरूनही जायचो. त्यांच्याबद्दल काही लिहिलं वगैरे नाही. त्यांचं जगणं जाणून घ्यावं, एवढीच प्रेरणा त्या वेळी होती. पुढे सामाजिक चळवळीत ओढला गेलो आणि वेगळं जग सामोरं आलं. त्या जगाने मला मोठेच धक्के दिले. त्यामुळे साहजिकच आपल्याला दिसलेलं हे जग इतरांनाही सांगावंसं वाटू लागलं.

दुसरं असं, की कुतूहल हा माझा एक स्ट्रॉंग पॉइंट आहे. रस्त्याकडेला एखादा म्हातारा बसलेला दिसला की माझ्या मनात प्रश्न घोंघावायला सुरुवात करतात... हा कुठून आला असेल, याच्या घरी कोण असेल, हा कुठे राहत असेल, रात्री थंडी वाजत नसेल का, असे नाना प्रश्न. बरं, प्रश्न पडतात ते पडतात, पण त्यांची उत्तरं शोधण्यासाठी त्या म्हाताऱ्याच्या शेजारी जाऊन त्याची विचारपूस करण्याची मला कधी लाजही वाटली नाही. आजही वाटत



नाही. त्यामुळे कुतूहल शमवताना खूप काय काय नवं कळत जातं.

प्रश्न – तुम्हाला हे आसपासचं जग तेव्हाही दिसत होतं. पण तुम्ही पहिल्यांदा लिहिलंत ते मात्र बिहारला जाऊन तिथल्या परिस्थितीबद्दल. 'पूर्णिया' या पुस्तकात. हे कसं काय? त्याआधी इथल्या विषयांवर लिहावं असं वाटलं नाही का?

– तसं आधी थोडंफार लिहिलं होतं. पण ते कसं होतं... मी मेडिकलला असताना आम्ही मुलं बिहारच्या दुष्काळासाठी पैसे जमवत होतो. कोणी बूटपॉलिश करायचे, कोणी पूनम हॉटेलमध्ये वेटरचं काम करून पैसे मिळवायचे, असं सुरू होतं. तेव्हा आम्हाला खूप चित्रविचित्र अनुभव आले होते. तेव्हा लोकमान्यनगरमध्ये माझ्याशेजारी सकाळ'चे सहसंपादक मो. स. साठे राहायचे. त्यांना मी हा अनुभव सांगत होतो. ते म्हणाले, हे लिहून दे मला. मी त्यांना म्हटलं, अहो, मी कुठे लेखक आहे? मी कसं लिहू? तर ते म्हणाले, आत्ता जे बोललास तेच लिहून दे. तसाच घरी गेलो, लिहून काढलं आणि त्यांना दिलं. मला वाटलं, त्यांच्या एखाद्या लेखात संदर्भ म्हणून ते हा मजकूर वापरतील. पण दुसऱ्या दिवशी माझ्या नावानेच तो लेख छापून आला. तो बहुतेक माझा पहिला लेख. त्या लेखामुळे मला कळलं की लिहिणं म्हणजे काही फार अवघड गोष्ट नव्हे. आपण जे बोलतो तेच लिहायचं. मग 'साधना'तही मी सुरुवातीला थोडंफार लिहिलं, पण लिखाण हा आपला प्रांत आहे असं काही तेव्हा जाणवलं नव्हतं.

मी बिहारला दोनदा गेलो. आधी बिहारमधला दुष्काळ समजून घ्यायला आणि नंतर एस.एम. जोशींसोबत गेलो तेव्हाही लिहायचं डोक्यात नव्हतं. फक्त बघणं आणि समजून घेणं होतं. बिहारच्या पहिल्या भेटीवेळी मी पुण्यातल्या मित्रांना पत्रं पाठवत होतो. ती बरीच सविस्तर असायची. मित्र सांगायचे, आम्ही त्या पत्रांचं जाहीर वाचन करतोय आणि आम्हाला ते खूप आवडतंय. तरीही मी ते अनुभव लिहिले नव्हते. मग नंतर एस.एम. जोशींसोबत भूमिमुक्ती आंदोलनासाठी बिहारमधल्या पूर्णिया जिल्ह्यात गेलो. दारिद्र्य, भूकबळी, गुलामगिरी यांसारखे आधी फक्त वाचलेले शब्द दाहक आकार घेऊन माझ्यापुढे आले. त्याने मी हादरून गेलो. पुण्याला परतल्यानंतर बऱ्याच दिवसांनी मी ते अनुभव लिहायला घेतले. ते 'माणूस'मध्ये छापून आले. पुढे माजगावकरांनीच पुढाकार घेऊन त्याचं पुस्तक केलं. पुस्तकाचं नाव 'पूर्णिया' असलं तरी त्यात दोन्ही बिहारभेटींमधल्या अनुभवांची सरमिसळ आहे. हे असं मिश्रण करता येतं का, ते करणं साहित्याला चालतं का वगैरे असे प्रश्न मला त्या वेळी पडले नाहीत. जे वाटलं ते मी लिहीत गेलो.

प्रश्न – पुढचे विषय कसे दिसत गेले? लिखाण हेच आपलं काम आहे हे कधी लक्षात येऊ लागलं?

– मी मेडिकलला शिकत होतो. पण आपण काही डॉक्टरकी करू शकणार नाही, तो आपला प्रांत नाही, याची जाणीव शिक्षण पूर्ण होण्याआधीच झाली होती. आधी मी 'युक्रांद'मध्ये (युवक क्रांती दल) सक्रिय होतो. नंतर त्यातून बाहेर पडत गेलो आणि बाबा आढावांच्या संपर्कात आलो. त्यांच्या 'एक गाव एक पाणवठा' चळवळीत मी भाग घेतला. हमाल पंचायतीच्या कामातही माझा सहभाग असायचा. त्यामुळे समाजाबद्दलची समज तयार होत होती. वेगवेगळ्या स्तरांतल्या माणसांचं जगणं समोर येत होतं. महाराष्ट्रात कुठेही एखादी अत्याचाराची घटना घडली की तिकडे धाव घ्यायची, तिथे नेमकं काय घडलं हे समजून घ्यायचं, असं माझं सुरू होतं. 'माणस'मधला हमालांवरचा लेख, 'कोंडमारा'मधला बावड्याचा बहिष्कार हा लेख त्यातूनच लिहून झाले. अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा माग मी काढत होतो. समाजातल्या व्यवस्थेत नाडलेल्यांबद्दल मी लिहीत होतो. हमालांवरचा लेख लिहिला, तो 'मौजे'त जसाच्या तसा छापून आला. लोकांना तर तो आवडलाच. पुढे अशिक्षित हमालांसाठी आम्ही त्याचं वाचन केलं, तेव्हा हमाल म्हणाले, माझ्या शेजारच्या डेपोमध्ये हा मिरची कामगार काम करतो, पण त्याचं जगणं इतकं हालाखीचं आहे हे मला माहितीच नव्हतं. आम्हाला आमचेच प्रश्न मोठे वाटत होते. म्हणजे या लेखाने फक्त मध्यमवर्गालाच सेन्सिटाइझ केलं असं नव्हे, तर त्याच समाजातल्या सर्व थरांनाही एकमेकांची माहिती कळली.

मग पुढे हे लिखाणाचं सत्र सुरूच राहिलं. लिहिणं आपल्याला आवडतंय आणि ते जमतंय हे जाणवायला लागलं. मुख्य म्हणजे जे जग आजवर माहितीच नव्हतं ते या लिखाणाच्या निमित्ताने मला दिसत होतं. माझ्यासारखंच समाजातल्या एका मोठ्या वर्गाला ते माहिती नसणार याची खात्री होती. त्यामुळे त्याचं चित्रण करणं हेही एक महत्त्वाचं काम आहे, असं माझ्या लक्षात येत गेलं.



प्रश्न – 'माणसं', 'कोंडमारा', 'धागे आडवे उभे' या पुस्तकांमधले लेख त्या-त्या घटनेमागची किंवा मानवसमूहांच्या जगण्यातली गुंतागुंत उलगडून दाखवतात. तुम्ही त्या समाजाचा भाग नव्हतात, तरीही ती गुंतागुंत तुम्हाला कशी काय लक्षात आली?

– माझं पुणे विद्यापीठात जाणं-येणं असायचं. तिथे गेलो की तिथल्या मित्रांमुळे समाजशास्त्रात तसंच इतर शाखांमध्ये नवं काय चाललंय ते मी समजून घ्यायचो. तेव्हा विद्यापीठीय लिखाणात व्हिलेज स्टडी नावाची एक लाट आली होती. म्हणजे एक गाव घेऊन त्याची सगळी माहिती घ्यायची, सर्व बाजूंनी अभ्यास करायचा. तिथल्या जाती, तिथले व्यवसाय, त्यांच्यातले व्यवहार असं सगळं. मला आठवतं, हिंदीतले प्रसिद्ध लेखक राही मासूम रझा यांचं 'आधाँ गाव' हे पुस्तकही त्याच प्रकारातलं होतं. तेही मी वाचलं होतं. त्या सगळ्याचा माझ्या मनावर नकळत परिणाम झाला असावा. त्या वेळी राम बापट, भास्कर भोळे आणि इतर अनेक लोकांशी मी या विषयावर बोलायचो. समाजातले ताणतणाव, जातिव्यवस्था, त्यातून तयार झालेली गुंतागुत हे सगळं या लोकांनी मला समजावून सांगितलं. त्यातून घटनांकडे बघण्याची माझी दृष्टी विस्तारत गेली. एखादी घटना घडली तर पत्रकाराप्रमाणे ती कशी घडली, घटनाक्रम काय होता, कोण काय म्हणालं हे जाणून घेण्यापेक्षा त्या घटनेपर्यंत परिस्थिती कशी आली हे समजून घेणं हे आपलं काम आहे हे लक्षात आलं. अनेकदा अनेक छोट्या छोट्या घटना घडलेल्या असत. त्या इतरांच्या दृष्टीने अदृश्यच असायच्या, पण त्यांचा एकत्रित परिणाम-उद्रेक म्हणूनच मोठी घटना समोर आलेली असायची. ते समजून घेत गेल्यामुळे माझ्या लिखाणाला पत्रकारितेबरोबरच हा समाजशास्त्रीय दृष्टिकोनही मिळाला. अर्थात हे सगळं तेव्हा कळत नव्हतं. मागे वळून बघताना समाजशास्त्रीय संस्काराचा मुद्दा मला आता लक्षात येतो आहे.

प्रश्न – तुमचे लेख वंचितांची बाजू सांगणारे, त्यांच्यावरच्या शोषणाची-अत्याचाराची पाळंमुळं खणून काढणारे. दलित अत्याचाराच्या घटना असतील किंवा हमाल-निपाणी बिडी कामगारांसारखे लेख, तुम्ही त्या-त्या ठिकाणच्या आरोपींच्या, शोषणकर्त्यांच्या नावांसह लेख छापलेत. कुठे नाव बदलणं नाही की नाव टाळून आरोप करणं नाही. हे धाडस कुठून आलं?

– खरं सांगू का, तसा मी स्वभावाने भित्रा-बुजरा, पण या बाबतीत मात्र मला भीती वाटली नाही हे खरं बुवा. हे असे लेख सुरू झाले तेव्हा मला काहीजण म्हणायचे, की तू हे असं उघड लिहू नको. लिहिलंस तर कुठे तरी लपून बस.' पण मी तसं कधी केलं नाही. माझे सगळे मित्र वेगवेगळ्या सामाजिक कामांत होते, आंदोलनं करत होते. तसं मी काही करू शकत नव्हतो. लिहिणं हेच माझं सामाजिक काम होतं. मग त्यात आपण पूर्ण निर्भय असायला हवं असं मला वाटायचं. फार फार तर काय होईल? मेलो तर प्रश्नच नाही. पण मारहाण होईल, हात फ्रॅक्चर होईल. किती वेळ लागतो हाड भरून यायला? एक महिना- दीड महिना- जास्तीत जास्त सहा महिने. असं किती वेळा होईल? फार फार तर पाच-सहा वेळा. मग झालंच तसं तर आयुष्यातली तीन-पाच वर्षं त्याला दिली असं मानायचं. असा साधा-सरळ हिशोब होता माझा. त्यामुळे मी निर्धास्तपणे लिहू शकायचो.

हां, पण मी कधीही आक्रमकपणे लिहिलं नाही की कुणाबद्दल अपशब्द वापरले नाहीत. जे घडलं ते लिहिलं. त्यामुळे मनात भीती आलीच नाही. मी बुवाबाजी-अंधश्रद्धा वगैरेंबद्दलही लिहिलं. त्या बाबा-माता मंडळींचे शिष्य चिडण्याची शक्यता होती; पण तसं काही झालं नाही. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की त्या वेळी महाराष्ट्रात चळवळींचं वातावरण होतं. नानासाहेब गोरे, एस.एम. जोशी, बाबा आढाव यांच्यासारख्या नेत्यांचा दबदबा होता. अशी मंडळी, त्यांचे कार्यकर्ते माझ्या पाठीशी होते. मी एकटा नाही असं मला वाटायचं. पण आज तसं वातावरण नाही. लोक फार लवकर चिडतात. जात-धर्म-पंथ... नाना गोष्टींवरून लोक हळवे झालेत. त्यामुळे आज कदाचित तसं लिहिता नाही येऊ शकणार.

प्रश्न – आणि तुमच्या ओघवत्या- डॉक्युमेंट्री-





सारख्या भाषेबद्दल काय सांगाल?

– मी पडलो खेड्यातला साधा माणूस. खेड्यात जाडजूड, ग्रांथिक कोणी बोलत नाही. लोक साध्या भाषेत बोलतात. ती भाषा फंक्शनल असते. तिला दृश्यमानता असते. तीच माझी भाषा होती. त्यामुळे साधं, सरळ आणि जसं दिसलं तसं मी मांडत गेलो. मी जे काही वाचलं होतं त्यावरून मी काही शब्द बाद केले होते. मला ती अलंकारिक, बोजड, गुळगुळीत वाक्यं अजिबात आवडायची नाहीत. स्टॉकमधले शब्द-वाक्यं वापरायची नाहीत असं ठरवलं आणि त्यातूनच ही शैली वगैरे तयार होत गेली असावी.

चित्रकार असल्याचाही परिणाम झाला असावा माझ्या लिखाणावर. कोणताही चांगला कलाकार कला साकारताना त्यात वरकड काही ठेवत नाही. प्रिसाइजनेस आणि सेन्स ऑफ प्रपोर्शन ही चांगल्या कलेची लक्षणं आहेत. जसं चित्रकलेचं तसंच लिखाणाचं.

शैलीबद्दल बोलायचं तर आणखी एक गोष्ट हल्ली हल्ली लक्षात येऊ लागली आहे बरं का. त्या काळी मी सिनेमे खूप पाहायचो. तेव्हा 'कॅपिटल' सिनेमामध्ये मॅटिनीला चांगले चित्रपट लागायचे. तिथे उत्तम बंगाली सिनेमे मी पाहिले. सत्यजित रेंचे सिनेमे... अनेक डॉक्युमेंट्रीज पाहिल्या. त्या सगळ्या दृश्य माध्यमाचा माझ्यावर परिणाम झाला असावा असं मला वाटतं. माझ्या लिखाणात दृश्यमयता आहे असं लोक म्हणतात ती कदाचित तिथून आलेली असावी. कॅमेऱ्याला जे दिसतं ते तो आपल्याला दाखवतो. माझंही तसंच होतं काहीसं. मी लेखासाठी कुठेही गेलो की ती गावं, तिथले रस्ते, घरं असं तर नोंदवलंच, पण एका लेखात तर आम्ही उभे होतो तो खडक मुरुमाचा होता, असंही निरीक्षण आलंय. आता हे निरीक्षण मी अनाहूतपणे नोंदवलं होतं. पण पुढे मला आमच्या धोंडे सरांनी सांगितलं, की मुरूम कसा आहे यावरून त्या गावात पाणी आहे की नाही हे कळू शकतं. म्हणजे या निरीक्षण करत जाण्याच्या सवयीतूनच विषयाचे वेगवेगळे पैलूही समजून घ्यायला मदत झाली म्हणा की.

आता वेश्यांवरचा लेख बघा. तिथेही पुण्याच्या बुधवार पेठेतल्या वेश्यांच्या घरांची मी वर्णनं केली आहेत. खोल्यांची अवस्था, तिथल्या भिंतींवर लटकलेल्या तसबिरी, त्या वेश्यांचं बसणं, घरवालीला घाबरणं या सगळ्याची वर्णनं मी करत गेलो. त्यामुळे त्या बायका माझ्याशी फारशा बोलल्या नाहीत तरी त्यांचं जगणं वाचकांपर्यंत पोहोचू शकलं. पण त्यात कुठेही करुण, विदारक असे शब्द नाहीत. आपण वर्णनं अशी करायची की आपल्याला जे म्हणायचंय ते लोकांना शब्द न उच्चारता कळलं पाहिजे.

प्रश्न – पण ही सगळी निरीक्षणं नंतर लेखात नोंदवण्यासाठी तुम्ही त्या त्या वेळी नोट्स काढायचात?

– अजिबातच नाही. अगदी सुरुवातीला तसा प्रयत्न केला; पण लवकरच मला जाणवलं, की आपण ज्या थरातल्या लोकांचं जगणं समजून घेऊ पाहतोय ती मंडळी कागद-पेन पाहिला की बिचकतात, घाबरून जातात. त्यांच्या ज्या काही तक्रारी-गाऱ्हाणी असतील त्या बाजूला ठेवून 'आमचं कुनाहीबद्दल कायबी म्हननं नाही बगा' असं म्हणून टाकतात. हे लक्षात आल्यावर मी कागद-पेन बाजूला ठेवलं. एकदा माझ्या बहिणीने मला परदेशातून एक चांगल्यापैकी टेपरेकॉर्डर पाठवला. तोही मी वापरून पाहिला. पण बोललेलं सगळं पुन्हा ऐकणार कोण आणि त्याचं शब्दांकन कोण करणार? हे म्हणजे प्रचंडच काम होऊन बसलं. मग मी ठरवलं, आपल्या जे लक्षात राहील तेच महत्त्वाचं; जे राहणार नाही ते लक्षात ठेवण्याजोगं नव्हतंच असं मानायचं. आता बघा, एखाद्या गावात किती घरं आहेत वगैरे आकडेवारी कदाचित नाही लक्षात राहणार, पण घटना-दृश्यं लक्षात राहतात. एखाद्या घरात एक चूल, दोन पातेली आणि काही लाकडं होती. बाकी काहीही सामान नव्हतं. एकही डबा नव्हता. हे दृश्य तुम्ही कसं विसराल? मनाला चटका बसलेला असतो त्या दृश्याने. लक्षात राहायचंच ते. माहिती समजून घेतल्यावर किती तरी दिवसांनी, वर्षांनीही मी लेख लिहिलेले आहेत, पण आठवत नाही असं कधी झालं नाही.

लक्षात राहण्याचं आणखी एक कारण होतं. 'मेमरीला रीकॉल'ची गरज असते. नुसत्या नोट्स काढून उपयोग नसतो. त्या मेमरीची उजळणी झाली की ती पक्की होते. कुठेही जाऊन आलो की तिथे काय काय घडलं त्यातल्या महत्त्वाच्या गोष्टी मी सुनंदाला, माझ्या इतर मित्रांना सांगायचो. अनायासे उजळणी व्हायची. लक्षात राहायचं.

प्रश्न – या लेखांच्या निमित्ताने तुम्ही महाराष्ट्रभर चिक्कार फिरलात. तेव्हा असं उठून बाहेर जाऊन, विषय समजून घेऊन लिहिणं असं नव्हतंच. तुम्ही ते कसं जमवलंत? आणि मुख्य म्हणजे पैशा-पाण्याचं काय?

– लिहिणं हे मी माझं काम मानलं होतं. त्यामुळे ज्या विषयावर लिहावंसं वाटतं त्यावर लिहायचो. विषय



मिळाला की जाऊन संपादकांशी बोलायचो. 'साधना'त यदुनाथ थत्त्यांशी, 'माणूस'मध्ये माजगावकरांशी, 'मनोहर'मध्ये दत्ता सराफांशी. पुढे 'मौजे'त श्री.पु. भागवत, राम पटवर्धन यांच्याशी. बहुतेक वेळा त्यांना विषय आवडायचा. कारण त्यावेळी खरोखरच असं फिरून, विषय समजून घेऊन कोणी लिहीत नव्हतं. पण पैसे काही फारसे मिळायचे नाहीत. एकदा मी कुणा तरी संपादकांना म्हणालो, तुम्ही जेवढं मानधन देता त्यातून माझा प्रवासाचा खर्चही निघत नाही. ते म्हणाले, बरोबर आहे. पण बाकी सगळ्या लेखकांचं मानधन एकत्र केलं तर त्याहून तुमचा आकडा जास्त आहे. आता यावर काय बोलणार? मराठी नियतकालिकांची– मराठी समाजाची एकूण परिस्थिती तेवढीच होती. पण लिहिणं ही माझी गरज होती. माझ्यात आणि सुनंदात तसं ठरलंच होतं, की तिने नोकरी करायची आणि मी लिहायचं. त्या वेळी गरजा अतिशय कमी होत्या. एसटीतून सगळीकडे फिरायचो. फक्त कार्यकर्त्यांच्या घरीच राहायचो. ते जे खातील ते खायचो. त्यामुळे खर्च कमी व्हायचा. सुनंदाला पगारातून जेवढे पैसे मिळायचे त्यातून भागायचं आमचं.

प्रश्न – आपल्याकडे लेखकांना एकदा लिखाणाची दिशा मिळाली की ते त्याच दिशेने चालत राहतात. त्यांची एक चाकोरी तयार होते. तुम्ही मात्र सुरुवातीला वंचित–शोषितांवर लिहिलंत, पर्यावरणातले प्रश्न हाताळलेत, व्यक्तिचित्रं लिहिलीत, स्वतःविषयी लिहिलंत, कविता लिहिल्यात. हे कसं काय?

– मी मानवसमूहांवर लिहीत होतो, तेव्हा एकदा कुणी तरी मला विचारलं, काय, मग या दिवाळीत कुणावर लिहिताय? कोणत्या मजुरांवर? मला तो धोक्याचा इशारा वाटला. आता त्याच पद्धतीने लिहीत गेलं तर स्वतःचंच रिपिटिशन होणार हे जाणवलं. मग मी मार्ग थोडा बदलायचं ठरवलं. तिथून वेगवेगळ्या प्रश्नांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे गेलो, त्यांच्या कामाविषयी लिहिलं. विषय तोच, पद्धत वेगळी. त्यातून 'कार्यरत' आलं. आता त्यापुढचं 'कार्यमग्न' येऊ घातलंय. 'प्रश्न आणि प्रश्न'मध्ये मच्छीमारांचे प्रश्न आहेत, खाणकामगारांचे प्रश्न आहेत. फक्त घटना, मानवसमूह यांच्याबद्दल लिहीत बसलो असतो तर ते कंटाळवाणं झालं असतं.

ललित लिखाणही असंच अचानक बाहेर आलं. एकदा मूर्तिजापूरला एका घरी राहिलो असतानाचा मोराचा अनुभव सत्यकथेचे संपादक राम पटवर्धनांना सांगत होतो. ते म्हणाले, 'अहो, किती छान अनुभव आहे हा! लिहा.' माझ्या मनात आलं, आपण तर सामाजिक विषय लिहितो; हे कसं काय लिहायचं? पण त्यांनी आग्रह केला आणि मी लिहिलं. आणि मग तो एक ओघच सुरू झाला. विद्यापीठात जाऊन राम बापटांशी मी किती तरी विषयांवर गप्पा मारायचो. अगदी ओतुरच्या आठवणींपासून आमच्या मुलींपर्यंत. ते सांगता सांगता लक्षात यायचं, की अरे, यात लेख आहे. सामाजिक वास्तवाची शोधाशोध करत होतो तशीच स्वतःच्या आतही शोधाशोध करावीशी वाटू लागली. आपल्याला आलेले अनुभव इतरांसोबत वाटून घ्यावेत असं वाटू लागलं आणि मग 'स्वतःविषयी', 'जगण्यातील काही', 'दिसले ते' ही पुस्तकं आली.

प्रश्न – आज तुम्हाला कोणते विषय खुणावतायत?

– गेल्या काही दिवसांपासून विज्ञानातल्या आश्चर्यांनी मला भारून टाकलं आहे. आपल्या आसपासचे कीटक, पक्षी; एवढंच काय, बॅक्टेरिया, हे सगळं जग किती अद्‌भुत आहे! आता आपलंच शरीर बघा. किती आश्चर्यं दडली आहेत त्याच्यात! ते सगळं समजून घेतोय. समजलेलं वाचकांबरोबर शेअर करतोय. या मालिकेतला एक लेख नुकताच लिहून पूर्ण केलाय– 'मानवी जन्माची गोष्ट'. आईच्या पोटात जलचर असणारा गर्भ बाहेर येतो आणि हवेत मस्तपैकी जगू लागतो, हे आश्चर्य कसं काय घडतं याबद्दलचा. या लेखांचं लवकरच पुस्तक येतंय. 'समकालीन'तर्फे माझ्या चित्रकलेच्या प्रवासावरचं 'माझी चित्तरकथा' हे पुस्तक नुकतंच प्रकाशित झालं. आता सध्या काष्ठशिल्पांच्या प्रवासाबद्दल लिहितोय. असं काय काय सुरू आहे.

दुसरीकडे, चंद्रपूरच्या औष्णिक केंद्रामुळे झालेल्या प्रदूषणाबद्दल लिहावं, पुण्यातल्या कचरा समस्येवर– फुरसुंगीतल्या कचरा सहन करणाऱ्या लोकांवर लिहावं असं वाटतंय. पण त्या त्या विषयात मला एखादा नेमका माणूस भेटावा लागतो. तो त्या विषयाचं मर्म असं काही उलगडून दाखवतो की मग माझी गाडी पुढे विनाधक्का सुरू होते. तसं घडण्याची मी वाट पाहतोय.

संवादक : **सुहास कुलकर्णी, गौरी कानेटकर**

Ph. 020 -24470896

('अनुभव' मार्च २०१५ अंकातून साभार)



समाजकार्य जीवनगौरव
गंगाप्रसाद अग्रवाल



स्थल-काल-परिस्थितीनुसार बदल केला हे फक्त पहिल्या भागापुरते म्हणता येईल. स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग संपला की, आपले कार्य संपले, असे मानणे हे खऱ्या कार्यकर्त्यांचे लक्षण नव्हे! समाजजीवनाचा प्रवाह चालू असतो. नव्या समस्या व नवी आव्हाने निर्माण होतात. त्याला जाणतेपणाने तोंड दिला पाहिजे, म्हणून मी माझा सहभाग चालू ठेवला. राष्ट्र सेवादलाचे कार्य आणि सर्वोदयचे कार्य यात मूलत: फारसा फरक नाही. सत्तेविनाही सेवा घडू शकते, हा वस्तुपाठ सेवादलाचा. मी सेवादलाच्या कार्यक्रमात रस घेत असे. पुढे मात्र विनोबांच्या सर्वोदय चळवळीचे मला आकर्षण निर्माण झाले. आर्थिक विषमता नष्ट करायची असेल, तर ग्रामीण कृषिप्रधान अर्थरचनेला व्यवस्थित समजून घेतले पाहिजे.



गंगाप्रसाद अग्रवाल,
वसमत, हिंगोली
Mob. 9421804581
(विशाल)



माझे एकांत व लोकांत एकाचवेळी चालू असते...

प्रश्न – तुमच्या घराण्यात कोणतीही राजकीय विचारप्रवाहाची परंपरा नाही. घराणे व्यापार उदीमाच्या क्षेत्रातले. तुमच्या कुटुंबात कोणी रूढ अर्थाने उच्चविद्याविभूषित असे नसतानाही ज्ञानार्जनात आणि सामाजिक कार्यात केवळ रस घेण्यापुरतीच नव्हे, तर त्यात समर्पण बुद्धीने कार्यरत राहण्याची वृत्ती तुमच्यात कशी आली. यासंबंधी काही वंशशास्त्रीय अनुमान करता येईल काय?

– अनुमानाने सहसा अचूक निष्कर्ष निघतोच असे नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे आमच्या घराण्यात तशी कोणतीही परंपरा नव्हती. वडिलांची कापड दुकानदारी होती. आम्ही चौघे भाऊ. माझा क्रमांक दुसरा. माझ्या बालपणी वडिलांना कापड दुकानदार म्हणून पाहिले. त्यांचे शिक्षण फारसे झाले नव्हते. त्यांना त्या काळी काही राजकीय मते होती किंवा नाही याबद्दल मी निश्चित काही सांगू शकणार नाही. पण ते ईश्वरनिष्ठ आणि पापभीरू वृत्तीचे होते. चांगले काम केल्याने पुण्यसंचय होतो, दुसऱ्याला दुखावणे पाप आहे, अशी त्यांची विचारसरणी होती. सामाजिक न्यायाची संकल्पना समजून घेण्याएवढे त्यांचे आकलन नव्हते. तरी त्यांच्या सत्प्रवृत्तीला धार्मिक अधिष्ठान होते, त्या प्रेरणेने ते त्या वेळच्या समाजकारणात रस घेत. त्याचा परिणाम कदाचित माझ्यावर त्या वेळी झाला असावा.

प्रश्न – तुमच्या वडिलांनी तुमच्यासाठी विशेष परिश्रम घेऊन शिक्षणाची व्यवस्था केली की, तुमची शैक्षणिक जीवनाची जी वाटचाल झाली ती स्वयंप्रेरणेने झाली?

– हा प्रश्न स्पष्टीकरणासाठी थोडासा अडचणीचा आहे. अडचणीचा या अर्थाने की, आपल्या मुलाच्या शिक्षणाची काळजी घेणे म्हणजे त्याचा घरी नियमित अभ्यास घेणे, शाळेत काय करतो याकडे लक्ष देणे असा प्रकार त्या वेळी नव्हता. वडिलांचे शिक्षण जरी फारसे झाले नव्हते, तरी त्यांना शिक्षणात रुची होती. वडिलांवर आर्य समाजाच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांना संस्कृत यावे असे वाटायचे. माझ्या आठवणीप्रमाणे येथील दत्तोपंत देऊळगांवकर वकील हे माझ्या वडिलांना भगवद्गीता म्हणायला लावायचे.

प्रश्न – शालेय जीवनातील काही आठवणी, ठळक प्रसंग, त्या वेळच्या गुरुजनांपैकी विशेष प्रभावी वाटणारी एखादी व्यक्ती यासंबंधी तुम्हाला काही सांगता येईल का? तुमच्यावर त्या काळात काही खडतर प्रसंग आले का?

– शालेय जीवनातील आठवणी मला फारशा सांगता येणार नाहीत. कारण आता त्या गोष्टीला फार काळ होऊन गेला आहे. आम्हाला शिकविणाऱ्यांपैकी एक बावळे मास्तरांचे नाव आठवते. त्या वेळी बहुतेक शिक्षक हे मुस्लिम असत. शाळेत असताना एका मुख्याध्यापकाची बदली झाली. त्यांच्या निरोपसमारंभात मी भाषण केले. ते माझ्या जीवनातील पहिले भाषण. सातवी पास होईपर्यंत मी माझ्या आई–वडिलांच्या छत्राखालीच होतो. आमचे कुटुंबही मोठे होते. वडिलांचा व्यवसायही बरा चालत असे. त्यामुळे त्या काळात माझ्यावर कोणतेही खडतर प्रसंग आले नाहीत. शालेय शिक्षण चालू असताना बाहेरच्या वातावरणाचा ठसा माझ्या मनावर नव्हता. राजकीय आणि सामाजिक स्थित्यंतराचा वेध घेण्याएवढी समजही अर्थात त्या वेळी नव्हती. शिकायचे, मोठे व्हायचे. नोकरी किंवा उद्योग करायचा हे ध्येय ठेवूनच मध्यमवर्गीयांची मुले शिकत. मीही त्या वेळी त्यापैकीच एक होतो. त्यामुळे शाळेत असताना निझामाला दीर्घायुरारोग्य चिंतणारी प्रार्थना म्हटली जायची. तीही मी म्हटली आहे, पुढे योगायोगाने त्याच्या विरुद्धच्या



लढ्यात सहभागी झालो!

प्रश्न – असे असूनसुद्धा तुम्ही तुमचा स्वतंत्र मार्ग कसा चोखाळला?

– त्याची अनेक कारणे आहेत. माझे सातवीपर्यंतचे शिक्षण वसमतला झाले. वडिलांना मी शिकावे असे फार वाटायचे, पण शिक्षणाच्या सुविधा आतासारख्या नव्हत्या. हायस्कूलसुद्धा फक्त जिल्ह्याच्या ठिकाणी असायचे. दळणवळणही आजच्या एवढे सोपे नव्हते. बाहेरगावी राहण्यासाठी कुणातरी नातलगाचे घर असावे लागे. यातून मार्ग काढण्यासाठी माझ्या वडिलांना एक युक्ती सुचली. पुढील शिक्षणासाठी नातेवाईकाचा शोध घेण्यापेक्षा माझे लग्न करावे, म्हणजे आपोआपच हा प्रश्न सुटेल व मला शिक्षणासाठी तिथे राहता येईल व त्याप्रमाणे घडलेही!

प्रश्न – म्हणजे शिक्षण आणि लग्न याबाबत तुमच्या संदर्भात उलट घडल्यासारखे दिसते. मध्यमवर्गीयांमध्ये शिक्षण पूर्ण झाल्याशिवाय सहसा लग्नाचा विचार कुणी करत नाही. लग्नानंतर शिक्षण घेणे शक्य होत नाही, असाच समज रूढ आहे. मग तुम्ही लग्नाला संमती कशी दिली?

– माझी संमती घेण्याचा प्रश्नच आला नाही आणि घेतली तरी अज्ञान वयातील संमतीला फारसा अर्थ नसतो. एकीकडे मला पुढचे शिक्षण मिळावे ही वडिलांची तीव्र इच्छा व दुसरीकडे त्यासाठी मला एकटे कुठे न ठेवण्याचा आग्रह. यामुळे ते विचित्र परिस्थितीत सापडले. शेवटी माझ्या पुढील शिक्षणासाठी माझे लग्न करणे, हाच तोडगा त्यांना योग्य वाटला व त्यांनी जालन्याच्या एका गरीब कुटुंबातील मुलीशी माझा विवाह केला. शिक्षणासाठी सासुरवाडीला राहण्याचा योग मला वाटते कुणाच्या जीवनात येत नसावा किंवा आला असेल तर फार थोड्यांच्या नशिबी ते भाग्य येत असावे. पण का, कोण जाणे एक वर्षापेक्षा अधिक काळ माझे मन तिथे रमले नाही. आठवीचे एक वर्ष मी कसेबसे काढले व अन्यत्र कोठेतरी चांगल्या ठिकाणी सोय व्हावी, असे वाटत असतानाच अंबाजोगाईच्या योगेश्वरी नूतन विद्यालयाचे नाव समोर आले आणि मी तिथे राहू लागलो.

प्रश्न – अंबाजोगाईला राहण्याचे कसे ठरले? तिथे राहण्याचा योग कुणामुळे आला? त्याचा तपशील आपण सांगू शकाल काय?

– तपशिल फारसा विस्ताराने सांगता येणार नाही, पण आठवेल तेवढा सांगतो. कारण त्या गोष्टीला आता सुमारे साठ-पासष्ट वर्षे झाली आहेत. माझी सोय अंबाजोगाईला कशी झाली, त्यापूर्वी त्या वेळची राजकीय व सामाजिक परिस्थिती कशी होती, हा संदर्भही थोडासा लक्षात घेणे जरूर आहे. देशाच्या पातळीवर स्वातंत्र्याचा लढा ऐन भरात होता. ठिकठिकाणी सत्याग्रहाचे लढे सुरू होते. गांधीजींनी आपले आंदोलन तीव्र केले होते. हैदराबाद राज्यातही काँग्रेसशिवाय इतर संघटनांतर्फे सत्याग्रह चालूच होते. त्यात आर्य समाज, हिंदू महासभासारख्या संघटना अग्रेसर होत्या. अशा पार्श्वभूमीवरच अंबाजोगाईची शाळा स्थापन झाली होती.

तो काळ १९३८-३९ चा होता. संबंध देशाचे वातावरण स्फोटक होते. स्वातंत्र्य आंदोलन म्हणजे काय याची तोंडओळख मला खऱ्या अर्थाने अंबाजोगाई येथे झाली. ब्रिटिशांची सत्ता झुगारली पाहिजे आणि त्यासाठी गांधीजींनी सुरू केलेल्या लढ्यात सहभागी झाले पाहिजे. अशा विचाराची रुजवात माझ्या मनात याच काळात झाली.

प्रश्न – आतापर्यंत आपण जे सांगितले त्यावरून अंबाजोगाईच्या वास्तव्यात तुमच्या विचाराला काही बैठक मिळण्यात आणि आकलनाच्या कक्षा रुंदावण्याला मदत झाली असे दिसते. अंबाजोगाईचे दिवस म्हणजे तुमच्या विद्यार्थी जीवनातले मंतरलेले दिवस म्हणायला हरकत नाही, असेच ना?

– होय. ते मंतरलेले दिवस होते आणि आत्मपरीक्षणाचेही दिवस होते. बाबासाहेब परांजपे यांचे भाषण ऐकले आणि माझ्या जीवनाला त्यामुळे एक कलाटणीच मिळाली. यांचे वक्तृत्व प्रभावी होते. त्या वेळी त्यांची वाणी ब्रिटिश सत्तेविरुद्ध आग ओकीत होती. मराठवाडा तर दुहेरी पारतंत्र्यात होता. निझामाची राजवट जुलमी आणि धर्मांध होती. अशा परिस्थितीत माझा बाबासाहेबांशी संपर्क आला. ते त्या वेळी शिक्षण संस्थेचे काम अत्यंत नेटाने आणि निष्ठेने करत होते. खासगी शाळा चालवणे हे त्या वेळी मोठे व्रत होते. सरकारी शाळा त्यासुद्धा थोड्या होत्या. शिक्षकांत मुसलमानांचा भरणा अधिक असे. मुस्लिम सणांना सुट्ट्या असत. मोहरमची सुट्टी त्या वेळी दहा दिवसांची होती. शाळा तपासायला येणारे अधिकारी मुस्लिमच असत. शाळा तपासणीच्या दिवशी बाबासाहेब काळी शेरवानी घालून शाळेत यायचे. वेष आणि पेहरावाबाबतही मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव



होता. शाळेत काही राजकारण चालते का, हे तपासण्यासाठी गुप्तचरांचा ससेमिरा असायचा. शाळेला त्या वेळी स्वतंत्र इमारत नव्हती. जोगेश्वरी मंदिराच्या परिसरात भाड्याच्या जागेत शाळा भरे. माझी सोय वसतिगृहात होती. वसतिगृहाचे वातावरण त्या वेळी कौटुंबिक वातावरणासारखे असे. राहण्याच्या सोईसुविधा त्या वेळी गौण मानीत. ज्ञानार्जन हे मुख्य ध्येय असे.

प्रश्न – आताच तुम्ही म्हणालात की, ते मंतरलेले दिवस होते. तसेच आत्मपरीक्षराचेही दिवस होते. हे आत्मपरीक्षण नेमके कशाचे व कुणी करायचे?

– हे आत्मपरीक्षण सर्वांनीच करायचे, असा तो काळ होता. कशाचे आत्मपरीक्षण असे जर तुम्ही म्हणत असाल, तर त्या वेळेला स्वातंत्र्यप्राप्तीशिवाय दुसरा विषय नव्हता. क्रांतिकारकांपासून ते विधायक कार्यकर्त्यांपर्यंत सर्वांच्या पुढे तेच ध्येय होते. देशाच्या पातळीवर अनेक घडामोडी घडत होत्या. मी अंबाजोगाईला शिकायला गेलो, त्याच्या दोन-तीन वर्षे आधीच फैजपूर काँग्रेसचे अधिवेशन महाराष्ट्रातील ग्रामीण भागात झाले होते. गांधीजींचा अहिंसात्मक असहकाराचा सरकारविरोधी कार्यक्रम प्रभाव दाखवत होता. अशा वेळी केवळ पुस्तकी शिक्षण घेणे आणि व्यक्तिगत जीवन सुखा-समाधानाचे कसे जाईल याचा विचार करणे म्हणजे क्षुद्रपणा आहे, अशी भावना तरुणांच्या मनात रुजविण्याचे काम अंबाजोगाईची शाळा करीत होती. माझ्या आत्मपरीक्षणाला या शाळेमुळे योग्य दिशा मिळाली, असे मला वाटते. आपल्या कार्यक्षेत्राची व शक्तीची तमा न बाळगता आंदोलनात स्वत:ला झोकून द्यावे व देशासाठी काही करावे असे वाटणे याला मी आत्मपरीक्षण म्हणतो आणि ते सर्वांनीच करावे असा तो काळ होता. आताही आत्मपरीक्षणाची गरज आहेच, पण त्याचा संदर्भ थोडा निराळा असेल.


प्रश्न – तो निराळा संदर्भ कोणता?

– तुम्हाला हे माहीत असेलच की, आधी स्वातंत्र्य का आधी सामाजिक सुधारणा हा वाद टिळक-आगरकरांच्या वेळी फार चर्चिला जायचा. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ वगैरे टिळकांचे वाक्य आज इतिहासजमा झाले आहे. त्या पुढची अवस्था ‘सुराज्या’ची आहे. सुराज्याची कल्पना आणि सुराज्याची अवस्था यात आज बरेच अंतर पडले आहे. ते कमी करता येणे शक्य असेल, तर काय करायला पाहिजे, हा तो संदर्भ आहे. आर्थिक समानता, स्वावलंबन, ग्रामीण अर्थव्यवस्था, शेतीउत्पादनाचे व वितरणाचे नियोजन गेल्या साठ वर्षांत आपण यशस्वीपणे करू शकलो आहोत का याचा शोध घेणे, हा तो संदर्भ आहे. अगदी देशाच्या फाळणीच्या वेळी झाले, तसे दंगेधोपे आजही होत असतील, तर स्वातंत्र्यानंतरची ही जबाबदारी कोणाची; याचा वेध घेणे हा तो संदर्भ आहे.

प्रश्न – मॅट्रिकनंतर नोकरी किंवा व्यवसाय न करता पुढील शिक्षण घेण्याचा निर्णय कसा झाला?

– माझ्या वडिलांना शिक्षणाची आवड होती. आपण जरी शिक्षण घेऊ शकलो नाही, तरी आपल्या मुलांनी ते घ्यावे असे त्यांना वाटायचे. माझे थोरले बंधू हरिप्रसाद हे वडिलांसोबत घर-परंपरेच्या व्यवसायाचे धडे घेत होते. त्यामुळे मला नोकरीची निकड नव्हती. त्या वेळी वर्ध्याला एक कॉमर्स कॉलेज असल्याचे व तिथे ठाकूरदास बंग हे प्राध्यापक असल्याची माहिती बाबासाहेबांना मिळाली. ठाकूरदार बंग यांच्यावरही गांधीविचारांचा प्रभाव होता. श्रीमन् नारायण हेही गांधीवादी प्राचार्य त्या कॉलेजात होते. वर्ध्याला त्या वेळी आगळेवेगळे स्थानमहात्म्य प्राप्त झाले होते. गांधीजींचा मिठाचा सत्याग्रह होऊन गेला होता. या आंदोलनात जनमानस बरेच ढवळून निघाले होते. वर्ध्यापासून जवळच गांधीजींनी ‘सेवाग्राम’ आश्रमाची स्थापना केली होती. वर्ध्याला राहिल्यास शिक्षणाचीही सोय होईल व सेवाग्राममुळे कधीकाळी का होईना गांधीजींना पाहता येईल असे वाटत होते.

प्रश्न – वर्ध्याला आल्यानंतर तुमचे महाविद्यालयीन शिक्षण सुरू झाले. उच्चशिक्षणाची संधी ज्या काळात मराठवाड्यातील त्यातून विशेषत: ग्रामीण भागातील





विद्यार्थ्यांना नव्हती, त्या काळात तुमची एवढ्या मोठ्या ठिकाणी सोय झाली. त्यातून तुम्ही विवाहित, अशा अवस्थेत तारुण्यात पदार्पण झाल्यानंतर भावी जीवनासंबंधी जे स्वप्नरंजन असते, त्याचा काही अनुभव वा त्याबाबतच्या तुमच्या काही महत्त्वाकांक्षा त्या वेळी होत्या का?

– तुम्ही म्हणता, त्याप्रमाणे कोणत्याही महत्त्वाकांक्षांचा माझ्या मनाला स्पर्श झाला नाही. याचे कारण मी अंबाजोगाईहून येथे आलो. अंबाजोगाईचे वातावरण राष्ट्रीय भावनेने भारावलेले होते. स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे व त्यांचे इतर बरेच सहकारी माझ्या पाहण्यात आले. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने त्यांचे विचार ऐकण्यात आले. स्वातंत्र्याचा लढा व त्यात आपण आपला सहभाग कसा नोंदवू शकतो, एवढाच विचार त्या वेळी होता. वर्ध्याला आल्यावर त्या विचारांनाच पुष्टी मिळाली. तिथे राष्ट्रीय युवक संघटना होती. त्याचे नेतृत्त्व त्या वेळी आचार्य दादा धर्माधिकारी करत होते. त्या संघटनेशी माझा संबंध आला. परंतु महाविद्यालयाची पहिली टर्म संपल्यानंतर घरी आलो, ते दुसऱ्या वर्षी नागपूरच्या सिटी कॉलेजमध्ये दाखल होईपर्यंत घरी राहिलो. नागपूरला प्रथम वर्ष पूर्ण केल्यावर द्वितीय वर्षात चलेजाव आंदोलन झाले. तिथे १९३८ च्या सत्याग्रहात सामील झालेले अनेक जण माझे मित्र बनले. सारा परिसरच स्वातंत्र्योर्मीने झपाटलेला होता. अशा वेळी व्यक्तिगत व कौटुंबिक सुखाबाबतचे स्वप्नरंजन करण्यास मला सवडच मिळाली नाही, असे म्हटले तरी चालेल. तरी पण आपल्याला शिक्षणासाठी वडिलांनी एवढ्या दूरवर ठेवले असल्यामुळे नीट अभ्यास करणे व त्यांना त्यांचे श्रेय देणे, हे माझे कर्तव्य होते, म्हणून मी अभ्यास केला व इंटरचे पहिले वर्ष पास झालो. दुसरे वर्ष मात्र पूर्ण होऊ शकले नाही.

प्रश्न – त्याचे कारण?

– इंटरच्या दुसऱ्या वर्षात मी नागपूरच्या बियाणी महाविद्यालय- सिटी कॉलेजात होतो. त्याच वेळी गांधीजींनी इंग्रजांना ‘चले जाव’चा इशारा दिला होता. दि. ८ ऑगस्टला मुंबईच्या आझाद क्रांती मैदानावर गांधीजींनी लढ्याचे रणशिंग फुंकले. सारे वातावरण ढवळून निघाले. नागपूरलाही लोक रस्तोरस्ती खांद्यावर झेंडे घेऊन स्वातंत्र्याचा घोष करीत होते. वर्धा आणि नागपूर यांत फारसे अंतर नसल्यामुळे या सर्व घडामोडींचा माझ्या मनावर परिणाम झाला आणि स्वातंत्र्य आंदोलनात स्वत:ला झोकून देण्यासाठी मी कॉलेजला रामराम ठोकला!

प्रश्न – वसमतला आल्यावर म्हणजे सन १९४३ ते १९४७ चा काळ. या काळातील तुमच्या जीवनातील महत्त्वाच्या घडामोडींचा धावता आढावा घ्यायचा ठरला, तर त्या कालखंडातील कोणत्या गोष्टी तुमच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या. या काळात तुम्ही काय साध्य केले?

– मला हातमाग व्यवसायातील कामगारांचा प्रश्न महत्त्वाचा वाटला. दुसऱ्या महायुद्धाच्या परिणामी सूत पुरवठा होत नसे. अनेक जाचक नियम त्यांच्यावर लादले जाऊ लागले. त्यामुळे त्यांची संघटना तयार केली. शेतकरी संघटना तयार झाली. पुढे हैदराबाद मुक्तिलढ्यात या संघटनेने फार मोठे कार्य केले. हे चालू असतानाच लोकांचे वैचारिक प्रबोधनही झाले पाहिजे, म्हणून एक वाचनालय चालवले.

अस्पृश्यता निवारण, बौद्धिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन, व्यायामाची तरुणात आवड निर्माण करणे वगैरे कार्यक्रमांत मी त्या वेळी स्वत:ला गुंतवून घेतले होते. जून १९४७ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेस संमेलनानंतर मात्र कार्याचे स्वरूप एकदम बदलले. भारताला स्वातंत्र्य मिळूनही ब्रिटिशांच्या आशीर्वादाने चालणारे निझामाचे हैदराबाद राज्य त्यात सामील नव्हते. स्वतंत्र भारताचा झेंडा लावण्यास बंदी होती. त्यातून झेंडा-सत्याग्रहाचे कार्यक्रम संधी मिळेल तेव्हा चालू झाले. जंगलतोड सत्याग्रह सुरू झाले. निझामाचे अत्याचार सुरू झाले आणि सारी सामाजिक शांतताच भंग पावली. त्यासाठी निझामाला जनतेची शक्ती दाखवणे गरजेचे होते. त्यातून शस्त्र चालवण्याची तयारी असणारे सैनिक निर्माण झाले. निझामाच्या शासनाला जमेल त्या पद्धतीने विरोध करायचा या निष्कर्षावर आमचे आंदोलन आले व त्यातून अनेक ॲक्शन्स आम्ही घेतल्या. त्याचा इतिहास आता उपलब्ध झाला आहे.

प्रश्न – तुमचा हैदराबाद मुक्तिलढ्याचा ऐन भरातील काळ गांधीजींच्या मृत्यूनंतरच सुरू झाला. गांधीहत्या प्रकरण आता इतिहासजमा झाले आहे. गांधीहत्येला जबाबदार असलेल्या आरोपींमध्ये सावरकरांचेही नाव होते. त्यांची शस्त्रबळावर निष्ठा होती. रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले? असा त्यांचा प्रश्न होता. ज्या क्रांतिकारकांनी या आंदोलनात आपले प्राण पणाला



लावले, त्यांच्या कार्याचे मोल आपण मानता की नाही?

– मानतो. आपण स्वातंत्र्य लढ्याची सुरुवातच १८५७ च्या बंडापासून मानतो. अलीकडे तो विषयही वादग्रस्त होऊ लागला आहे, ते सोडा. पण मी तुम्हाला सांगतो की, क्रांतिकारकांचे कार्य, निष्ठा आणि समर्पण बुद्धी कमी मोलाची मुळीच नाही. पण 'स्वातंत्र्य' या कल्पनेला नैतिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि राजकीय बैठक गांधीजींनी दिली, असे मला वाटते. केवळ सत्तांतर होणे, म्हणजे स्वातंत्र्य मिळणे नव्हे. आम्हीसुद्धा आंदोलनात हल्ला किंवा प्रतिकार करताना 'महात्मा गांधी की जय' असेच म्हणत होतो. त्या वेळीसुद्धा आम्हाला माहीत होते की, अहिंसात्मक असहकाराची एक नवी शक्ती गांधीजींनी दिली आहे. गांधीजी साधनशुचितेला महत्त्व द्यायचे. अहिंसा हे मूल्य श्रेष्ठच आहे. पण त्यावेळेस ते पेलण्याची आमची कुवत नव्हती म्हणा किंवा कालतत्त्वाला ते मान्य नव्हते, म्हणून म्हणा आम्हाला शस्त्र हाती घ्यावे लागले. याचे उत्तर तुम्हाला गीतेमध्येच नेमके मिळू शकेल. हेतूमध्ये शुद्धता आणि पावित्र्य असले की, कृतीलाही आपोआप ते येते, असे मला वाटते.

प्रश्न – दि. १७ सप्टेंबर १९४८ ला हैदराबाद मुक्तिपर्व संपले. साधारणत: १९४७-४८ हा एक वर्षाचा काळ तुमच्या दृष्टीने खडतर व आव्हानात्मक होता. पण तुमचे भावी आयुष्य म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनापासून ते आजपर्यंतचे लक्षात घेता, तुम्ही सत्तेच्या राजकारणात फारसे रमला नाहीत. गांधीजींनी तर शेवटपर्यंत राजकारणात रस घेतला. गांधी विचारांचा प्रभाव असूनही तुम्ही राजकारणापासून दूर राहण्याचे कारण काय?

– तुम्ही राजकारणाचा अर्थ काय लावता, यावर ते अवलंबून आहे. सामान्यत: आज तरी राजकारणाला त्याचा मूळ अर्थ जाऊन विपरीत अर्थ प्राप्त झाला आहे. सत्ता, स्पर्धा आणि पक्षांतर्गत हेवेदावे असे त्याचे आजचे स्वरूप झाले आहे. सत्तेची मी मुळीच चव चाखली नाही, असे नाही. वसमत नगरपालिकेचा पहिला लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून माझी नोंद झाली आहे, हे तुम्हाला माहीत असणारच. ती स्थानिक स्वराज्य संस्थेची पहिली निवडणूक होती. त्या वेळी मी आणि माझे सहकारी यांनी मिळून पक्षनिरपेक्ष राहून स्थानिक विकासाच्या प्रश्नाला प्राधान्य देणारा नागरिक संघ स्थापन केला आणि त्या वेळी निवडावयाच्या १५ जागांपैकी १४ जागांवर आमचे उमेदवार निवडून आले होते. तो योगायोग होता. ते माझे ध्येय नव्हते.

सप्टेंबर १९४८ पासून ते नगराध्यक्ष होईपर्यंतच्या काळात माझा सेवादलाशी संबंध आला. त्या वेळी एस्. एम्. जोशी राष्ट्र सेवादलाचे काम करायचे. १९५० मध्ये साने गुरुजी गेले. त्यांच्या वाङ्मयाचा मी तर उपासकच होतो, असे म्हटले तरी चालेल. कारुण्य आणि दया ही दोन श्रेष्ठ जीवन मूल्ये आहेत, याचा प्रत्यय मला त्यांचे वाङ्मय वाचून आला. विचार कितीही चांगले असले तरी, त्याला जोपर्यंत कार्यक्रमाची जोड मिळत नाही, तोपर्यंत ते कल्पनाच ठरतात. म्हणून काही उपक्रम सेवादलाच्या वतीने आयोजित केले. रस्ते बांधणे, पाझर तलाव, ग्रामीण भागात शौचालयाचा प्रसार करणे वगैरे कार्यक्रम त्या काळी अनुयायांच्या मदतीने राबवले.

तुम्ही आत्ताच म्हणालात, 'गांधीजींनी शेवटपर्यंत राजकारणात रस घेतला आणि तुम्ही राजकारणापासून दूर कसे?' स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काँग्रेस विसर्जित करावी, असा मनोदय गांधींनी व्यक्त केला होता, हा इतिहास तुम्हाला कदाचित माहीत असेल. परकीय सत्ता गेली. स्वराज्य आले. सुराज्याकडे वाटचाल करायची. केवळ काँग्रेस विसर्जित करावी, एवढाच त्यांचा मनोदय नव्हता, तर आता बाकीचे आयुष्य कुष्ठरोग्यांची सेवा आणि निसर्गोपचाराच्या प्रसारात घालवावे अशीही त्यांची इच्छा होती. पण नियतीची तशी इच्छा नव्हती. त्यांना पुढे जास्त आयुष्य लाभले नाही आणि आज गांधीजींचे नाव घेऊन राजकारण कसे चालते, हे मी सांगण्याचे कारण नाही! गांधी विचारांचा प्रभाव असूनही राजकारणापासून दूर का आहे? हे स्पष्ट झाले ना! उलट गांधी विचारांच्या प्रभावामुळेच मी राजकारणापासून दूर आहे.

प्रश्न – तुमच्या जीवनाच्या सामाजिक कार्याचे तीन पर्व समजले, तर पहिले पर्व म्हणजे तुमच्या स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागाचे, दुसरे राष्ट्र सेवादलाच्या कार्यातील सहभागाचे आणि तिसरे सर्वोदय आंदोलनाचे. या तीन पर्वातील तुमचा सहभाग एका पर्वातले काम संपल्यामुळे दुसरे स्वीकारले अशा पद्धतीचे आहे का, स्थल-काल-परिस्थितीनुसार तुम्ही कार्यक्रमात बदल केले?

– स्थल-काल-परिस्थितीनुसार बदल केला हे फक्त पहिल्या भागापुरते म्हणता येईल. स्वातंत्र्य आंदोलनातील सहभाग संपला की, आपले कार्य संपले, असे मानणे हे खऱ्या कार्यकर्त्यांचे लक्षण नव्हे! पण स्वातंत्र्य आंदोलनात

Date of Publication - 13-01-2018


सहभागाची ज्या पद्धतीने गरज होती, त्या पद्धतीने तो यथाशक्ती मी नोंदविला. पण समाजजीवनाचा प्रवाह चालू असतो. नव्या समस्या व नवी आव्हाने निर्माण होतात. त्याला जाणतेपणाने तोंड दिला पाहिजे, म्हणून मी माझा सहभाग चालू ठेवला. राष्ट्र सेवादलाचे कार्य आणि सर्वोदयचे कार्य यात मूलत: फारसा फरक नाही. सत्तेविनाही सेवा घडू शकते, हा वस्तुपाठ सेवादलाचा. मी सेवादलाच्या कार्यक्रमात रस घेत असे. पुढे मात्र विनोबांच्या सर्वोदय चळवळीचे मला आकर्षण निर्माण झाले. आर्थिक विषमता नष्ट करायची असेल, तर ग्रामीण कृषिप्रधान अर्थरचनेला व्यवस्थित समजून घेतले पाहिजे. उत्पादनाच्या सर्व साधनांत जमिनीलाच केवळ मर्यादा असल्याने जमिनीच्या स्वामीत्वाचा संदर्भ बदलला पाहिजे. या दृष्टीने विनोबांनी भूदान चळवळ सुरू केली, त्याचा मी अभ्यास केला.

प्रश्न – विनोबांच्या ग्रामदान-भूदान आंदोलनाशी तुमचा प्रत्यक्ष संबंध कसा आला? चळवळीचा जर तुम्ही अभ्यास केला, तर तुम्हाला त्यातील उणीवा अथवा मर्यादा जाणवल्या असणारच. ही चळवळ आतापर्यंत समाजापरिवर्तनाच्या ज्या चळवळी झाल्या त्यापेक्षा कोणत्या कारणांमुळे अधिक निर्दोष वाटली?

– कोणतीही चळवळ एकदम सदोष किंवा निर्दोष अशा सदरात मोडत नाही. ती उभारण्याचा हेतू, कार्यकर्त्यांची समर्पण बुद्धी, प्रस्थापित व्यवस्थेशी मुकाबला करण्याची तिची क्षमता या सर्वांचा एक समयावच्छेद करून तिची यशस्विता ठरते. आर्थिक क्रांती घडविण्याचे आतापर्यंत अनेकांचे अनेक प्रयत्न झाले. आंध्रातील कमयुनिस्टांच्या भूमी आंदोलनातूनच विनोबांनी अहिंसक मार्गाने आर्थिक परिवर्तनाचा पाया घातला. दि. १८ एप्रिल १९५१ च्या पोचमपल्लीच्या भूमिदानापासून या आंदोलनाची सुरुवात मानली जाते.

१९५१ पासून सुरू झालेली विनोबांची पदयात्रा १९५८ साली महाराष्ट्रात आली आणि त्याच साली तिने मराठवाड्यात प्रवेश केला आणि राष्ट्र सेवादलाने माझ्यावर या आंदोलनाची जबाबदारी सोपवली व त्यात मी माझा अधिकात अधिक वेळ देऊ लागलो. तुमच्या प्रश्नाच्या उत्तर भागात या आंदोलनाच्या मूल्यमापनाच्या संदर्भात जी शंका तुम्ही उपस्थित केली, त्याचे उत्तर मी सुरुवातीलाच दिले आहे. ही चळवळ मला अधिक निर्दोष यासाठी वाटते की, यात कोठेही हिंसेला वाव नाही. वैचारिक परिवर्तनावर विश्वास ठेवीत असल्यामुळे मला ती अधिक निर्दोष वाटली.

प्रश्न – आणीबाणीच्या काळात तुम्हाला १८ महिन्यांचा तुरुंगवास भोगावा लागला. त्या वेळी इंदिरा गांधी सत्तेत होत्या. तुमच्या राजकीय विचारांच्या बैठकीला समाजवादी विचारांची चौकट. इंदिरा गांधी काँग्रेसच्या पुढे आणीबाणी संपल्यानंतर ज्या निवडणुका झाल्या त्यात तुम्ही उघडपणे काँग्रेस उमेदवारांच्या विरुद्ध आणि जनता पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार केला. आतापर्यंतच्या तुमच्या निष्पक्ष विधायक कार्यकर्त्यांच्या भूमिकेशी ही भूमिका विरोधी नव्हती काय?

– नाही. आणीबाणीनंतरच्या निवडणुकीचा प्रचार म्हणजे केवळ पक्षीय राजकारणाचा विचार नव्हता. काँग्रेसमधून एक गट बाहेर पडला होता व तोही स्वत:ला खरी काँग्रेस समजत होता. बाकी सारे छोटे-मोठे पक्ष एक होऊन जयप्रकाशजींच्या अधिपत्याखाली केवळ 'जनता पक्ष' म्हणून स्थापन झाला. जनता पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार असे ते चित्र होते. त्यामुळे त्या निवडणूक प्रचारात भाग घेतला.

प्रश्न – आतापर्यंत आपल्या कार्याची जी दिशा आहे, व ज्या आत्मनिष्ठेने ते चालू आहे, त्याचा समाजावर तुम्हाला अभिप्रेत असलेला काही परिणाम झाला आहे, असे वाटते का? नसेल तर त्याच्या मूल्यमापनाची आणि आत्मपरीक्षणाची गरज आहे, असे तुम्हाला वाटत नाही काय?

– मूल्यमापन आणि आत्मपरीक्षण ही सतत चालू राहणारी प्रक्रिया आहे. माझ्या कार्याचे मूल्यमापन समाजानेही केले आहे व संस्थांनाही केले आहे, असे मला वाटते. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाने मला डॉक्टरेट ही सन्माननीय पदवी बहाल केली, मराठवाडा भूषण पुरस्कार मिळाला. याचा अर्थ निदान माझ्या कार्याची दिशा व वाटचाल योग्य मार्गाने चालू आहे, असे तुम्हाला वाटत नाही काय?

प्रश्न – तुम्हाला मिळालेले सन्मान व पुरस्कार याबद्दल अगदी थोडक्यात भाष्य करायची विनंती केली, तर आपण काय सांगणार?

– पुरस्कार किंवा सन्मान गौण असतात किंवा ती केवळ प्रतिकात्मक असतात. आत्मनिष्ठेने स्वीकारलेले कार्य पुरस्काराचे ध्येय समोर ठेवून चालू नसते. कार्य करणाऱ्याची निष्ठा आणि सातत्य याचा तो एक अनुषंगिक



परिणाम आहे, एवढेच म्हणता येईल.

प्रश्न – तुमच्या कार्यातील तुमच्या मित्रपरिवाराची काही नावे आठवतात काय?

– कोणतेही सामाजिक कार्य अनुयायी व मित्रपरिवाराशिवाय होत नाही. स्वातंत्र्य आंदोलनातील बरेच मित्र आता काळाच्या पडद्याआड गेले आहेत. बऱ्याच जणांचा स्वातंत्र्य आंदोलनानंतर सामाजिक कार्याशी संबंध सुटला. मोजकेच शिल्लक आहेत. त्यांच्या स्मृती मी माझ्या भावविश्वात जपून ठेवल्या आहेत.

प्रश्न – आता थोडे खासगी व व्यक्तिगत जीवनाविषयी विचारतो. आपण काही समाजाचे देणे लागतो, ही जाण असणे उत्तम, पण त्याचबरोबर आपल्या काही कौटुंबिक जबाबदाऱ्या आहेत, त्याही पूर्ण झाल्या पाहिजेत, असे त्या वेळी आपणाला वाटत होते किंवा नाही? त्या आपण पार पाडल्यात का? दोन्हीमध्ये आपण प्राधान्य कशाला दिले?

– तसे पाहिले तर, कोणतीही 'जबाबदारी' म्हटली की, ती महत्त्वाचीच असते. सुदैवाने माझ्यावर कौटुंबिक जबाबदारीचा फारसा बोजा पडला नाही, पण हळुवार भावनांच्या कोशातून आणि मायामोहाच्या पाशातून स्वत:ची सुटका करून घेतल्याशिवाय निष्ठा म्हणून स्वीकारलेले कार्य सिद्धीस जात नाही.

प्रश्न – ईश्वरनिष्ठा किंवा परमेश्वराचे अस्तित्व यासंबंधी तुमचे काही चिंतन असेलच. गांधी-विनोबांच्या विचारांचा आपल्यावर प्रभाव असल्यामुळे आपण ईश्वर मानणारेच असणार. नास्तिकवाद तुम्हाला अमान्य असणार, अशीच माझ्यासारख्या तुमच्या निकटवर्तीयांची समजूत आहे. मी जर तुम्हाला 'देव' आहे का असा सरळ प्रश्न विचारला तर?

– तर तो आहे, असेच मी उत्तर देईन. पण त्याचे रूप किंवा स्वरूपाबाबत सांकेतिक असे कोणतेच चित्र माझ्यासमोर नाही. मूर्तीला हात जोडल्याने एखाद्याची आस्तिक्यबुद्धी सिद्ध होते असे मी मानत नाही. तसेच मूर्तीला हात जोडू नयेत असेही सांगणार नाही. माणसातील चांगूलपण जतन करायला लावणारी प्रेरणा म्हणून ईश्वराचे अस्तित्व मला मान्य आहे व त्यासाठीच प्रार्थनेचीही जरुरी आहे.

प्रश्न – तुम्ही देव माना की न माना, पण आमच्या-सारख्या तुम्हाला जवळून पाहिलेल्यांना मात्र तुम्ही खरे देवभक्त आहात असे वाटते. कारण लोक तुम्हाला कंटाळत नाहीत, तुम्ही लोकांना कंटाळत नाही. आता तुमच्या जीवनातील आठ दशकांचा काळ उलटून गेला आहे. तेव्हा गीतेच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे 'एकांताविषयी प्रीती जनसंगात नावड' अशी अवस्था केव्हा स्वीकारणार?

– मला वाटते, एकांत म्हणजे आत्मचिंतन आणि लोकांत म्हणजे कार्यक्रम. कार्यक्रम आणि आत्मचिंतन माझे एकाच वेळी चालू असते.

प्रश्न – विनोबांनी 'क्षेत्रसंन्यास' असा एक शब्दप्रयोग केला होता. क्षेत्रसंन्यास म्हणजे भ्रमंती बंद करून एकाच ठिकाणी राहून कार्य करणे. तसा आपण क्षेत्रसंन्यास केव्हा घेणार?

– संन्यास या शब्दाचा अर्थ फार व्यापक, खोल आणि गहन आहे. केवळ भगव्या कपड्यांमुळे जसा संन्यास सिद्ध होत नाही, तसा कार्यमुक्तीमुळेही संन्यास सिद्ध होत नाही. जोपर्यंत शरीराकडून काम होते, तोपर्यंत ते त्याच्याकडून करून घ्यायचे आणि त्याचे फळ समाज-पुरुषाचे चरणी अर्पण करायचे हाच माझा क्षेत्रसंन्यास.

प्रश्न – अनेक जणांना जीवनाच्या अंतिम टप्प्यात वैफल्याच्या भावनेने ग्रासलेले असते. तुमच्यासारख्या ध्येयवादी कार्यकर्त्याला वाटते, आपल्या विचारांचा समाजावर प्रभाव पडत आहे. पण जग जिथल्या तिथेच असते. मला वाटते, अशा भावनांचे कल्लोळ तुमच्या अंतरंगात उठत असणार. मनाला निराशेने कधी स्पर्श केला काय?

– नाही. 'नित्यतृप्त निराधार न राखे फलवासना' अशा वृत्तीने कार्य केले की, निराशा येत नाही.

प्रश्न – अंतिम इच्छा?


– जय-जगत.

संवादक : ॲड. रमेश कोठीखाने
Mob. 9403219447

२००७ मध्ये घेतलेली ही मुलाखत शाम अग्रवाल लिखित 'पदयात्रा' या पुस्तकातून संक्षिप्त करून घेतली आहे. ७ जानेवारी २०१८ रोजी गंगाप्रसादजींनी ९६ व्या वर्षात पदार्पण केले आहे.



डॉ.नरेंद्र दाभोलकर स्मृति पुरस्कार
अरविंद गुप्ता



मी लिहिलेल्या 'खेल खेल में' या पुस्तकाच्या एक लाखापेक्षा जास्त प्रती विकल्या गेल्या असतील. या पुस्तिकेचे १३ भाषांत अनुवाद झालेले आहेत. विज्ञानातील गोडी वाढवण्यासाठी मी लिहिलेली पुस्तकं साह्यकारी ठरली. पुस्तकांच्या लेखनाबरोबरच वैज्ञानिक खेळण्यांवर मी भरपूर प्रमाणात कार्यशाळा घेतल्या. शिबिरांचे आयोजन केले. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी, विज्ञानाबद्दल गोडी वाढवण्यासाठी सतत प्रयत्न करत होतो. विज्ञान विषयाचं प्रेम कुणाला किती आहे आणि कुणाच्या मनात काय निर्माण होईल याचा अंदाज कधीच येत नसतो. त्यामुळे मुलांमध्ये आवड निर्माण करणे, त्यांना उत्तेजन देत राहणे हाच त्यावर उपाय असतो.



अरविंद गुप्ता, चेन्नई
Mob. 07350288014



Date of Publication - 13-01-2018

अनेक प्रश्न मला बेचैन करीत होते...

तुमच्या मुलाने खेळणी मोडली नाहीत तर तो खेळलाच नाही असे कुणी म्हटले, तर कदाचित तुम्ही त्याला वेडे तरी ठरवाल किंवा एक विक्षिप्त वैज्ञानिक वा विचारवंत तरी ठरवाल. अरविंद गुप्ता हे असेच एक व्यक्तिमत्त्व! विज्ञान खेळणी बनवण्यासाठी आणि गावोगाव भटकण्यासाठी गले लठ्ठ पगाराच्या नोकरीला लाथ मारणाऱ्याला आपण नक्कीच वेडा ठरवू. परंतु विज्ञानप्रसाराचे काम उभारायचे असल्यास त्यासाठी हा वेडेपणाच कामी आला, असे अरविंद गुप्तांचे मूल्यमापन केल्यास म्हणता येईल.

संधी असूनही तथाकथित 'यशस्वी' आयुष्याकडे पाठ फिरवून स्वतःची वाट धुंडाळणाऱ्यांबद्दल आपण ऐकतो, वाचतो. ती वाट खाच-खळग्यांनी भरलेली आहे, हे माहीत असूनसुद्धा ती व्यक्ती त्या वाटेने जाते आणि या प्रवासात मानसिक तोल ढळू न देता समाधानाने व शांत चित्ताने अडचणींचा सामना करत असते. अशा प्रकारची व्यक्तिमत्त्वे आठवत असताना त्यांच्यातील अक्षय ऊर्जास्रोताबद्दल आपल्याला अभिमान वाटत असतो. त्यांच्याबद्दल भरभरून बोलावेसे वाटत असते, ऐकावेसे वाटत असते. अशाच काही मोजक्या व्यक्तिमत्त्वांपैकी अरविंद गुप्ता हे एक असून त्यांना वैज्ञानिक खेळण्यांचा 'जादूगार' म्हणून अख्खा महाराष्ट्र ओळखत आहे. महाराष्ट्रातील शाळा-शाळांमध्ये हे नाव चांगलेच परिचित आहे. कानपूर आयआयटीतील इंजिनिअरिंग पदवी घेतलेले अरविंद गुप्ता मुलांसाठी कचऱ्यातून स्वस्त वैज्ञानिक खेळण्यांची रचना करण्यात जास्त रमतात. अगदी छोट्या-छोट्या प्रयोगातून विज्ञानाचे तत्त्व सांगत मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याच्या प्रयत्नात ते असतात.

प्रस्थापित व्यवस्थेतील अडी-अडचणींवर मात करत अरविंद गुप्ता यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्याचे कार्य केले आहे. केवळ पोथीनिष्ठपणे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे गोडवे न गाता डॉ.दाभोलकरांप्रमाणे प्रत्यक्ष फील्डमध्ये उतरून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या मते, आज जास्त गरज आहे ती स्वतः चांगले काम करण्याची, ती ज्ञान आणि विज्ञानाच्या संकल्पना अनकव्हर करण्याची. पुढच्या पिढीत त्या रुजवण्याची.

प्रश्न – आपण आयआयटीसारख्या संस्थेमध्ये शिक्षण घेऊनही इतरांप्रमाणे अमेरिकेत जाऊन गलेलठ्ठ पगार, इतर सोई-सुविधा व ग्रीन कार्डधारक होऊन अमेरिकेत स्थायिक होण्याचा विचार न करता भारतातच राहून 'काही तरी करण्याचा' विचार कसा काय केलात? त्यामागील प्रेरणा कोणती?

– सत्तरच्या दशकात मी आयआयटी कानपूर येथे शिकत होतो. तो काळ विलक्षण धुमश्चक्रीचा होता. संपूर्ण जग भांडवलशाहीच्या विळख्यात अडकलेले होते. जगभरातील युद्धविरोधी चळवळ, स्त्रियांच्या हक्कासाठी चळवळ, विद्यार्थ्यांचे बंड, कामगार चळवळ, वर्णद्वेषाविरुद्ध संघर्ष इत्यादींमुळे कॉलेजच्या कॅम्पसचे वातावरण ढवळून निघाले नसेल, तरच नवल म्हणावे लागेल. मलासुद्धा या संघर्षांची झळ नक्कीच पोचली होती. परंतु 'लोकांबरोबर राहा, त्यांच्यावर प्रेम करा' या माझ्या आईच्या- रामदुलारीच्या शिकवणुकीचा लहानपणापासून परिणाम झालेला असल्यामुळे मी त्या काळीसुद्धा अगदी वेगळा विचार केला. काही समविचारी मित्रांच्या मदतीने कानपूरच्या परिसरात 'सहयोग' या गटाची स्थापना केली. या गटातर्फे कानपूरच्या परिसरात गरीब कामगारांच्या मुलांसाठी एक शाळा सुरू केली व तिथे दर्जेदार शिक्षण देण्याचे प्रयत्न केले. आठ-दहा मुलांची शाळा बघता-बघता ३०० मुलांची झाली. शाळेतील मुलांसाठी शालेय वस्तूंच्या खरेदीची सोय करताना या गटाला चित्र-विचित्र



अनुभवांचा सामना करावा लागला, चांगले-वाईट अनुभव आले. या अनुभवांनी खचून न जाता मी आणि माझे मित्र काम करतच राहिलो. पाच वर्षांच्या कॉलेज शिक्षणाच्या या कालखंडाने भरपूर दिले. सामाजिक व राजकीय दृष्टिकोन दिला, माणूस म्हणून कसं जगायला हवं, हा मार्गही दाखवला.

भारतातच राहून कार्य करायचे, असे ठरविल्यानंतर आयआयटीची बी.टेक. पदवी प्राप्त करून मी पुण्यातील टेल्को कंपनीत नोकरीला लागलो. टेल्को कंपनीत मी पाच वर्षे नोकरी केली. टेल्कोसारख्या नामांकित कंपनीतील चांगल्या पगाराच्या नोकरीमुळे माझे आयुष्य लौकिक दृष्ट्या खूपच सुरळीत चालले होते. भौतिक दृष्ट्या माझे आयुष्य सुखी होते. परंतु या भौतिक सुखात मी रमू शकलो नाही. माझे मन अस्वस्थ होते. भोवतालचे अनेक प्रश्न मला बेचैन करत होते. मुलांची उपासमार आणि कुपोषण हे प्रचंड प्रमाणात होत असल्यास त्यांच्या मेंदूची वाढ होणार नाही... गरिबीमुळे येणारी अंधश्रद्धा, निरक्षरता आणि आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक मागासलेपण हे भीषण स्वरूपात मुलांच्या समोर उभे राहतात- या जाणिवा मला स्वस्थ बसू देईनात. अंधारात मी चाचपडत होतो. काही दिशा मिळत नव्हती. परंतु काही तरी करावे, यासाठी मन उत्सुक होते. त्याच कालावधीत शाळेतील मुलांसाठी काम करत असलेल्या होशंगाबाद येथील 'किशोर भारती' या संस्थेबद्दलची माहिती माझ्या वाचनात आली आणि एके दिवशी तिथे प्रत्यक्षपणे जाऊन तेथील कामाचे स्वरूप जाणून घेण्याचा निर्णय घेतला.

नोकरी करत असताना काही दिवसांसाठी बिनपगारी रजा घेऊन होशंगाबाद येथील किशोर भारती या स्वयंसेवी संस्थेला भेट दिली. ही संस्था त्या परिसरातील शाळांत काही शिक्षणविषयक प्रयोग करत होती. त्याच काळी छत्तीसगड येथील मजदूर आंदोलनाचे व विज्ञानाचे अभ्यासक डॉ.अनिल सद्गोपाल यांच्याशी संवाद साधण्याची व त्यांचे काम बघण्याची संधी मिळाली. या किशोर भारतीने मला एका शाळेत विज्ञान व गणित शिकवण्याची संधी दिली. तेव्हा मानधन, प्रवासखर्च इत्यादींचा कुठलाही विचार माझ्या डोक्यात आला नाही. मी पटकन होकार दिला. सोई-सुविधांचा अभाव असलेले ते एक खेडे होते, परंतु मुलांनी शिकले पाहिजे, ही जिद्द माझ्या मनात होती. मी तिथे शिकवू लागलो. विज्ञान कसे शिकवू नये अशी स्थिती त्या शाळेत व भोवतालच्या बहुतेक शाळांत होती.

प्रयोग म्हणून विज्ञानाची खेळणी बनवण्याचे काम करत विज्ञानाची गोडी निर्माण करण्याच्या प्रयत्नात किशोर भारती होती. मी स्वतः इंजिनिअर असल्यामुळे खेळण्यांची रचना कशी असावी, याबद्दलचे माझे काही आडाखे होते. त्या दिवसापासून किशोर भारती या संस्थेशी मी जोडलो गेलो. टाकाऊ वस्तूतून स्वस्तातील वैज्ञानिक खेळणी कशी बनवावीत, हा विचार माझ्या डोक्यात घुमत होता. त्या खेड्यातील आठवड्याच्या बाजारात एकदा फिरत-फिरत जात असताना एक-दोन फूट सायकलीची व्हॉल्व ट्यूब व काड्यापेटींची खरेदी मी केली. त्यातून त्रिकोण, चौकोन, प्रिज्म, पिरॅमिडसारख्या भूमितीय रचना करता येतात याचा जणू मला 'साक्षात्कार' झाला. 'युरेका युरेका' म्हणून पळण्याचे तेवढे राहून गेले. विज्ञानाचा वास्तविक जीवनाशी संबंध जोडता येतो याची जाण मला आली. बघता-बघता साधी काड्यापेटी, त्यातील काड्या व शर्टला लावण्याची बटणे यामधून मेकॅनोचा जन्म झाला. इतरही काही खेळण्यासंबंधी मी प्रयोग करू लागलो.

प्रश्न – किशोर भारतीतून तुम्ही त्रिवेंद्रमला कसे काय पोचलात?

– मी शिकत असतानाच लॉरी बेकर या सिव्हिल इंजिनिअरने मला भुरळ घातली. त्यांनी भारतात केलेल्या कामांचे मला आकर्षण होते. इंग्लंडमध्ये जन्मलेले परंतु भारतीय नागरिकत्व पत्करलेले लॉरी बेकर गांधीजींच्या संपर्कात आले होते. गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन ते भारतात राहिले. स्थानिक वस्तू वापरून स्वस्त दरात घरं बांधली गेली पाहिजेत, असे त्यांना वाटत होते. मुळातले सिव्हिल इंजिनिअर असलेले लॉरी बेकर हे ग्रेट वास्तू विशारद होते. ते कर्नाटक व केरळ येथे इमारती बांधण्यासंबंधी सल्ला देत असत. काही ठिकाणी तर त्यांनी एखाद्या गवंड्यासारखे काम केले व त्यासाठी गवंड्याइतकीच मजुरी घेतली. एका तऱ्हेने लॉरी बेकर यांनी गरिबांच्या आयुष्याला स्पर्श केला होता. अशा पर्यावरणवादी, मानवतावादी व साध्या माणसाचा प्रभाव माझ्यावर पडला होता. रजेतील काही काळ त्रिवेंद्रम येथील लॉरी बेकर यांच्याबरोबर घालवावा, असे मला तीव्रतेने वाटत होते. मग मी तडक त्रिवेंद्रमला पोचलो. लॉरी बेकरची भेट झाली. त्याच वेळी त्रिवेंद्रमच्या वास्तव्यात केरळ शास्त्र व साहित्य परिषदेचे कृष्णकुमार यांच्याशी माझी भेट झाली. किशोर भारतीमध्ये



खेळण्यासंबंधीचे मी काम केल्याचे त्यांना समजले. माझ्यासाठी त्यांनी काही साहित्य मागवून दिल्यानंतर मी बघता-बघता त्या वस्तूंतून भूमितीय आकार करून दाखवले. त्या रचना बघून कृष्णकुमार यांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यांनी त्रिवेंद्रममध्ये माझ्यासाठी आणखी काही कार्यक्रमांचे आयोजन केले.

प्रश्न – तुमच्या टेल्कोतील नोकरीचे काय झाले?

– सर्व घडामोडींतून जात असताना मला सकाळी १० ते दुपारी ५ पर्यंतची नोकरी कराविशी वाटेना. वैयक्तिक खर्च कमी करून थोड्या पैशांत जीवन जगता येते, याचा प्रत्यय त्रिवेंद्रमच्या मुक्कामी मला आला होता. त्यामुळे टेल्कोची नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. १९८१ च्या सुमारास गुरुतुल्य असलेल्या माझ्या आईचे अल्पशा आजारपणामुळे निधन झाले. इतर कुटुंबीयांच्या आग्रहाखातर मी लग्न करण्याचा निर्णय घेतला. परंतु माझ्यासारख्या भणंग माणसाला मुलगी देणार कोण? त्यामुळे माझ्या कुटुंबीयांनी वृत्तपत्रात जाहिरात देण्याचे ठरवले. मुलगा- आयआयटी कानपूरचा इंजिनिअर, पाच वर्षे टेल्कोत काम केले असून सध्या ट्रेड युनियनची कामे करतो. 'घटस्फोटित, विधवा, मुलं असलेली-नसलेली मुलगी चालेल. जात आणि वय याची अट नाही. हुंडा नको.' अशी ती जाहिरात होती. ही विक्षिप्त जाहिरात वाचून सुनीता पंधे ही तरुणी मला भेटण्यासाठी दली राजरा येथे आली. माझी कामगारांबद्दलची तळमळ बघून भारावून गेली. माझे कष्टमय जीवन जवळून पाहिले व तिने लग्न करण्याचा निर्णय घेतला. आर्यपद्धतीने आम्हा दोघांचे लग्न झाले. पुण्यातली नोकरी सोडून सुनीता माझ्यासोबत त्या खेड्यातील एका शाळेत शिकवू लागली.

प्रश्न – पुण्याला परत कधी आलात?

– १९८४ मध्ये मी व सुनीता पुण्याला परतलो. यादरम्यान आम्हाला एक मुलगी झाली. माझ्या आईची आठवण म्हणून आम्ही मुलीचे नाव दुलारी ठेवले. ती लहान असताना मी तिच्याबरोबर अनेक विषयांवर बोलत होतो. पुस्तकं वाचून दाखवत होतो. हिंदी भाषेतील हरी मोहन झा यांच्या खट्टरकाका या पुस्तकातील काही पानं वाचल्याशिवाय दुलारी झोपत नसे. मी तिच्यासाठी खूप खेळणी आणत असे, पुस्तकं आणत असे. मुळात माझ्या मोकळ्या स्वभावामुळे मुलांशी माझी नाळ फार पटकन् जुळते.

प्रश्न – आयुकातील विज्ञान केंद्राशी तुम्ही कसे काय जोडला गेलात?

– डॉ.जयंत नारळीकर यांनी २००३ मध्ये आयुकातील विज्ञानविषयक केंद्रात काम करण्याच्या बाबतीत मला पाचारण केले. सरकारी संस्थांमध्ये काम करणे जिकिरीचे असले तरी व नियमांना बांधून घेण्याची तयारी नसली तरी मी आयुकाच्या मुक्तांगण विज्ञानशोधिकेचे काम स्वीकारले. नाही जमल्यास तिथून बाहेर पडू, असे ठरवूनच महोकार दिला होता. पुलंच्या ४० लाखांच्या देणगीतून साकार झालेल्या पुलस्त्य या इमारतीत या शोधिकेचे काम सुरू केले. डॉ.नारळीकरांच्या वैज्ञानिक संकल्पनांना प्रत्यक्षात उतरविण्याचे काम करू लागलो. काही काळानंतर या केंद्राचे नाव महाराष्ट्रभर नव्हे, तर देशाच्या पलीकडेसुद्धा प्रसिद्धीच्या झोतात आले. या केंद्रात श्रीमंतांच्या शाळांमधीलच नव्हे तर गरीब-झोपडपट्टीतील मुलांनासुद्धा मुक्त प्रवेश होता. ही मुलं या केंद्रात यावीत, त्यांनी खेळणी हाताळावीत, खेळणी बनवावीत, त्यामागील विज्ञान समजावून घ्यावे- यासाठी मी विशेष प्रयत्न करत होतो. ४०० चौरस फुटांच्या अरुंद जागेतील एका खोलीत तीन मोठमोठ्या टेबलांवर इतस्ततः पसरलेली पुस्तकं, संगणक, अर्धवट वा तयार झालेल्या खेळण्यांची रास, कॅमेरा, झेरॉक्स मशीन, स्कॅनर्स हे माझ्या खोलीतील नेहमीचे दृश्य होते. केंद्राला भेट देणाऱ्या मुलांना (व इतरांनासुद्धा!) आपण एका वेगळ्याच जगात प्रवेश करत आहोत की काय, असे वाटे. याच जागेत रात्रंदिवस बसून मी स्वतः बनविलेल्या खेळण्यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले. खेळणी कशी बनवावीत याची माहिती अस्खलित हिंदी व इंग्रजी भाषेत मी सांगत होतो. माझा मित्रपरिवारही देश विदेशात पसरलेला होता. त्यामुळे माझे मित्र या खेळण्यांची माहिती वेगवेगळ्या भाषेत रेकॉर्डिंग करून देत होते. कन्नड, मराठी, तेलुगू, तमिळ,





मल्याळम्, बंगाली, भोजपुरी, पंजाबी इत्यादी भारतीय भाषांबरोबरच स्पॅनिश, जर्मन, फ्रेंच, जपानीज इत्यादी भाषांतूनही या खेळण्यांच्या व्हिडिओंची निर्मिती करण्यात आली. या खेळण्यांची माहिती सीडीतून उपलब्ध करून देण्यात आली. त्याबद्दलची पुस्तकं मी लिहिली. यूट्यूबवरून हे व्हिडिओ प्रसारित करण्यात आले. या सर्व उपक्रमांना प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळत गेला. 'ना नफा-ना तोटा' या तत्त्वानुसार खेळण्यांसाठी लागणाऱ्या सामानांची, सीडी व पुस्तकांच्या विक्रीची व्यवस्था करण्यात मी पुढाकार घेतला. या दहा-बारा वर्षांच्या कालखंडात २० भाषांमधील ८६०० व्हिडिओ फिल्म्स यूट्यूबवर उपलब्ध केलेले असून, सहा कोटींच्यावर प्रेक्षकांनी त्याचा आनंद घेतला आहे. माझ्या या वैज्ञानिक शिक्षणाच्या उपक्रमाला आयुकाने सर्व सोई-सुविधा पुरवल्या. टाटा ट्रस्टने काही प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला.

प्रश्न – या वैज्ञानिक खेळण्यांच्या माध्यमातून विज्ञान-प्रसाराचे काम कसे काय करू शकलात?

– मुळात या खेळणींचा मोठ्या प्रमाणात प्रसार होण्यात या खेळण्याबद्दलच्या माझ्या पुस्तिकांचा फार मोठा वाटा आहे. मी लिहिलेल्या 'खेल खेल में' या पुस्तकाच्या एक लाखापेक्षा जास्त प्रती विकल्या गेल्या असतील. या पुस्तिकेचे १३ भाषांत अनुवाद झालेले आहेत. विज्ञानातील गोडी वाढवण्यासाठी मी लिहिलेली पुस्तकं साह्यकारी ठरली. पुस्तकांच्या लेखनाबरोबरच वैज्ञानिक खेळण्यांवर मी भरपूर प्रमाणात कार्यशाळा घेतल्या. शिबिरांचे आयोजन केले. मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यासाठी, विज्ञानाबद्दल गोडी वाढवण्यासाठी सतत प्रयत्न करत होतो. विज्ञान विषयाचं प्रेम कुणाला किती आहे आणि कुणाच्या मनात काय निर्माण होईल याचा अंदाज कधीच येत नसतो. त्यामुळे मुलांमध्ये आवड निर्माण करणे, त्यांना उत्तेजन देत राहणे हाच त्यावर उपाय असतो. हा दृष्टिकोन पुढे ठेवून मी आपल्या कार्यक्रमात, कार्यशाळेत वा शिबिरात जास्तीत जास्त मुलं सहभागी व्हावीत याकडे विशेष लक्ष देत होतो.

भारतातील सुमारे ३००० शाळांमधून मी व माझ्या सहकाऱ्यांनी मिळून कार्यशाळा घेतल्या असतील. या प्रकारच्या कार्यक्रमातून अनेक शिक्षकांना व विद्यार्थ्यांना मुलांसाठी विज्ञानप्रसार करण्याची प्रेरणा मिळाली. सुमारे २५ देशांमध्ये शिक्षक व विद्यार्थी या उपक्रमांचा प्रसार करत आहेत. ही शिबिरं व कार्यशाळा म्हणजे विद्यार्थी व शिक्षकांना एक महोत्सव वाटत असे. अत्यंत गोडीने, उत्साहाने सर्व जण सहभागी होत असत. येथील शिक्षण पाठ्यपुस्तकीय न राहता आनंद सोहळ्याचा एक भाग वाटू लागतो. खेळणी अद्‌भुत वाटू लागतात. शिक्षकही आश्चर्यचकित होतात. खेळण्यांचे प्रात्यक्षिक बघितलेले शिक्षक त्यानंतर खडू व फळा एवढीच शिकवण्याची साधनं न समजता, वापरून फेकून दिलेल्या प्लॅस्टिकच्या बाटल्या, रद्दी पेपर, लोहचुंबक, स्ट्रॉ, रिकामी पाकिटं, छोटे-मोठे डबे, बाटल्यांची बूचं, रबर बँड, थर्मोकोल, तुटलेल्या चपला, इत्यादींचा वापर करून वैज्ञानिक प्रयोग करू लागतात. त्यामागील सिद्धांत मुलांना समजावून देतात.

'खेल खेल में' या पुस्तकाला मिळालेल्या उदंड प्रतिसादामुळे प्रेरित होऊन मी विज्ञान सोपे करून सांगणारी अनेक पुस्तकं लिहिली. ही पुस्तकं सजवण्यासाठी अनेक कलाकारांची मी मदत घेतली. संगणकावरील कोरल ड्रॉ वा फोटोशॉपवरील सॉफ्टवेअर वापरून अनेक उलट-सुलट प्रयोग केले. पुस्तकांचे अनुवाद करण्यासाठी मित्रांना मी उत्तेजन दिले. पुस्तकं अनुवादित व्हावीत, कॉपीराइटच्या जंजाळात ती अडकू नयेत, अशी माझी इच्छा आहे. मी स्वतः ३५० हून जास्त पुस्तकांचे अनुवाद केलेले आहेत. नॅशनल बुक ट्रस्ट, एकलव्य प्रकाशन, केरळ शास्त्र साहित्य परिषद, NCERT, BGVS इत्यादी अनेक संस्थांनी या उपक्रमांना विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्यात पुढाकार घेतला, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

प्रश्न – तुमच्या पुस्तकवेडेपणाबद्दल भरपूर ऐकलेले आहे. त्याविषयी काही...

– मला अगदी लहानपणापासून पुस्तक वाचण्याचे, पुस्तकं विकत घेण्याचे वेड होते. या वेडेपणामुळे माझा मित्रपरिवारही जगभर पसरलेला आहे. मला स्वतःला आवडलेल्या पुस्तकाविषयी कुठल्या तरी मित्राला सांगितल्याशिवाय चैन पडत नाही. चांगल्या पुस्तकाच्या काही प्रती घेऊन त्या मित्रांमध्ये मी वाटतही होतो. झेरॉक्स मशिन्स आल्यानंतर माझ्यासाठी जणू आकाश ठेंगणे झाले! कारण पुस्तकाच्या प्रती वाटणे सोपे झाले होते.

प्रश्न – मी कुठे तरी वाचल्याचे स्मरते की, यानंतरच्या पिढीला शिकण्यासाठी अरविंद गुप्ता यांचे संस्थळ व खान ॲकॅडेमीचे गणितावरील संस्थळ (वेबसाईट) पुरेसे ठरेल. तुमच्या या साइटमध्ये नेमके काय काय आहे?

– मुलांचा विज्ञानविषयक दृष्टिकोन निकोप व्हावा,



मुलांनी या विषयात उत्सुकता दाखवावी, स्वतंत्रपणे काही करावे व अतिशय माफक अशा साहित्यातून प्रयोगांची निर्मिती करावी म्हणून मी www.arvindguptatoys.com या वेबसाइटची निर्मिती केली आणि माझी सर्व पुस्तकं या वेबसाइटवर फ्री डाऊनलोडसाठी उपलब्ध करून दिली. या वेबसाइटवरच 'टॉईज फ्रॉम ट्रॅश' या सदराखाली मी बनवलेल्या सर्व खेळण्यांबद्दलच्या व्हिडिओ फिल्म्ससुद्धा अपलोड केलेल्या आहेत. त्याचबरोबर - Million Books for a Billion People या ब्रीदवाक्याला स्मरून डी.डी. कोसंबी, लॉरी बेकर, अनिल अग्रवाल, वसंत पळशीकर, आर.ए.जागीरदार, असिमोव्ह, मार्टिन गार्डनर आदी लेखकांची पुस्तकं स्कॅन करून पीडीएफच्या स्वरूपात उपलब्ध करून दिलेली आहेत. गणित, रसायनशास्त्र, भौतिकी, खगोलशास्त्र इत्यादी अनेक विषयांवरील पुस्तकंसुद्धा या वेबसाइटवर आहेत. इंग्रजी, हिंदी, मराठी व इतर अनेक भाषांतील पुस्तकंसुद्धा येथे आहेत. ही पुस्तकं घरबसल्या वाचता येतात. पीडीएफ स्वरूपातील सुमारे ७७०० पुस्तकांचा हा 'आभासी ग्रंथालया'चा ठेवा या साइटमध्ये साकार झालेला आहे. TED या भाषणमालिकेतील मी केलेल्या प्रयोगाची ध्वनिचित्र-मुद्रिकाही या साइटवर आहे.

प्रश्न - आयुकातील विज्ञान केंद्रातून आपण कधी निवृत्त झालात व आता आपला कार्यक्रम कोणता?

- २०१३ च्या सुमारास काही शारीरिक तक्रारींमुळे दवाखान्यात गेलेलो असताना मला कॅन्सर झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. हा कॅन्सर प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे रेडिओथेरपीच्या काही सिटिंग्जमधून उपचार करता येईल, असे तज्ज्ञांचे मत होते. याच काळात वेल्लोर हॉस्पिटलमध्ये माझी मुलगी दुलारी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून एमडी करत होती. त्याच हॉस्पिटलमध्ये माझ्यावर रेडिओथेरपीचे उपचार करण्यात आले. सुमारे ४० सिटिंग्जमध्ये कॅन्सर आटोक्यात आणण्यात डॉक्टर्स यशस्वी झाले. एका मायनर ऑपरेशनसाठी मला त्या हॉस्पिटलमध्ये दोन महिन्यांसाठी वास्तव्य करावे लागले. या उपचाराच्या वेळीसुद्धा मी वेळ वाया न घालवता असिमोव्हच्या ११ पुस्तकांचे अनुवाद केले व वेळ सार्थकी लावला.

रेडिओथेरपी व इतर उपचारांमुळे मी या आजारातून पूर्णपणे बरा झालो आणि आयुकाच्या कामातून मुक्त होण्याचा निर्णय घेतला. निवृत्तीचा निर्णय घेत असतानाच पुढील कार्याची दिशा ठरवून टाकली. जग बदलू शकणाऱ्या २५ पुस्तकांची यादी केली व त्यांचे हिंदीत भावानुवाद करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले. या पुस्तकांचे शब्दशः अनुवाद न करता पुस्तक वाचून त्यातील आशय समजून घेऊन ३०-४० पानांतून हिंदी लेखन करून वाचकांसमोर ठेवण्याचा माझा इरादा होता. त्यानुसार मी कामाला लागलो. भावानुवाद करताना कॉपीराइटचा प्रश्न नसल्यामुळे ही पुस्तकं आता वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

अगदी लहानपणापासून पुस्तकांचे वेड असल्यामुळे जगभरातील चांगली-चांगली पुस्तकं शोधून त्यांचे स्कॅनिंग करून पीडीएफ स्वरूपात उपलब्ध करून देण्याचे कामही मी करत असतो. ही पुस्तकं www.archive.org या साइटवर अपलोड करतो. जागतिक साहित्यात चित्रमय बालसाहित्याला एक वेगळे स्थान आहे. अशा साहित्याचा शोध घेत त्यातील मूळ इंग्रजी भाषेऐवजी हिंदी भाषेचा साज चढवून ही पुस्तकं हिंदी भाषक मुलांसाठी उपलब्ध करून देण्याच्या कामातही मी मग्न आहे.

प्रश्न - तुमच्या विचारावर कुणा-कुणाचा प्रभाव आहे?

- माझ्या जडण-घडणीत अनेक मोठमोठ्या लोकांचा वाटा आहे. शंकर गुहा नियोगींच्या संघर्षात्मक कामात मी सहभागी होतो. आई रामदुलारी, शाळेतील मिसेस फ्रे ही शिक्षिका, डॉ.अनिल सद्गोपाल, प्रो.यशपाल, प्रो.कृष्णकुमार, जयंत नारळीकर, लीलाताई पाटील, डीडी कोसंबी, डॉ.नरेंद्र दाभोलकर, चिंचाळकर गुरुजी, यदुनाथ थत्ते आदींच्या बरोबरील संवाद मला प्रेरणादायी ठरले. प्रो.यशपाल जेव्हा-जेव्हा आयुकाच्या मुक्कामी येत असत, तेव्हा-तेव्हा मी सावलीसारखा त्यांच्याबरोबर राहत होतो. यशपाल यांच्या दिल्ली येथील एका कार्यक्रमात मी व डॉ.दाभोलकर एकाच खोलीत वास्तव्याला होतो, तेव्हा आमच्या अनेक विषयांवर गप्पा झाल्या, ही आठवण मी कधीच विसरू शकणार नाही.

(अरविंद गुप्ता यांची पत्नी सुनीता फर्ग्युसन कॉलेजमधून निवृत्त झाल्यानंतर हे दोघेही आता मुलगी दुलारीकडे चेन्नई येथे राहतात. दुलारीचा एक वर्षाचा मुलगा केदारबरोबर हसत-खेळत समाधानाचे जीवन जगत आहेत.)

संवादक : प्रभाकर नानावटी
Mob. 9503334895



अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार : सय

सई परांजपे



आत्मकथन या लेखनप्रकाराबाबत मी कायम साशंक राहिली आहे. आयुष्यात अनेक नाट्यपूर्ण घटना असतात, मानहानीचे प्रसंग असतात, प्रणयगाथा, प्रेमभंग, कलह अशा ठाऊक असलेल्या, नसलेल्या अनेक गोष्टी असतात. हे एकपात्री कथन असते. यातील दुसरी बाजू वाचणाऱ्याला कळत नाही. आत्मचरित्र म्हणजे दीड दांडीनं चोरटं माप देणारा तराजू आहे असं मला वाटतं. त्यामुळे माझं खाजगी आयुष्य बासनात गुंडाळून ठेवलं. पण माझ्या जीवनप्रवासात मी बरेच कलापूर्ण धाडसाचे उद्योग केले आहेत. त्याचा वृत्तांत रंगतदार, वैचित्र्यपूर्ण आणि रोमहर्षक खचित आहे. लोकांना आवर्जून सांगावा असा.



सई परांजपे
saiparajpye@hotmail.com



कलापूर्ण धाडसी उद्योगाचा रंगतदार वृत्तांत

पुण्याला अभिमान वाटावा अशी पुण्याची लाडकी लेक म्हणजे– सई परांजपे. आकाशवाणी (रेडिओ), बालरंगभूमी, चित्रपट दिग्दर्शन, नाट्यदिग्दर्शन, दूरदर्शन, अभिनय, लेखन– असे कोणतेही माध्यम नाही, ज्यातून सईने आपल्या कर्तृत्वाची मोहर उमटवली नाही. 'सई' म्हणजे आनंदाचे एक कारंजे आहे, ज्यामधून तिच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे तुषार रसिकांच्या मनाला चिंब-चिंब भिजवून टाकतात. प्रत्येक माध्यमात भरघोस यश मिळवूनही एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमाकडे जाण्याची सईची घाई-गडबड पाहणाऱ्याला अचंबित करते. 'असे का?' विचारल्यावर सई प्रामाणिकपणे सांगते– ''मी कर्तृत्वाची रिंगणे जाणीवपूर्वक बदलली नाहीत. एकातून एक वलये निघावीत तशी वेळोवेळी वेगवेगळी माध्यमे मला खुणावीत राहिली.'' सईने अनेक कलापूर्ण, धाडसी प्रयोग केले; हाती आलेल्या प्रत्येक माध्यमाला लीलया हाताळले.

सामाजिक बांधिलकीचा वारसा तिला कुटुंबातूनच मिळाला आहे. रँग्लर परांजपे यांची नात, पुरोगामी विचारांच्या शकुंतला परांजपे यांची कन्या. त्यामुळे सामाजिक समस्यांवर आधारित चित्रकृती, नाट्यकृती सई बनवीत राहिली. याशिवाय दिग्दर्शनाचा तिसरा डोळा तिला उपजतच लाभला आहे. त्यामुळे अंधजनांच्या विश्वात डोकावून पाहणारा तिचा 'स्पर्श' हा चित्रपट लोकप्रिय झाला. करमणुकीच्या क्षेत्रातील बहुविध कामगिरीबद्दल सईला 'पद्मभूषण' हा सन्मान प्राप्त झाला. सईला नेहमी विचारले जाते की, 'स्वत: स्त्री असूनही, स्त्रीसमस्यांवर आधारित लेखन, चित्रपट, नाटक का नाही लिहिले?' यावर ती ताड्कन उत्तर देते– ''मी बायकांची वकिली केलीच पाहिजे का? मी माणूस आहे, माणसांबद्दल लिहिते ते पुरेसे आहे.'' सईच्या मनमोकळ्या स्वभावाला फटकळपणाची अशी पुणेरी धार आहे.

पुढे मात्र तिने 'माझा खेळ मांडू दे' हे नाटक, 'चुडिया' हा लघुपट (राष्ट्रीय पारितोषिक विजेता) स्त्रीसमस्यांवर आधारित बनविला.

'सय' वाचताना वाटतं की, आपण चक्क सईबरोबर गप्पा मारत आहोत. पुस्तकाची भाषा तशीच थेट, चुरचुरीत, चमकदार आहे. संस्कृतचे सारे अलंकार ल्यायलेली शुद्ध मराठी आहे. आपल्या कलाजीवनाचा प्रवास सई अतिशय प्रामाणिकपणे आणि रंजकतेने वाचकांपुढे मांडते. त्यातून तिची निर्मितीक्षमता तिचा आत्मविश्वास आणि लेखनाला दिलेली विनोदाची खमंग फोडणी वाचकांच्या मनाला उल्हसित करते.

सईने हिंदी भाषेच्या प्रमुख प्रवाहात, (फीचर फिल्मस्) दिमाखाने तरंगणारे अनेक चित्रपट बनविले. कथा, चष्मेबद्दुर, साज वगैरे. त्यामध्ये फावडे, कुऱ्हाड घेऊन बारा वर्षे हाताने विहीर खोदाई करणारा सोमा रसिकांना 'दिशा' चित्रपटात भेटतो. हाच 'दिशा' २३ विविध राष्ट्रांत दाखविला गेला. कान्सच्या चित्रपट महोत्सवात वाखाणला गेला. भाबड्या वनवासीयांनी झाडाला कंटाळून जंगले वाचवण्याची 'चिपको' चळवळ, ही मध्यवर्ती कल्पना घेऊन सईचा 'पपीहा' पडद्यावर झळकला. 'स्पर्श' चित्रपटाला तीन राष्ट्रीय पुरस्कार लाभले. समीक्षक आणि सामान्यजन दोहोंच्या पसंतीला भावलेला हा चित्रपट सईच्या मुकुटातला कोहिनूर आहे.

परांजपे कुटुंबीय संस्कृतप्रेमी. सईलाही त्यामुळे संस्कृतचा व्यासंग जडला. भृतृहरीच्या एका सुभाषितावर आधारित 'धिक ताम' हे नाटक सईने अप्रतिम बेतले आहे.

परांजप्यांच्या घरात मांजरांचा सुळसुळाट होता. याच मांजरांमुळे सईचे बालपण रम्य बनले. 'जास्वंदी' नाटकात



माणसाच्या वेषातली दोन मांजरे रंगभूमीवर सादर करून एक अफलातून गंमत सई उडवून देते. हीच मांजरे, मनुष्य जातीवर भाष्य करतात तेव्हा प्रेक्षकांच्या मनात विषादाची लहेर उमटली जाते. सईच्यामते कारुण्याचा उगम विनोदातूनच होतो.

दिल्ली दूरदर्शनवर 'प्रोड्युसर' म्हणून काम करताना सईने दिल्लीकरांना मराठी मंगळागौर दाखविली. सईला पु.ल.देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. हे विशेष! पुढे मुंबई दूरदर्शनवर पहिला कार्यक्रम सादर करण्याचा सन्मान सईला मिळाला. अनेक नवे कार्यक्रम, लघुपट, टेलिनाटके, फ्रान्स-जर्मनीचे अभ्यासदौरे दूरदर्शनच्या काळात सईने केले.

सईच्या मते लघुपटांसाठी दूरदर्शन हा उत्तम मंच आहे. तिने अनेक लघुपट बनविले. लंडनमध्ये निर्मिलेला 'द हेल्पिंग हँड' सामाजिक समस्यांवर आधारित चुडिया, सुई हे वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

पुणे आकाशवाणीच्या बालोद्यानमधून स्फूर्ती घेऊन सईने बालरंगभूमी सुरू केली. त्यासाठी बालचमूंना आवडतील असे नाट्यलेखन केले. पत्तेनगरीत, जादूचा शंख, शेपटीचा शाप ही स्वलिखित बालनाट्ये चांगलीच बालप्रिय बनली. या बालचित्र समितीची अध्यक्ष म्हणूनही सईची कारकीर्द गाजली. सर्व कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा चित्रसमितीच्या कृतीचा निषेध म्हणून आर्थिक नुकसान सोसूनही सईने राजीनामा देऊन बाणेदारपणाने कर्मचाऱ्यांना पाठिंबा दिला.

मराठी लोकनाट्याचा 'एक अच्छा खासा तमाशा' बनवून सईने हिंदी रंगभूमीवर सादर केला. मराठी लोकप्रिय नाटकांचे सररशीत हिंदी रूपांतर केले. त्यात व्यंकटेश माडगूळकर यांचे 'तू वेडा कुंभार' खास गाजले.

पुण्यातील एफटीआयमध्ये विद्यार्थ्यांना अभिनय तंत्र, आवाज आणि शब्दोच्चारण नियंत्रण शिकविण्याची संधी सईला मिळाली. अर्थातच तिने संधीचे सोने केले.

सईच्या सर्व चित्रपटांचा, नाटकांचा परामर्ष घेण्याचा येथे (जागेअभावी) प्रयत्न केलेला नाही. 'सय'मध्ये सई वाचकांना दिलखुलासपणे भेटत राहते. तिच्या खट्याळ व्यक्तिमत्त्वाचे लडिवाळ पैलू विविध रंगात वाचकांना भिडत राहतात. सईने स्वत:च्या शैलीच्या कलाकृती बनविल्या. दिग्दर्शक म्हणून तिची खास प्रतिमा बनलेली आहे. नाट्य-चित्रपट इतिहास लिहिताना तिची दखल घ्यावीच लागेल.अशा या सईशी साधलेला हा संवाद.

प्रश्न – तुमच्या आईचा तुमच्या व्यक्तिमत्त्वावर किती प्रभाव पडलेला आहे?

– माझ्या आईच्या रक्तातच बंडखोरी होती. ती जगाच्या पुढे- भारतीय व मराठी समाजाच्या पुढे- किमान १०० वर्षे तरी अग्रेसर होती. तिचा परदेशी युवकाबरोबरचा (माझे वडील) विवाह, विवाहविच्छेद, संततिनियमनाचा पुरस्कार, चित्रपटातून अभिनय- सारेच निर्णय धडाडीचे होते. तिला जे पटले-भावले, ते तिने केले. संस्कृतची आवड तिच्यामुळेच माझ्यात निर्माण झाली. श्लोक, सुभाषिते मुखोद्‌गत झाली.

प्रश्न – तुला अभिनयाचे अंग होते, व्यक्तिमत्त्व आकर्षक होते; तरी अभिनेत्री न बनता दिग्दर्शनाची वाट कशी आणि का निवडली?

– दिग्दर्शक हा सव्यसाची असावा लागतो. त्याचे चौफेर लक्ष असणेही गरजेचे असते. दिग्दर्शक नट घडवतो, नाट्याची निर्मिती करतो. त्या-त्या कलाकृतीवर दिग्दर्शकाची छाप असते. दिग्दर्शकाला पटकथेचे भान ठेवावे लागते. कॅमेऱ्याचे अँगल्स समजावे लागतात. संगीताचा कान लागतो. नाट्यकृतीही अशीच असते. मुळात माझ्या व्यक्तिमत्त्वाचा बाज हा लेखकाचा आहे. लेखनात नाट्यमयता असावी लागते. मला घटना/विषय लेखनाला प्रवृत्त करतात. टेलिमालिका दिग्दर्शित करताना प्रत्येक एपिसोड कलापूर्ण असावा लागतो. त्या एपिसोडचा शेवट उत्कंठा वाढविणारा असणे महत्त्वाचे असते. तरच पुढचा भाग रसिक पाहण्यास उत्सुक राहतात. निवडलेल्या माध्यमावर पकड घेता आली की, उत्तम कलाकृती बनते. मला असा सर्वांगीण ठसा आवडतो म्हणून आणि मला संधी उपलब्ध होत गेली म्हणून, मी टीमचा कॅप्टन किंवा दिग्दर्शक बनले.

प्रश्न – मराठी मातृभाषा; पण चित्रपट, दूरदर्शन मालिका, लघुपट यामध्ये एकही मराठीभाषक का नाही?

– अधिकाधिक लोकांपर्यंत पोचण्यासाठी हिंदी भाषा निवडली. त्यामुळे सर्व भाषांतील प्रेक्षक मिळाले. माझी नाटके मराठीत आहेतच की आणि ती लोकांना आवडलीही आहेत. हिंदीमुळे नाव, लोकप्रियता आणि समाधान मिळाले. मी व्यवहाराला कच्ची आहे. त्यामुळे पैसे नाही मिळाले, पण मला काम करण्याचा आनंद मिळाला, हे नक्की.

प्रश्न – आंतरराष्ट्रीय स्तरावर पोचण्याची क्षमता असूनही फिल्मफेअर ॲवार्ड, नॅशनल ॲवार्ड इथपर्यंतच



मजल गेली याचा खेद होतो का?

– ॲवॉर्डपेक्षा लोकमानसात पोचणे मला अधिक महत्त्वाचे वाटते. माझा 'दिशा' चित्रपट अतिशय चांगली निर्मिती होती, पण त्याला पॅनोरमात स्थान नाही मिळाले. 'हा सिनेमा पॅनोरमात कसा नाही?' असे लोकांनी विचारले, यातच सारे आले, अशी माझी धारणा आहे. 'स्पर्श'ने एकाच वेळी निर्मिती, पटकथा, अभिनय आणि दिग्दर्शन अशी अनेक आघाड्यांवर हुकूमत मिळविली, ॲवॉर्ड्सही मिळविली. 'दिशा' हा २३ राष्ट्रांत पोचला. परकीयांनी, पाश्चात्त्य राष्ट्रांनी वाखाणला. मला आनंद झाला. माझे 'जास्वंदी' नाटक इतर भाषांत अनुवादित होऊन रंगमंचावर आले. 'भागो भूत' आंतरराष्ट्रीय महिला दिग्दर्शकांच्या मेळाव्यात बाजी मारून गेला. माझी बालनाट्ये अजूनही रंगभूमीवर साकारली जातात. तेव्हाचे कलाकार, हीरो, हिरोईन कधी तरी भेटतात. त्यांचे थकलेले रूप पाहून मलाच माझे 'वय झाले' असा निरोप मिळतो.

प्रश्न – विषयाची मांडणी विनोदी ढंगाने करायला जास्त आवडते का? 'विनोद' जवळचा वाटतो?

– माझा पिंडच विनोदी आहे. कुठल्याही घटनेतला विनोद मला अगोदर जाणवतो. ही वारसाहक्काने मिळालेली देणगी आहे, असे मला वाटते. कारण आईलाही विनोदाची उत्तम जाण होती. संस्कृत वाङ्‌मयाचा प्रभाव, आवड असल्यामुळे माझ्या लेखनामध्ये विनोद सातत्याने डोकावतो. शाब्दिक कोट्यांपेक्षाही मला प्रासंगिक विनोद जास्त आवडतात. अनेक वेळा खऱ्या विनोदातूनच कारुण्य झिरपते. 'जास्वंदी' नाटकात मन्या-बन्या ही मांजरे विनोद करतात, त्यामागे विषाद असतो.

प्रश्न – अनेक माध्यमे हाताळलीस; त्यातील कोणत्या माध्यमातून काम करायला जास्त आवडले?


– 'आकाशवाणी'! एक तर माझ्या कलाजीवनाची सुरुवात 'आकाशवाणी'पासून झाली. 'पहिलं प्रेम' म्हणा हवं तर! केवळ आवाजाच्या परिणामातून व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देण्याची जबाबदारी कलाकारावर असते. एखादी फुलत जाणारी प्रेमकथा... रोमांचित करणारी कविता, अंगावर शहारा आणणारा भयप्रसंग, सारं काही केवळ आवाजाच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोचवायचं– हे आव्हान मला फार आवडतं. आवाजाला मर्यादा असतात. श्रोत्यांच्या कल्पनाशक्तीला समजून घ्यावं लागतं. पण तरीही एकाच वेळी अनेकांचं अनेक विविध वयांच्या व्यक्तींचं मनोरंजन करता येतं. म्हणून मला 'रेडिओ' हे माध्यम जास्त आवडतं आणि माझ्या वैयक्तिक स्तरावरही, माझ्या तरुण वयाची ती उमलणारी प्रतिबिंबं होती. माझं कलाजीवन आणि भावजीवन येथेच समृद्ध झालं.

गायक, राजकारणी, चित्रकार, कलावंत... अनेक स्त्री-पुरुष मला रेडिओवर भेटले. माझं व्यक्तिमत्त्व समृद्ध झालं, माझी उपकृत भावना आहे या रेडिओमागे. मला प्रसिद्धीची अनुभूती येथेच पहिल्यांदा मिळाली. आजही 'रेडिओ' म्हटलं की, आनंदाची लाट मनात उमटते.

प्रश्न – नैराश्य, डिप्रेशन असा अनुभव आयुष्यात आला का?

– होऽ अनेकदा! त्यावर मात करण्याचा हमखास फॉर्म्युला मात्र सापडला नाही. मी कलाकार अधिक आहे, मला व्यवहार समजत नाही. अनेकदा माझ्या कलाकृतीवर दुसराच कोणी तरी भाव मिळवून जातो, तेव्हा वाईट वाटतेच. अपयशाची चव चाखली की, यश लज्जतदार वाटते. लोक व्यवहारी वागतात म्हणजे काय? कबूल करूनही पैसा, वेळ, शब्द पाळत नाहीत. संवेदनशील मनाला याचा त्रास होतो.

प्रश्न – चित्रपट, नाटक, दूरदर्शन, लेखन अशा सर्व माध्यमांत भरघोस यश मिळवूनही एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमाकडे वळण्याची घाई, गडबड, प्रयत्न का केले?





– एक तर धावपळ करण्याचा माझा स्वभाव आहे. मला नावीन्याची फार हौस आहे. एकच एक गोष्ट करण्याचा मला लवकरच कंटाळाही येतो. बालरंगभूमीवर मुलांबरोबर बागडताना, या बालचमूला चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांपुढे न्यायला हवं असं वाटलं, म्हणून बालचित्रपट बनविले.

चित्रपटाची कथा पडद्यावर आली, ती लोकांना आवडली की नाही... बॉक्स ऑफिसवर चित्रपट चालला की नाही याचा विचार मी कधीच केला नाही. कारण तोवर माझ्या कानांत नाटकाची तिसरी घंटा वाजू लागायची. समाजातली एखादी घटना वृत्तपत्रातून, टीव्ही-रेडिओच्या बातम्यांतून कानांवर यायची. मन व्यापून टाकायची. वाटायचं- 'ही सारी दुःख नागवी करून जगापुढे मांडायला पाहिजेत.' त्यातूनच 'दिशा', 'स्पर्श'सारखे चित्रपट बनविले गेले. चुडिया, सुई यांसारखे लघुपट बनविण्याची ऊर्जा तत्कालीन परिस्थितीतून निर्माण झाली. एकदा कोणी तरी म्हणाले, माझा 'चष्मेबद्दूर' हा सिनेमा म्हणजे दिल्ली शहरावर बनविलेला जाहिरातपट आहे. ते मी नाकारलं. कारण मला वाटतं, 'चष्मेबद्दूर' हे दिल्ली शहराला लिहिलेलं माझं प्रेमपत्र आहे.

लेखनकला तर आईने माझ्या पाचवीलाच पूजली असावी. नाटक, कथा, पटकथा, नाट्यरूपांतर यामध्ये- या साऱ्या लेखनप्रक्रियेमध्ये मी मनापासून हरवून जाते. 'सय' हे माझं आत्मकथन असंच अचानक आकाराला आलं. आठवणींच्या प्रवाहात मी अगदी नखशिखांत न्हाऊन निघाले. सय- माझ्या कलाप्रवासावर आधारित आहे. माझ्या जीवनातल्या घटनांवर मी फारसं भाष्य केलेलं नाही. माझं भावजीवन आणि कलाजीवन हातात हात घालूनच पुढे जात राहिलं. अजूनही खूप सारं सांगायचं आहे... बघू या!

प्रश्न – चिल्ड्रेन्स थिएटरची चळवळ पुण्यात सुरू झाली, पुढे दिल्लीला का नाही पोचली?

– पुण्यात आकाशवाणीच्या बालोद्यानमुळे मुलांशी माझा सतत संपर्क होता. अनेक गुणी, होतकरू मुले माझ्या सभोवताली बागडत असत. दिल्लीला मी पोचले ती एनएसडीमुळे. नॅशनल स्कूल ऑफ ड्रामामध्ये शिकायला. तिथे वेळच मिळायचा नाही. नंतर दूरदर्शनवर निर्माती म्हणून रुजू झाले. या साऱ्या धावपळीत, गदारोळात मुलांच्या जगापासून जरा दुरावले. त्यातून दिल्लीतील स्थळं सारी दूरऽऽ दूर. पुण्यातले गल्लीबोळ कसे आपुलकी साधणारे! यामुळे मीच सुरू केलेले चिल्ड्रेन्स थिएटर दिल्लीच्या रंगभूमीवर मात्र रंगू शकले नाही.

प्रश्न – 'सय- माझा कलाप्रवास' हे पुस्तक एक प्रांजळ स्वनिवेदन आहे, निर्भेळ वृत्तांत आहे. तुझ्या लेखणीतून उतरून रसिकांच्या मनाचा ठाव घेणारे हे पुस्तक रूढ अर्थाने आत्मवृत्त म्हणता येणार नाही. काही खाजगी घटनांचा उल्लेख या पुस्तकात आहे, पण कलाप्रवासाच्या संदर्भात त्या प्रसंगांचे वर्णन आहे. मातोश्री शकुंताबाई परांजपे यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी त्यांच्या प्रभावाबद्दल मात्र खुलून मोकळेपणे लिहिले आहे. तर सईताई, मुळात आत्मवृत्त किंवा आत्मकथन करावं असं तुझ्या मनात कसं आलं?

– आत्मकथन या लेखनप्रकाराबाबत मी कायम साशंक राहिली आहे. आयुष्यात अनेक नाट्यपूर्ण घटना असतात, मानहानीचे प्रसंग असतात, प्रणयगाथा, प्रेमभंग, कलह अशा ठाऊक असलेल्या, नसलेल्या अनेक गोष्टी असतात. हे एकपात्री कथन असते. यातील दुसरी बाजू वाचणाऱ्याला कळत नाही. आत्मचरित्र म्हणजे दीड

आई आणि आप्पा यांच्यासोबत सई





दांडीनं चोरटं माप देणारा तराजू आहे असं मला वाटतं. त्यामुळे माझं खाजगी आयुष्य बासनात गुंडाळून ठेवलं. पण माझ्या जीवनप्रवासात मी बरेच कलापूर्ण धाडसाचे उद्योग केले आहेत. त्याचा वृत्तांत रंगतदार, वैचित्र्यपूर्ण आणि रोमहर्षक खचित आहे. लोकांना आवर्जून सांगावा असा. माझ्या लिखाणाद्वारा आणि आकाशवाणी, बालरंगभूमी, हिंदी, मराठी रंगभूमी, दूरदर्शन, चित्रपट, लघुपट, बालचित्रपट इत्यादी माध्यमातून मी भरीव कामगिरी केली आहे असं उसना विनय बाजूला सारून मी म्हणू शकते.

या कामगिरीचा वृत्तांत छातीत दम आणि लेखणीत ताकद आहे, तोवर लिहून काढावा असा स्तुत्य विचार अनेकदा मनात डोकावला आणि तो तसाच जिरूनही गेला. कागद कोराच राहिला. नंतर 'लोकसत्ता' हे वृत्तपत्र, त्याचे संपादक गिरीश कुबेर हे मला लिहितं करायला कारणीभूत झाले.

प्रश्न – 'सय' आकाराला कसं आलं?

– गिरीश कुबेर यांना 'सय'च्या निमित्ताने मी प्रथमच भेटले. लोकसत्ताच्या रविवारच्या 'लोकरंग' या पुरवणीत 'सय' या नावाने २०१५ मध्ये वर्षभर लेखमाला प्रकाशित करण्याचा आमचा निर्णय झाला. माझ्या लेखनाचा आणि विविध प्रसारमाध्यमातून केलेल्या कामगिरीचा आढावा घेणारे लेख या सदरातून झळकू लागले. जुन्या फायली, कात्रणे, अल्बम, परीक्षणं, अभ्यासून बुधवारची डेडलाईन गाठण्याची माझी तारेवरची कसरत सुरू झाली. कारण लेख दर रविवारी प्रकाशित होत. जुन्या अनुभवाला पुन्हा उजाळा देणं हे जोखमीचं काम होतं. घटना, व्यक्ती, तपशील यांबद्दल माझी स्मरणशक्ती तल्लख आहे, पण तारखा आणि काळ यांची आकडेवारी मला आठवत नाही. हे नाटक आधी की तो सिनेमा आधी हे मला सांगता येत नाही. शेवटी हे बारकावे सोडून दिले आणि घटना आठवल्याशी कारण असे समजून लेखनाला सुरुवात केली.

मी तब्येतीत, सुखावून लिहीत गेले. लेखणीला जणू कैफ चढला होता. 'सय'ची मुदत डिसेंबर अखेरपर्यंतच आहे हे मला सुरुवातीला माहीत नव्हतं. मी लेखमालेच्या गुंत्यात अडकले, गुरफटले होते आणि अचानक अंतिम भोज्या पुढे उभा ठाकला! जीव ओतून उभी केलेली लेखमाला, कशीतरी वेठ मारून मला पूर्ण करायची नव्हती. सुदैवाने मला थोडसं विरामचिन्हं मिळालं असं म्हणता येईल. लेखमाला चालू असतानाच चार-पाच मान्यवर प्रकाशनगृहांकडून लेखमालेचं पुस्तकात रूपांतर करण्याची विचारणा झाली होती. पुण्यातील 'राजहंस'नं अनेक दर्जेदार आत्मवृत्तं छापली होती. शिवाय प्रकाशित पुस्तके वाचकांपर्यंत पोचविण्याची त्यांची हातोटीही सर्वज्ञात होती, त्यामुळे 'सय' राजहंसद्वारे प्रकाशित झाले.

मी लिहीत गेले. तुटलेले धागे जुळवून, संथपणे लिहीत गेले. यात पृष्ठसंख्या वाढू लागली. एक दिवस दिलीप माजगावकरांचा फोन आला. त्यांनी धोक्याची घंटा वाजवली, मग सिनेमाचा 'रफकट' किंवा कच्ची फिल्म, एडिटर जसा कात्री लावून कापतो तशी मी लेखणीला टोपणी घातली. जड अंत:करणाने काटछाट केली आणि 'सय' आकारले.

प्रश्न – वाचकांचा प्रतिसाद कसा लाभला?

– 'सय'ला वाचकांचा जोरदार प्रतिसाद लाभला. आधुनिक वाचक प्रेमानं, मेल धाडू लागले. मीही संगणकाची कास धरली. प्रत्येक मेलला उत्तर पाठविलं. या मेलच्या महापूराच्या लाटांवर, वल्हं म्हणून हातात लेखणी घेऊन मी फार मजेत, काही महिने हेलावत काढले. फारच बहारदार अनुभव होता तो. सप्टेंबर २०१६ मध्ये 'सय' प्रकाशित झाले. नंतर थोड्याच कालावधीमध्ये 'सय'च्या चार आवृत्त्या आल्या. मराठी भाषिक रसिकांचे आभार. आकाशवाणी मुंबईच्या 'अस्मिता' वाहिनीवरून, 'सय'मधली प्रकरणे अभिवाचनातून प्रसारित होत आहेत. आकाशवाणीचा लोभ आहेच, तो वृद्धिंगत होतो आहे.

प्रश्न – भविष्यात नवं काय बनविण्याचे मनसुबे आहेत?

– पोर्तुगीज भाषेतील एक कथा आवडली आहे. त्या कथेतील आजोबांच्या व्यक्तिरेखेवर आधारित 'शापाय'– हा चित्रपट करावा, असे वाटते. चित्रपट अर्थातच हिंदीत; पण साऱ्या गोष्टी माझ्या मनाप्रमाणे जुळून आल्या, तरच!

संवादक : संध्या देवरूखकर
Mob. 9850607890



ललित ग्रंथ पुरस्कार : धग असतेच आसपास

कल्पना दुधाळ



'सिझर'च्या वेळी कविता नेमकी काय असते, हे मला फार माहीत नव्हतं. परंतु 'धग'च्या वेळी आपण कविता लिहितोय, याची पुरेपूर जाणीव मला होती. टेंभुर्णीतल्या दगडाधोंड्यातल्या पायवाटांवरची चिकनमाती पुण्यातल्या रस्त्यांवर गळून पडली आणि पुन्हा बोरीभडकच्या चिकनमातीने चटके देत वास्तवाचे भान आणले. कवितेतला प्रत्येक शब्द, प्रत्येक ओळ याला काहीतरी अर्थ आहे. कविता लिहून पूर्ण झाली की माझं मीच प्रत्येक कवितेला तीन प्रश्न विचारू लागले. ते म्हणजे, या कवितेत नवीन काय आहे? या कवितेत उत्कटता, संवेदनशीलता आहे का? आणि बाकीच्या कवितांपेक्षा ही कविता वेगळी आहे काय?



कल्पना दुधाळ,
दौंड, पुणे
Mob. 9923627218



बोरीभडकच्या चिकनमातीने वास्तवाचे भान आणले !

‘सिझर कर म्हणतेय माती’ या काव्यसंग्रहामुळे चर्चेत आलेलं कल्पना दुधाळ हे नाव आजमितीला ‘धग असतेच आसपास’ या संग्रहामुळे मराठी कवितेच्या प्रांतात बऱ्यापैकी स्थिरावलेले आहे. अवघ्या दहा वर्षांच्या लेखनाच्या कारकिर्दीत त्यांचे हे दोन कवितासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. या दोन्हीही संग्रहांना चांगला प्रतिसाद वाचक, जाणकारांकडून मिळत आहे.

शिक्षण-वाचन-लेखनाची कसलीही परंपरा नसलेल्या शेतकरी कुटुंबातून कल्पना दुधाळ आलेल्या आहेत. स्वाभाविकच आधी वाचन करून मग कवितालेखनाकडे वळण्याचा प्रकार त्यांच्या बाबतीत झालेला नाही. या अर्थाने त्यांचा पहिला संग्रह आला त्यावेळपर्यंत त्यांची पाटी कोरी होती. त्यामुळे ही कविता प्रत्यक्ष शेती करताना आलेल्या उत्कट अनुभवाच्या बळावर उगवून येते. त्या अर्थाने या कवितेवर विशिष्ट लेखकाचा वा विचारांचा प्रभाव नाही, असे म्हणता येते. ही कविता एका कष्टकरी स्त्रीच्या समृद्ध अनुभवाधिष्ठित पायावर उभारलेली असल्याने ती नवी आणि आशय दृष्ट्या निराळी ठरते. अनुभवाला श्रमण संस्कृती-परंपरेत खूप महत्त्व असते. कारण ‘आधी केलं, मग सांगितलं’ असं ते ‘अनुभवाधिष्ठित’ असतं. महानुभाव कवयित्री महदंबा, संत मुक्ताबाई, संत सोयराबाई, संत निर्मळाबाई, संत बहिणाबाई, जनाबाई, जिजाऊ, अहिल्याबाई, सावित्रीबाई फुले, फातिमाबी, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे आणि बहिणाबाई चौधरी अशा या सशक्त कष्टकरी स्त्री श्रमणपरंपरेच्या पार्श्वभूमीवर दुधाळ यांच्या कवितेचा विचार केल्यास त्यांच्या कवितेचे महत्त्व लक्षात येते. ही परंपरा समजून न घेतल्याने मग ‘कल्पना दुधाळ यांना कविता लिहिता येत नाही’ किंवा ‘ही काय कविता आहे काय?’ अशी पाठांतरवादी संकुचित समीक्षा होत राहते.

दुधाळ यांची कविता ‘सापडले वर्म सोपे, न सुटे संसार पडतसे मिठी’ या संत निर्मळाबाईंच्या उक्तीप्रमाणे दैनंदिन प्रत्यक्ष घर आणि शेती यातील अनुभविक कष्टातून तावून-सुलाखून पुढे सरकत राहते. कारण आपल्या जगण्यावागण्याचं मर्म हे असं कुठे पुस्तकात-ग्रंथात सापडत नाही, तर नित्य जगण्याच्या धडपडीतून अनुभवाच्या रूपाने सापडत राहतं. अनुभव नेहमीच महागडा असतो. ही कवयित्री प्रत्यक्ष शेतात राबणारी आहे. ती शहरात वा केवळ घरात बसून, फावल्या वेळात रंजन म्हणून कविता करणारी नाही. त्यामुळे त्यांच्या कवितेतील शब्दाला एक प्रकारची ‘धग’ आहे, जी उसनी आणता येत नाही. ती उपजत आणि स्वाभाविकच यावी लागते. हे ‘स्वाभाविक येणं’ सोशिकतेवर आधारित असतं, जी ‘आमुचे सुख-दु:ख कोणा दुजा वारी’ असं संत सोयराबाईंनी म्हटल्याप्रमाणे जगण्याच्या अनिवार धडपडीतून येते. सोशिकता पचवूनच ही कविता सिद्ध होते. अशा या कवयित्री कल्पना दुधाळ यांच्याशी आपण संवाद साधू या.

प्रश्न – कोणत्याही लेखकाच्या लेखनाची मुळं त्याच्या जडणघडणीत सापडतात, असं म्हटलं जातं. तेव्हा तुमचे बालपण, शालेय-महाविद्यालयीन जीवना-विषयी जाणून घ्यायला आवडेल.

– टेंभुर्णी (ता. माढा, जि. सोलापूर) हे माझं मूळ गाव. म्हणजे माझं माहेर. टेंभुर्णीपासून चार किलोमीटर अंतरावर आमची शेती आहे. घर (वस्ती) शेतातच आहे. गावात माझं जाणंयेणं म्हणजे शाळा किंवा तत्सम कारणांसाठी व्हायचं. घरात आम्ही चौघे भावंडं, आजी-आजोबा, आई-वडील, चुलते अशी कर्ती माणसं होती.



घरापासून माझी जिल्हा परिषदेची शाळा चार किलोमीटर लांब होती. उन्हाळा-हिवाळा-पावसाळा असो आम्ही चालत जायचो-यायचो. पावसाळ्यात आभाळ भरून यायचं, विजा चमकायच्या, सायंकाळची पाच-सहाची वेळ असायची, दिवस मावळू लागलेला असायचा, हे पाहून मग घरी जाताना खूप भीती वाटायची. रस्त्यात ओढा होता. त्या ओढ्याला पाणी यायचं. मग एकमेकींच्या हाताला धरून भीत भीतच आम्ही ओढा ओलांडत असू.

घरची, शेतातली कामं निघाली की मग शाळेला सुट्टी. म्हणजे भुईमूगाच्या शेंगा काढायला आल्या की शाळा सोडून शेतात काम करावं लागायचं. अशा परिस्थितीत कसंबसं शिक्षण चालू होतं. पण शिकण्याची खूप ओढ होती. त्यामुळे मी अभ्यासही खूप करायचे. दहावीला टेंभुर्णीच्या सेंटरमधून माझा पहिला नंबर आला होता. दहावी-बारावी झाली की मुलींचं लग्न करून टाकायचं, असं त्यावेळी होतं. माझ्या बहिणीचं दहावीत असताना लग्न झालं. आपलंही लग्न उरकून टाकू नये म्हणून 'आपण जर चांगला अभ्यास केला, दरवर्षी पहिला नंबर आला, तर हुशारीकडे पाहून आपलं लग्न न करता, पुढे शिकायची परवानगी मिळेल' असं वाटायचं. पहिल्या नंबराने पास होऊ लागल्यामुळे 'ही हुशार आहे, हिला शिकू दिलं पाहिजे,' असं घरच्यांना वाटू लागलं. बारावी पण झाली. मग चुलते म्हणायला लागले, 'पुढच्या शिक्षणासाठी हिला पुण्याला नेतो.' मग चुलत्यांनी पुण्यात एसएनडीटीला ॲडमिशन घेतलं. पुण्यात आले तेव्हा मी खूप बुजलेली होते. अवतार गावाकडच्या मुलीप्रमाणे होता. त्यामुळे कोणात मिसळणं, कोणाशी बोलणं वगैरे असं काही होत नव्हतं. मैत्रिणी झालेल्या नव्हत्या. त्यामुळे आपलं इथं कसं होईल, असं वाटायचं. लायब्ररी मिळाल्यावर मग करमायला लागलं. लेखक वगैरे या अशा गोष्टी तेव्हा काहीच कळायच्या नाहीत. 'आता बास झालं हिचं शिक्षण' असं म्हणून घरच्यांनी तिसऱ्या वर्षी माझं लग्न ठरवलं. लग्न झाल्यावर मी तिसऱ्या वर्षाची परीक्षा दिली आणि मला डिस्टिंक्शन मिळालं. लग्नामुळे तुटलेल्या मैत्रिणी परीक्षेमुळे पुन्हा भेटल्या. त्या म्हणायच्या 'मी इकडे एमएला ॲडमिशन घेतलं,' कोणी म्हणायची 'मी अमुक करत्येय' वगैरे वगैरे. त्यांचं पुढचं शिक्षण चालूच होतं. माझं मात्र मध्येच लग्नामुळे शिक्षण सुटलं होतं. मैत्रिणींच्या अशा गोष्टी ऐकून मला राहावयाचं नाही. त्यामुळे मी त्यांच्याशी असलेला संपर्क जाणीवपूर्वक तोडून टाकला.

प्रश्न – आपण स्वत: कविता लिहावी असं पहिल्यांदा प्रकर्षानं कधी वाटलं?

– शाळेमध्ये असताना माझे निबंध वगैरे छान असायचे. पण कविता काही लिहिली नव्हती. एसएनडीटीला शिकताना मी घरापासून दूर गेले होते, घराची ओढ लागलेली असायची. तेव्हा कधी तरी मी कविता लिहिली. त्या कविता फार अर्थपूर्ण होत्या असं नव्हे. पण साधारणपणे जे लिहायला हवं किंवा जे लिहिलं जातं, अशी ती सामान्य कविता होती. खरी कविता मी लग्नानंतर शेती करायला लागले, तेव्हा लिहिली. लग्नानंतर घरातली सगळी कामंधामं उरकून रोजच शेतात जावं लागायचं. पण मी काही आनंदाने शेतात जात होते अशातला भाग नव्हता. कारण ग्रॅज्युएशनपर्यंत माझं शिक्षण झालेलं होतं, त्यामुळे डोक्यात एक 'हवा' होती. आमच्या सबंध घरात ग्रॅज्युएट झालेली मी पहिली मुलगी होते. इतकं शिकूनही रोजच घरात-शेतात राब राबावं लागत असेल तर आपल्या शिक्षणाचा काय उपयोग, असं वाटून खूप अस्वस्थ होत होते. आपण काही तरी केलं पाहिजे, असं सारखं सारखं वाटायचं.

शेती करताना मला सतत जाणवायचं की आपण शिकलो आहोत खरं, पण यातून आपण स्वत:ला शोधत गेलं पाहिजे. त्यावेळी आम्ही केळी लावली होती. शेतीचं जे काही काम असेल ते आम्ही घरच्या घरी सगळे जण करायचो. म्हणजे अगदी रोपं करण्यापासून प्रत्येक गोष्ट असू दे, आम्ही घरचे सगळे लोक त्यातच गुंतलेलो असायचो. केळीला जेव्हा पहिला घड आला तेव्हा मी पहिल्यांदा शेतीमातीविषयीची 'केळीच्या गाभ्यात, दाटली कमळ बाई' ही कविता लिहिली. नंतर अशाच छोट्या छोट्या कविता लिहित गेले. ह्या कविता मी माझ्या मुलांच्या जुन्या वहीमध्ये लिहून ठेवायचे. कॉलेजमधली एक छोटी डायरी माझ्याकडे होती. तिच्यात कधी तरी सहज म्हणून वाङ्‌मयीन मासिकांचे पत्ते लिहून ठेवले होते. मग काही कविता पाकिटात घालून त्या काही मासिकांना पाठवून दिल्या. त्यानंतर मला पुरुषोत्तम पाटीलसरांचं पत्र आलं. 'तुम्ही छान कविता लिहिली आहे'. त्यात त्यांनी 'तुम्ही काय करता' वगैरे माझा परिचयही विचारला होता. माझी पहिली कविता त्यांनी 'कवितारती'मध्ये छापली. तेव्हा आपण काय लिहितो, कसं लिहितो, ते किती चांगलं



आहे अशा गोष्टी डोक्यात अजिबात नव्हत्या. नंतर शेतशिवारातील, वाड्यावस्त्यांवरील माणसांच्या जगण्याच्या अनुभवातून मला शब्द सापडत गेले. भूमीशी बांधलेलं आयुष्य कवितेमुळं इतकं समृद्ध होताना कोणाला आनंद होणार नाही?

प्रश्न – 'आपण कविता लिहू शकतो' असं वाटल्यावर या 'वाटण्या'ला कोणी कोणी बळ दिलं?

– शिकणं-वाचणं-लिहिणं ही परंपरा ज्या घरात नसेल, तिथं प्रोत्साहन कोण देणार? आमच्या घराण्यात तरी अशा पद्धतीनं कोणी कविताबिविता केलेल्या नव्हत्या. त्यामुळे कोणी मला बळ देण्याचा प्रश्नच नव्हता. आपण आपलंच लिहायचं आणि नियतकालिकांना पाठवून द्यायचं. सुरुवातीला घरातल्या मंडळींना कविता करणं म्हणजे फालतू वेळ घालवण्यासारखं वाटायचं. शेतीच्या कामापेक्षा त्यांच्या दृष्टीने दुसरं काही महत्त्वाचं नव्हतं. त्यामुळे त्यांच्याकडून बळ मिळण्याची अपेक्षा नव्हती. पण पुढे पुढे मात्र परिस्थिती बदलत गेली. पहिला संग्रह आल्यावर महाराष्ट्रभरातून कौतुक व्हायला लागलं. लेखनाच्या क्षेत्रातले लोक घरी येऊ-जाऊ लागले. तेव्हा घरातल्या मंडळींचाही दृष्टिकोन बदलत गेला. आता त्यांचा सबळ पाठिंबा आहे. मागच्या कित्येक पिढ्यांच्या काबाडकष्टातून, जगण्याच्या आदिम धडपडीतून मला उभं राहण्याचं बळ मिळालंय. हे नुसतं बळ नाही म्हणता येणार, तर सामान्य शेतकरी बाईला भोवतालाविषयी विचार करण्याचा, बोलण्याचा, लिहिण्याचा मिळालेला आत्मविश्वास आहे, असं मला वाटतं.

प्रश्न – तुमच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणारे घटक कोणते?

– भोवतीची माणसं, निसर्ग, गुरं-ढोरं, पशु-पक्षी, शेतीमाती, आजूबाजूचं वातावरण हे सगळेच घटक प्रभाव टाकणारे आहेत. या घटकांमुळेच आपण काही ना काही विचार करू शकतो, त्यांच्यामुळेच प्रेरणा मिळते, असं मला वाटतं.

प्रश्न – कथा-कादंबरी इतर वाङ्मयप्रकार असताना कवितेचीच निवड का केली?


– खरं तर त्यावेळी तसं काही ठरवलेलं नव्हतं. फक्त सुचेल ते लिहायचं इतकंच होतं. हे सुचणं उत्कटपणे कवितेतूनच आलं. स्वाभाविकपणे. खरं तर कविता म्हणजे सुचलेलं पटकन लिहून मोकळं होण्याची त्यावेळची माझी सोय होती. आपलं चार ओळी लिहून मोकळं झालं बास, असं वाटायचं. कथा-कादंबरी लिहायला जो वेळ लागतो, जी बैठक लागते ती माझ्याकडे नव्हती.

प्रश्न – 'सिझर कर म्हणतेय माती' हे शीर्षक कसं सुचलं?

– आताच्या काळात सहज आणि साध्या पद्धतीनं काहीच येत नाही. म्हणजे कोणतंही पीक घ्या, फळं-भाज्या घ्या, त्यासाठी आता रासायनिक खतं वापरावी लागतात, फवारणी लागते. आताच्या काळात या गोष्टी आपल्याला टाळताच येत नाहीत. आता पूर्वीसारखी घरोघरी जनावरं राहिलेली नाहीत. त्यामुळे शेणखतही मिळणं अवघड झालेय. सेंद्रिय खतं तर रासायनिक खतांपेक्षा खूपच महाग आहेत. ते चांगले असले तरी आर्थिक दृष्ट्या परवडत नाहीत. त्यामुळे मातीमधलं उगवतेपण आता पहिल्यासारखं 'नैसर्गिक' राहिलेलं नाही. त्यातूनच 'सिझर कर म्हणतेय माती'सारखं सुचत गेलं. कारण आज माती म्हणतेय की 'आता मला नैसर्गिकपणे नाही उगवणं होत.' म्हणजे गरोदर बाई अडली की जसं हल्ली सिझेरिन करतात, तशीच मातीही सर्जनासाठी अडलेली आहे.

प्रश्न – 'सिझर कर म्हणतेय माती' हा कवितासंग्रह आला तेव्हा त्यावेळची निर्मितीची प्रक्रिया, मनाचं घुसमटलेपण ही एकंदर काय अवस्था होती? कारण त्या अर्थाने ते सुरुवातीचे दिवस आहेत म्हणून.

– तेव्हा माझ्यासाठी ते सगळं खूपच उत्स्फूर्तपणे होतं. इतके दिवस जी अस्वस्थता मनात दाटलेली होती, जे घुसमटलेपण मी अनुभवत होते, दैनंदिन जीवनात मी जे





पाहत होते, अनुभवत होते, ते सगळं कवितेतून व्यक्त होत होतं. त्यामुळे आपोआप त्या कविता सुचत गेल्या. शेतात काम करणाऱ्या बाया, जनावरं, पशुपक्षी, निसर्ग हे माझ्या भोवतीचं सगळं पर्यावरण माझ्या सोबतच आहे, आणि आपण त्यांचाच 'शब्द' लिहितोय, ही भावना खूप महत्त्वाची होती. 'सिझर कर म्हणतेय माती'मुळं माझ्या स्वत:मध्ये खूप चांगला बदल झाला. तो असा की मी आवडीनं शेती करायला लागले. शेतीशी असलेलं नातं आणखीच घट्ट झालं. तोपर्यंत 'शिक्षण घेऊनही आपल्या नशिबी हे काय वाढून ठेवलंय, शेतीत किती कष्ट करायचे,' असंच वाटायचं. शेती म्हणजे ओझं वाटायचं. पण या संग्रहामुळे मी शेतीकडे नव्याने बघू लागले. कविता सोबत असल्याने बाकीचे सगळे श्रम, सगळ्या अडचणी मला सुसह्य वाटू लागल्या. म्हणजे इतक्या दिवसांच्या कुत्तरओढीतून काही तरी चांगलं मिळतंय, असं वाटू लागलं. बाजरी, ज्वारी राखताना पाखरांसाठी ओरडून ओरडून घसा बसायचा. राखणीसाठी सकाळपासून उभं राहावं लागायचं. खरं तर 'माझ्या रानातला कोवळा दुधाळ हुरडा टिपते मी पाखरू होऊन, तेव्हा मचाणावर उभी असते मीच हातात गोफण घेऊन' ही 'गोफण' नावाची कविता मला तेव्हा सुचली. शेण काढण्यामुळे, त्या जनावरांमध्ये राहिल्यामुळे मला खूप काही सुचत गेलं. 'एकाच नळीनं पाणी पिणाऱ्या पोरा पारींवर हसताना गावठी-अडाणी ठरतात बाया, पण उष्ट्या पाण्याला तोंड न लावणाऱ्या मुक्या जित्राबांचं कौतुक करतात बाया' ह्या ओळी मला इतरवेळी सुचल्या नसत्या.

प्रश्न – दिवसभराच्या कामातून मग वाचन-लेखनाला सवड कशी मिळते? आणि त्याला लागूनच दुसरा प्रश्न असा की अलीकडच्या काळातली कोणती पुस्तकं महत्त्वाची वाटतात?

– खरं तर लेखन-वाचन ही गोष्ट कृषिसंस्कृतीमध्ये नव्हती. तिला आपल्याला बाहेरून तिथं रुजवायची आहे. त्यामुळे लेखन-वाचनासाठी सवड काढावी लागते. ती मिळतेच असं नाही. दैनंदिन कामंधामं उरकून मग ते करावं लागतं. वास्तविक लिहिणं-वाचणं आमच्या घरात नव्हतंच.

घरात पुस्तकं नव्हती. टोमॅटो पॅक करण्यासाठी बॉक्समध्ये रद्दीतले पेपर टाकावे लागत. मग टोमॅटो पॅक करता करता मी पेपर वाचत बसायचे. कारण वाचनाची खूप ओढ यायची आतून. पण कामाचा इतका रेटा असायचा की मी दहा मिनिटं पेपरही वाचू शकत नसे. शेतकऱ्याच्या घरात वाचनाला काय किंमत? कामंधामं सोडून वाचणं म्हणजे बकवास वेळ घालवणं, किंवा वाचून कुठं चंद्रावर जायचं काय, असं बहुतेक शेतकऱ्यांना वाटतं. नंतर पेपर वाचणंही बंद केलं. त्यामुळे खरंच सांगायचं तर आतापर्यंत मी खूपच कमी वाचलंय. घरकाम, शेतीतील काम वगैरे व्यापताप खूप असल्याने माझ्या वाचनाला खूपच मर्यादा आहेत, हे मी नेहमीच मान्य करत आलेय. पण आता मी वाचन वाढवायचं ठरवलंय. आतापर्यंत मी जे कविता लेखन केलं ते अनुभवाच्या बळावर. त्याला वाचनाचा काही आधार होता, असं म्हणता येत नाही. त्यामुळे हा लेखक चांगला, हा लेखक सुमार, असं अधिकारानं मला ठरवता येणार नाही. पण एक सांगेन की मी दुर्गा भागवत यांची काही पुस्तके वाचली आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबऱ्या, जी.ए. कुलकर्णी, आसाराम लोमटे, किरण गुरव यांच्या कथा वाचल्या आहेत. राजन गवस यांची 'ब, बळीचा' मला आवडलेली आहे. एलकुंचवार, महावीर जोंधळे यांची पुस्तके वाचलेली आहेत. इतकंच माझं वाचन. शेतात जाताना, आमचा छोटा जोडधंदा आहे तिथं जाताना एक पिशवी सोबत असते. ज्यात एखादं पुस्तक, वही असते. कामातून वेळ मिळेल तसं तेव्हा उघडते. कधी कधी उघडणंही होत नाही.

प्रश्न – शेतकरी कुटुंबातील शिकलेल्या मुलींचे प्रश्नही आता निर्माण होतायत. याबद्दल काय सांगाल?

– शेतकरी कुटुंबातून आलेल्या, पण शिकलेल्या मुलींची तर आज प्रचंड गोची होतेय. ज्या मुली शिकलेल्या आहेत, त्यांना शेती करायची नाही. काहींना स्वबळावर त्यांचं स्वत:चं अवकाश निर्माण करायचंय. काहींना टीव्हीतल्यासारखं आपण आणि आपला नवरा असं स्वत:पुरतं छान राहायचंय, पण राहता येत नाही. या मुलींना शहरात जाऊन नोकरी करायचीय. मनासारखा नवरा हवाय. हे एकीकडे. तर दुसरीकडे आधीच्या जुन्या पिढीतल्या लोकांना मात्र शेतीत काम करणाऱ्या मुली 'सुना' म्हणून पाहिजेत. कारण सासूला आता काम होत नाही, मग सुनेनं खुरपायला गेलं पाहिजे, वैरणकाडी आणली पाहिजे, अशी त्यांची अपेक्षा असते. पण हल्लीच्या शिकलेल्या सुनांना हे जमत नाही, यातून मग वेगळं राहायचा मुद्दा येतो, कौटुंबिक ताणतणाव आणि भांडणं होत राहतात. नातेसंबंध दुरावतात. त्यामुळे हल्ली



नातेसंबंध वेगाने बदलताना दिसत आहेत. हा बदल एकूणच समाजाच्या दृष्टीचे फार चांगला आहे, असं म्हणता येत नाही. म्हणजे जुनी आणि नवी पिढी असा हा संघर्ष आहे. मी भोवतीच्या माणसांचा विचार करते तेव्हा लक्षात येते की अशा किती तरी बहिणीबाळा असतात की त्यांच्या भोवतीचं अनुभवविश्व मोठं असतं. संवेदनशीलता, उत्कटता असते. पण लिहिण्यावाचण्याशी काडीमात्र संबंध नसतो. रोजच हातातोंडाचं भांडण असतं.

प्रश्न – कविता कशी असावी किंवा कविता महत्त्वाची का वाटते?

– माझ्यापुरतं मी असं म्हणेन की तुम्हाला जे म्हणायचंय ना ते उत्स्फुर्तपणे एका क्षणात आलं पाहिजे. एकदम. त्यासाठी खूप आढेवेढे न घेता, फार ओढाताण न होता कविता सहज आली पाहिजे. माझ्यासाठी लेखन ही संसाराच्या वटारलेल्या डोळ्यात कवितेच्या ओळींचं काजळ फासण्याची गोष्ट आहे. जगण्याला जीव लावला की ओव्या उसन्या घ्याव्या लागत नाहीत. भोवतीच्या धगीलाच प्रेरणा समजून, उर्जा समजून मी कविता लिहिते. मला कवितेत समकालातलं वास्तव आणि वेदना दिसते. हा भोवताल जसा पाहिला, अनुभवला तसं लिहिण्याचा, त्याला शब्द देण्याचा प्रयत्न केला. आयुष्य समजून मुठीत माती घट्ट धरली वरून पाण्याची धार सोडली तर रिकाम्या मुठीतही भुईकमळ फुलल्याचा हा आडवळणी प्रवास आहे. कवितेने माझ्या आयुष्याला समृद्धी दिली. माझं कविता लिहिणं हे एका थोर परंपरेतील लहानशी कृती आहे. गांभीर्य आणि निर्धाराने मी त्यात भर घालीन. ही माझी सामाजिक–सांस्कृतिक जबाबदारी आहे. याची मला जाणीव आहे. कवितेनं मला जगायला शिकवले, माझ्या आयुष्यात समृद्धी भरली. कवितेनंच सांगितलं 'धग आसपास असते' आपण ती समजून घ्यावी. धगीतून मार्ग काढायचा आणि पुढे जायचे बस्स. तेव्हा कवितेकडून आणखी काय अपेक्षा करावी?

प्रश्न – साहित्य अकादमीच्या निमित्ताने तुम्ही जोधपूर, दिल्ली, भोपाळ आदी अनेक ठिकाणी गेलात. तो अनुभव कसा होता?

– माझ्यासाठी तो अनुभव खूप चांगला होता. मला स्वत:ला असं वाटतं की आजवर जी ओढाताण झाली, जे कष्ट आपण उपसले त्याचं आता खऱ्या अर्थानं काही तरी चिज होतंय. अशा पद्धतीच्या अखिल भारतीय महिला संमेलनात माझ्यासारखी शेतकरी बाई एरव्ही कधी गेली असती बरं? शिवाय तिथं शेतीमातीतली कविता म्हणणारी मी एकटीच होते. लहानपणी आकाशातून उडणारे विमानं मी बघायची. पण कवितेमुळे मी विमानात बसले. भालचंद्र नेमाडे सरांमुळेच साहित्य अकादमीकडून ही संधी मला मिळाली होती. नाही तर एरवी मी तिथपर्यंत जाऊ शकले नसते. अशा मोठ्या कार्यक्रमात कविता वाचताना खूप छान वाटलं. कितीही त्रास होवो, आपण आपलं कविता लिहिणं सोडलं नाही पाहिजे, असं बळ मिळालं. आपल्यातली चांगली गोष्ट कळते, तशी वाईटही कळते.

प्रश्न – 'सिझर कर म्हणतेय माती'च्या वेळच्या कल्पना दुधाळ आणि 'धग असतेच आसपास'च्या कल्पना दुधाळ, या दोन्हींच्या व्यक्तिमत्त्वात–जाणिवांत फरक जाणवतो?

– हो निश्चितच जाणवतो. कारण 'सिझर'च्या वेळी कविता नेमकी काय असते, हे मला फार माहीत नव्हतं. परंतु 'धग'च्या वेळी आपण कविता लिहितोय, याची पुरेपूर जाणीव मला होती. टेंभुर्णीतल्या दगडाधोंड्यातल्या पायवाटांवरची चिकनमाती पुण्यातल्या रस्त्यांवर गळून पडली आणि पुन्हा बोरीभडकच्या चिकनमातीने चटके देत वास्तवाचे भान आणले. कवितेतला प्रत्येक शब्द, प्रत्येक ओळ याला काहीतरी अर्थ आहे. कविता लिहून पूर्ण झाली की माझं मीच प्रत्येक कवितेला तीन प्रश्न विचारू लागले. ते म्हणजे, या कवितेत नवीन काय आहे? या कवितेत उत्कटता, संवेदनशीलता आहे का? आणि बाकीच्या कवितांपेक्षा ही कविता वेगळी आहे काय? असं करावं की नाही मला माहीत नाही, पण ते झालं आपोआप. 'धग'मधली कविता 'सिझर'पेक्षा मला खूप त्रास देऊन गेली हे खरंच. 'धग'मध्ये स्वत:विषयी किंवा शेतीविषयी फार येण्यापेक्षा भोवतीचं वातावरण, बदलते नातेसंबंध आदी गोष्टी जास्त आल्या आहेत.

प्रश्न – आता शेवटचा प्रश्न. महाराष्ट्र फाऊंडेशन सन्मान मिळाला, काय भावना आहेत याबद्दल?

– आनंद तर आहेच. एक वेळ असे पुरस्कार म्हणजे फार लांबची गोष्ट वाटायची, ती आता इतक्याजवळ आली की विश्वासच बसत नाही. त्यामुळे खूप दडपण येतं मनावर आणि खूप जबाबदारी वाढलीय याची जाणीव होते.

संवादक : सुशील धसकटे
Mob. 9822266939



रा. शं. दातार नाट्य पुरस्कार : समाजस्वास्थ्य



अजित दळवी

त्या वेळी आजूबाजूची जी परिस्थिती होती, दाभोलकरांच्या खुनानंतर जे वातावरण महाराष्ट्रात झालं होतं, ज्या गोष्टी घडत होत्या; त्यांचाही प्रभाव त्या वेळी आमच्या मनांवर होता. म्हणून वाटलं की, र.धों.कर्व्यांवरच्या कोर्ट-केसेसभोवतीच नाटक का उभं करू नये? एका बुद्धिप्रामाण्यवादी माणसाला या समाजामध्ये ज्या प्रकारच्या छळाला बळी पडावं लागतं, त्या छळाबद्दल आपण आपलं निवेदन मांडणं आज आवश्यक आहे, असं वाटलं. त्या वेळी आजूबाजूची परिस्थितीही अशी काही होती की, माझं हे वाटणं वरचेवर जास्त तीव्र होत गेलं. आणि मग मी लिहिलं. माझ्या लिखाणाचा सगळा फोकस त्या कोर्ट-केसेसवर राहिला. एका माणसाविरुद्ध तीन-तीन केसेस लादल्या जातात आणि तो माणूस मेल्यानंतरही चौथी केस लादण्याची लोकांची तयारी असते, हे फार भयानक होतं!



अजित दळवी,
औरंगाबाद
Mob. 9822884376



त्या छळाबद्दल निवेदन करणं आवश्यक वाटलं...

सुमारे ९६ वर्षांपूर्वी, जेव्हा स्त्री-पुरुष संबंध आणि संततिनियमन या गोष्टींचा साधा उच्चारही समाजात निषिद्ध मानला जात असे, त्या काळात रघुनाथ धोंडो कर्वे या मराठी समाजसुधारकानं लैंगिक शिक्षणाचा पुरस्कार करून समाजात संततिनियमनाचा प्रचार-प्रसार करण्याचं ध्येय अंगीकारलेलं होतं. स्वत:च्या पत्नी मालतीबाई यांना सोबत घेऊन त्यांनी १९२१ मध्ये पुण्यात एक संततिनियमन केंद्र सुरू केलं. ब्रह्मचर्य, लैंगिकता, विवाहित स्त्री-पुरुषांची मानसिकता लैंगिक संबंधांविषयीचं अज्ञान, त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या आणि नैतिकता या साऱ्या गोष्टींबद्दल अत्यंत स्पष्ट व बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका घेऊन त्यांनी या साऱ्या विषयांबद्दल जनजागृतीचं मोठं काम सुरू केलं. त्यांवर त्यांनी अनेक ठिकाणी व्याख्यानं दिली, भरपूर लेखनही केलं. आणि संततिनियमनाची साधनंही विक्रीला ठेवली नंतर १९२७ मध्ये त्यांनी समाजस्वास्थ्य नावाचं एक मासिक सुरू केलं आणि त्या काळातल्या कर्मठ, धर्मवादी लोकांचा कडवा विरोध पत्करून ते निष्ठेनं चालवलं. त्या काळात वैद्यकीय क्षेत्रातले अनेक डॉक्टरही वृत्तीनं परंपरावादी आणि सनातनी होते. त्यांचाही कर्व्यांना विरोध होता. अशी एकूणच, र.धों.कर्व्यांना त्या काळच्या समाजाकडून पराकोटीची अवहेलना सहन करावी लागली, घोर आर्थिक संकटांना तोंड द्यावं लागलं आणि पुढे चालून आपली नोकरीही गमवावी लागली. ते ज्या-ज्या गोष्टींचा प्रचार करीत, त्या गोष्टींना अश्लील आणि समाजविरोधी मानून त्यांच्याविरुद्ध कोर्टांत खटले भरले गेले. पण तरीही त्यांनी स्वत:चं काम निष्ठापूर्वक सुरूच ठेवलं. त्या कामाचाच एक भाग म्हणून त्यांनी लोकशिक्षणासाठी आहारशास्त्र, आधुनिक कामशास्त्र, वेश्याव्यवसाय, गुप्तरोगांपासून बचाव, संततिनियमन अशा विषयांवर पुस्तकं लिहिली. तत्कालीन सनातनी वृत्तीच्या लोकांमध्ये त्यामुळे खळबळ माजली. त्या लोकांच्या दबावामुळे अश्लीलतेच्या आरोपाखाली र.धों.कर्व्यांवर तीन कोर्ट-खटले भरले गेले. समाजसुधारणेसाठी निष्ठेनं काम करीत, येणाऱ्या आपत्तींशी एकाकीपणे झुंजणाऱ्या र.धों. कर्व्यांना ज्या कायदेशीर लढ्यांना सामोरं जावं लागलं होतं, त्यांतील दोन खटल्यांच्या आधारे नाटककार प्रा.अजित दळवी यांनी समाजस्वास्थ्य नावाचं एक प्रत्ययकारी नाटक लिहिलं आहे. सर्जनशील दिग्दर्शक अतुल पेठे यांनी ते नाटक रंगमंचावर सादर केलेलं आहे.

प्रश्न – र.धों.कर्व्यांवर लादलेल्या कायदेशीर खटल्यांच्या अनुषंगाने तुम्ही 'समाजस्वास्थ्य' हे नवं नाटक लिहिलेलं आहे. आजच्या काळात त्यांच्याबद्दलचं हे नाटक लिहिण्यामागे तुमची भूमिका काय होती?

– रघुनाथ धोंडो कर्वे यांच्याबद्दल मी आधी वाचलेलं होतंच. पण अमोल पालेकरांनी जेव्हा 'ध्यासपर्व' हा चित्रपट करायला घेतला, तेव्हा कर्वे मला जास्त चांगले कळाले. तेव्हा र.धों.कर्व्यांविषयीची माहिती तर बऱ्यापैकी मिळाली होतीच, पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल मोठं आकर्षणही वाटलं होतं. एक बुद्धिप्रामाण्यवादी माणूस स्वत:च्या तत्त्वांसाठी इतका टोकाला जाऊ शकतो याचं आश्चर्य मला वाटलं होतं. ध्यासपर्व या चित्रपटाचा मुख्य भर र.धों.कर्व्यांच्या संततिनियमनाच्या कामावर होता- त्यांच्या विवेकवादावर फारसा नव्हता. पण कर्व्यांचा विवेकवादही लोकांसमोर केव्हा तरी मांडला गेला पाहिजे, ही गोष्ट माझ्या मनात रुजून राहिलेली होती. त्या काळात डॉ.श्रीराम लागूंनीही मला विचारलं होतं की, 'तुम्ही र.धों.कर्व्यांवर नाटक लिहून द्याल का?' म्हणून. जयंत पवारही मला एकदा म्हणाले होते की, कर्व्यांवर नीट लिहिलं गेलं पाहिजे. त्यामुळे तो विचार मनात पुन:पुन्हा येत राहिला. त्याकाळी य.दि.फडक्यांनी त्यांच्यावर



लिहिलेलं एक अतिशय वस्तुनिष्ठ असं पुस्तक होतं. नंतर अनंत देशमुखांनी र.धों.कर्व्यांचे सगळेच खंड पुन्हा प्रकाशित केले. ती एक बहुमोल खाणच जणू माझ्या हाती लागली. ते खंड वाचनात आले आणि त्यांतून असं लक्षात आलं की, र.धों.कर्व्यांच्या अशा बऱ्याच काही गोष्टी आहेत ज्यांच्याबद्दल आपण लिहायला पाहिजे. आणि तेव्हा मी लिहायला सुरुवात केली. पुण्याला 'सुदर्शन' नावाचा जो नाटकाचा मंच आहे, त्यातल्या आमच्या काही रंगकर्मी मित्रांनी त्याच सुमारास र.धों. कर्व्यांच्या लिखाणातले निवडक वेचे लोकांना नुसते वाचून दाखवायला सुरुवात केली होती आणि ते लोकांना आवडत होतं- नवं काहीतरी ऐकल्याचं समाधान त्यांना मिळत होतं. त्याच काळात इकडे मी र.धों. कर्व्यांवरच एक नाटक लिहीत होतो. त्या नाटकात सगळा भर त्यांच्या विवेकवादावर होता. त्या नाटकात एक कोर्ट-सीन होता, पण ते नाटक त्या कोर्ट-सीनभोवती नव्हतं. ते नाटक मी अतुल पेठेला वाचायला दिलं, त्याला ते नाटक आवडलं आणि त्यानं ते बसवायचं ठरवलं. पण पुण्यात आणि इतरत्र आम्ही त्या नाटकाचं पुनःपुन्हा वाचन केलं, तेव्हा असं वाटायला लागलं की, त्यात आणखी काही गोष्टी यायला हव्यात. त्या वेळी आजूबाजूची जी परिस्थिती होती, दाभोलकरांच्या खुनानंतर जे वातावरण महाराष्ट्रात झालं होतं, ज्या गोष्टी घडत होत्या; त्यांचाही प्रभाव त्या वेळी आमच्या मनांवर होता. म्हणून वाटलं की, र.धों.कर्व्यांवरच्या कोर्ट-केसेसभोवतीच नाटक का उभं करू नये? एका बुद्धिप्रामाण्यवादी माणसाला या समाजामध्ये ज्या प्रकारच्या छळाला बळी पडावं लागतं, त्या छळाबद्दल आपण आपलं निवेदन मांडणं आज आवश्यक आहे, असं वाटलं. त्या वेळी आजूबाजूची परिस्थितीही अशी काही होती की, माझं हे वाटणं वरचेवर जास्त तीव्र होत गेलं. आणि मग मी लिहिलं. माझ्या लिखाणाचा सगळा फोकस त्या कोर्ट-केसेसवर राहिला. एका माणसाविरुद्ध तीन-तीन केसेस लादल्या जातात आणि तो माणूस मेल्यानंतरही चौथी केस लादण्याची लोकांची तयारी असते, हे फार भयानक होतं! कर्व्यांवरची पहिली केस निदान समाजस्वास्थ्यमधल्या व्यभिचाराचा प्रश्न या लेखावर होती. पण दुसरी केस मासिकातल्या सेक्सविषयक प्रश्नोत्तरांवर केली गेली. आणि तिसरी केस तर मासिकात आलेल्या जाहिरातीतल्या एका शब्दावर केलेली होती. त्यांतल्या एका केसमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी र.धों.कर्व्यांचं वकीलपत्र घेतलं होतं. र.धों.कर्व्यांचे वकील म्हणून बाबासाहेब त्यांच्या बाजूनं कोर्टात तर उभे राहिलेच, पण पुढे चालून त्यांनी मुंबईच्या विधी मंडळात संततिनियमनाचं बिनसरकारी विधेयकही मांडायला लावलं होतं. त्या केसच्या आधी र.धों.कर्व्यांची बाबासाहेबांबरोबर झालेली चर्चा अतिशय महत्त्वाची आहे. ती या नाटकात मी समाविष्ट करू शकलो याचं मला समाधान आहे. कर्व्यांवरच्या सगळ्या केसेस समाजातील सनातनी मंडळींच्या सांगण्यावरून तत्कालीन सरकारनं, म्हणजे राज्यसंस्थेनं दाखल केलेल्या होत्या. त्या काळी समाजात सनातनी लोकांचं प्राबल्य होतं. सनातन्यांना विरोध केल्यानं समाजात अशांतता माजून कायदा व सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल, म्हणून राज्यसंस्था नेहमी सनातन्यांच्या दबावाखाली असे. कर्व्यांविरुद्धच्या केसेस कुणा व्यक्तीनं नव्हे, तर सरकारनंच भरलेल्या होत्या, हे लक्षात घ्यायला हवं. आपल्याकडे किती किरकोळ कारणांसाठी एका विवेकवादी माणसाला मोठा छळ सहन करावा लागतो, याचं हे उदाहरण आहे. आणि म्हणूनच हे नाटक या छळाबद्दलचं असावं, असं आम्हाला वाटलं.

प्रश्न – या नाटकात इतर कोर्टरूम-नाट्यांप्रमाणे खटकेबाज संवाद, नाट्यमय दृश्यं किंवा एकदम कलाटणी घेणारे प्रसंग नाहीत आणि तरीही नाटकाचा प्रयोग परिणामकारक होतो. हे कसं काय साधता आलं?

– कसं आहे... हे एक चरित्रनाट्य आहे. त्यामुळे कथानायकाच्या आयुष्यात जे काही जसं काही घडलं, तसंच लिहावं लागतं. ही चरित्रनाट्याची मर्यादाही आहे. आणि त्याची शक्तीही आहे. कथानायक गांधी असोत वा कर्वे असोत- तुम्ही त्यांच्या जीवनाबद्दल वाचायला लागता, तेव्हा तुम्हाला जे काही सुचत जाईल ते महत्त्वाचं असतं. त्याला धरून लिखाण जेवढं परिणामकारक करता येईल तेवढं आपण करीतच असतो. पण ते बाजूला ठेवून नाट्यपूर्ण असं काही तरी लिहिणं योग्य नव्हे, असं मला आता वाटतं. समाजस्वास्थ्यबद्दल असं म्हणता येईल की- र.धों.कर्व्यांची जी अनेक विधानं आहेत, तीही प्रेक्षकांना धरून ठेवणारी आहेत. त्यांच्या काही विधानांचा मी आधार घेतलेला आहे, तर काही विधानं जशीच्या तशी मांडली आहेत. उदाहरणार्थ- न्यायाधीशांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना कर्वे म्हणतात की, काम हा धर्माचा एक प्रतिस्पर्धी आहे. एरवी धर्माचा तुमच्यावर खूप पगडा असतो. पण कामप्रेरणा इतकी प्रबळ असते की, ती धर्माज्ञा



उल्लंघण्याचं बळ माणसाला देते. आज असं विधान तुम्हाला कुठेही ऐकायला मिळणार नाही. तेव्हा नाटकात फार नाट्यपूर्ण असे प्रसंग जरी नसले, तरी अशी विधानं आणि ही सारी चर्चाच मुळात प्रेक्षकांना धरून ठेवणारी आहे, असं मला वाटतं.


प्रश्न – अतुल पेठे हे अलीकडच्या काळातल्या मोजक्या प्रयोगशील दिग्दर्शकांपैकी एक आहेत. समाजस्वास्थ्यच्या त्यांच्या या सादरीकरणात नाटकाची दृश्यमानता आणि आशय या गोष्टी परिणामकारक करणारी कोणती वैशिष्ट्यं तुम्हाला जाणवली?

– त्यांच्या सादरीकरणाची बरीच वैशिष्ट्यं सांगता येतील. त्यांतलं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य म्हणजे, रंगमंचावरच्या जागांचा सूचक वापर. उदाहरणार्थ– या नाटकात आरोपीच्या पिंजऱ्यात उभ्या असणाऱ्या र.धों.कर्व्यांना न्यायाधीश प्रश्न विचारत असतात, तेव्हा विल्सन कॉलेजमधील प्रसंग सांगितला जातो. कॉलेजचे प्राचार्य कर्व्यांना बोलावून राजीनामा द्यायला सांगतात, असा तो प्रसंग स्टेजवर प्रत्यक्ष दाखवलेला आहे. आणि त्याही वेळेला अतुल पेठेंनी कर्व्यांना त्या पिंजऱ्यातच उभं केलेलं आहे. प्राचार्य बाहेरून येतात, त्यांच्याशी बोलतात आणि निघून जातात. हा सारा वेळ कर्वे पिंजऱ्यातच उभे दाखवलेले आहेत. म्हणजे कर्व्यांचं सगळं आयुष्यच कसं आरोपीच्या पिंजऱ्यात उभं असल्यासारखं गेलं, हे त्यातून सूचित झालेलं आहे. नंतर अतुल पेठेंनी नाटकाचा काही भाग एडिट करून र.धों.कर्व्यांपासून सुरू होणारं हे नाटक वैश्विक स्तरापर्यंत नेण्याचा चांगला प्रयत्न केलाय. पहिल्या केसपासून दुसऱ्या केसमध्ये जाईपर्यंत त्या खटल्याच्या सीनमधून एकेक गोष्ट वजा होत गेलेली दाखवली आहे. म्हणजे हळूहळू त्यातून न्यायाधीश, वकील, उलटतपासणी या सगळ्या गोष्टी नाहीशा होतात. मग तिसऱ्या केसमध्ये तर अवघ्या स्टेजवर अगदी समोर आणून ठेवलेला फक्त पिंजरा आहे आणि पिंजऱ्यात आरोपी म्हणून उभे असणारे र.धों.कर्वे एकटेच. त्यांचं जे काही म्हणणं आहे, ते लोकांसमोर ठेवतायत, असं दृश्य पेठेंनी उभं केलेलं आहे. त्यामुळे हे नाटक र.धों.कर्व्यांपर्यंत मर्यादित राहत नाही. समाजाकडून आरोपीच्या पिंजऱ्यात डांबल्या गेलेल्या अशा किती तरी लोकांपर्यंत हे नाटक जातं.

प्रश्न – गेल्या पिढीतले परिवर्तनवादी विचारांचे पत्रकार म.य.ऊर्फ बाबा दळवी हे तुमचे वडील होते. त्यांच्याशी तुमचा संवाद नेहमीच होत असे. १९७० च्या सुमारास कुमार सप्तर्षींच्या पुढाकारानं स्थापन झालेल्या युवक क्रांतिदलाशी तुम्ही संबंधित होता. त्यानंतरच्या काळात मराठवाड्यात झालेलं दलित शिष्यवृत्ती वाढीचं आंदोलन, मराठवाडा विद्यापीठ नामांतराची चळवळ, मराठवाडा विकास आंदोलन या चळवळींशीही तुम्ही जोडलेले होतात. या साऱ्या संघटनांच्या विचारांचा आणि चळवळींच्या मूल्यांचा कितपत प्रभाव तुमच्या लिखाणावर आहे?

– खूप मोठा प्रभाव आहे. तो एक प्रकारे लिखाणाचा पाया आहे, असं म्हणता येईल. आमचे बाबा हे मोठे पत्रकार होते, हे खरंच आहे. पण आम्हाला ते एखाद्या मित्रासारखे होते. कुमार सप्तर्षी, अनिल अवचट असे माझे सगळे मित्र हे त्यांचेही मित्र होत असत. माझे औरंगाबादचे मित्र घरी आले की, बाबा त्यांच्या खांद्यावर हात टाकून फिरायला निघायचे. आमच्यामध्ये खूप छान असं मोकळेपण होतं. आम्हाला कधी त्यांची धास्ती वाटत नसे. नंतर जेव्हा पत्रकारिता सोडून ते पूर्णपणे सामाजिक चळवळींकडे वळले, तेव्हाही आम्हा मुलांच्या नाट्यलेखनात आणि सुनांच्या अभिनयकौशल्यात त्यांना रस असे, त्याचा आनंद ते घेत असत.

बाकी, तो सारा काळ एक प्रकारे भारलेला असा होता. १९६७ मध्ये फ्रान्समध्ये झालेली लोकआंदोलनं, त्यानंतर बिहारमध्ये झालेलं संपूर्ण क्रांती आंदोलन, तत्कालीन गुजरातमध्ये झालेलं जनआंदोलन यांचा प्रभाव आमच्यावर होता. तुम्ही उल्लेखलेल्या मराठवाड्यातल्या सगळ्या आंदोलनांत तर आपण सारेच तरुण सहभागी





होतो. त्या काळी मी आणि डॉक्टर भालचंद्र कांगो असे दोघे जण औरंगाबादेत कुठेही गेलो की भोवती गर्दी जमत असे. त्या काळी कुमार सप्तर्षींनी इथे महिनाभर एखाद्या मुक्त विद्यापीठाप्रमाणे वेगवेगळ्या मुद्यांवर वर्ग चालवले होते. गुलमंडीच्या रस्त्यावर उभे राहून ते बोलत आणि भोवती तुफान गर्दी जमलेली असे. त्या काळी ते पाहायला विजय तेंडुलकर स्वत: औरंगाबादेस आले होते. तेंडुलकरांचा व्यक्ती म्हणून माझ्यावर मोठा प्रभाव आहे. त्या वेळी शिष्यवृत्तीसाठी आंदोलन करणाऱ्या दलित विद्यार्थ्यांच्या घराघरांतून तेंडुलकरांना मी घेऊन गेलो होतो.

व्यक्तिप्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, किंवा धर्मप्रामाण्य न मानता स्वत:च्या बुद्धीला प्रमाण मानून प्रत्येक गोष्टीची चिकित्सा करण्याची एक पद्धत युक्रांदनं आम्हाला दिली. त्यामुळे समाजातल्या कोणत्याही मोठ्या माणसाची किंवा समाजवादी अगर काँग्रेसच्या नेत्याची व्यक्तिपूजा आम्ही कधीच केली नाही. आणि याचा पुरेपूर फायदा माझ्यातल्या लेखकाला झाला. त्यामुळे लेखक म्हणून असणाऱ्या माझ्या अवकाशाला मर्यादा पडल्या नाहीत. मी अमुक विषयावर बोलणार नाही, तमुक विषयावर लिहिणार नाही, असं म्हणण्याची वेळ माझ्यावर आली नाही. सर्व विषय माझ्यासाठी खुले होते.

प्रश्न – सत्तरच्या दशकापासून तुम्ही औरंगाबादेतील हौशी रंगभूमीशी जोडले गेला होतात. सुरुवातीला दिशांतर आणि नाट्यरंग या हौशी संस्थांमार्फत महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धांमध्ये तुम्ही भाग घेऊन छोट्या-मोठ्या भूमिका करीत होता. पुढे तुम्ही स्वत:च परिवर्तन नावाची एक संस्था काढलीत आणि वेगळ्या धाटणीची नाटकं लिहून हौशी रंगभूमीवर सादर केलीत. त्या काळच्या हौशी रंगभूमीमध्ये आणि आजच्या हौशी मराठी रंगभूमीविषयी थोडे सांगतो.

– माझ्या वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत- म्हणजे सुरुवातीचा माझा युक्रांदचा काळ असो किंवा प्राध्यापक म्हणून नोकरीला लागलो तो काळ, किंवा नंतरचा आणीबाणीचा काळ असो; तेव्हा मी काही स्वत:ला लेखक म्हणून गांभीर्यानं घेतलंच नव्हतं. लहानपणापासून बालरंगभूमी वगैरेंशी संबंध आल्यामुळे नाटकाची आवड होती. गार्बोसारखं नाटक पाहायला मुंबईला जाणं किंवा घाशीराम कोतवाल पाहायला मुद्दाम पुण्याला जाणं, हे मी करत होतो. त्यामुळे तेव्हा युक्रांदचं काम करायचं, नोकरी करायची आणि मग वर्षातून एखाद्या नाटकात काम करायचं, असा काहीसा क्रम असे. त्या काळी आपण सगळेच समांतर मानले गेलेले चित्रपट पाहायचो, मग त्यांवर बोलायचो, बसस्टँडसमोरच्या मॉडर्न हॉटेलात बसून चर्चा करायचो. त्याच वेळी काही जण आपापली आत्मचरित्रंही लिहीत होते. अशा सर्जनाच्या लाटा सभोवताली असायच्या. त्यांत नाटकही असायचं. पण नाटक हे पुढे चालून माझं संपूर्ण जीवन व्यापून टाकेल, असं काही मला वाटलं नव्हतं. पण पुढे जेव्हा आणीबाणी जाहीर झाली, माझे बरेचसे मित्र तुरुंगात गेले आणि आपण सर्वांनाच एका मोठ्या कोंडीला सामोरं जावं लागलं; तेव्हा मी माझं 'मुक्तिधाम' हे पहिलं नाटक लिहिलं. मुळात ती मी लिहिलेली एक कविता होती. तेव्हाच्या मराठवाडा दैनिकात ती प्रसिद्ध झाली होती. कालचा जो तुरुंग, त्यास आता मुक्तिधाम म्हणायचं- म्हणजे नुसतं लेबल बदलायचं, असा तिचा सारांश होता. अर्थात मी काही कवी नव्हतो. आणि कथा किंवा कादंबरी या साहित्यप्रकारांपेक्षा नाटक मला जवळचं वाटत असे. म्हणून मग त्या कवितेचं मी नाटकात रूपांतर केलं. आणीबाणीच्या विरोधात आवाज उठवणारं नाटक म्हणून ते गाजलं. आणि त्यानंतर मी नाट्यलेखनाकडे वळलो. एक तर सामूहिक कलेकडे माझा ओढा जास्त होता. एकट्यानं विचार करून काही करण्याऐवजी सगळे एकत्र येऊन काही तरी निर्माण करण्याची उर्मी माझ्या अंगी होती. कदाचित हा चळवळींचाही परिणाम असेल. आणि पुढे आणीबाणीनंतर जेव्हा चळवळी थंड झाल्या आणि केंद्रात जनता सरकार आलं. त्यानंतर परिवर्तन ही संस्था आम्ही काढली, तेव्हा संस्थेकडे लेखक-दिग्दर्शक दोन्हीही नव्हते. त्यामुळे लिहिण्याची जबाबदारी माझ्यावरच येऊन पडली. त्यानंतर मी 'आपल्या बापाचं काय जातं?' हे नाटक लिहिलं. त्यात संगीत नाटकापासून घाशीरामपर्यंतचे सगळे फॉर्म्स वापरून आजच्या स्थितीवर भाष्य केलेलं होतं. या नाटकानं तर तेव्हा मोठी धमाल उडवली होती. हे नाटक वाचून सतीश आळेकरांनी आणि तेंडुलकरांनी नाटककार कार्यशाळेसाठी ते निवडलं. त्यानंतर मग शतखंड हे नाटक मी लिहिलं. शतखंडच्या नाट्यवाचनाला अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. तेंडुलकर, आळेकर, एलकुंचवार, श्रीराम लागू यांसारखे मातबर लोक त्या वेळी हजर होते. वाचन संपल्या-संपल्या लागूंनी जाहीर केलं की, हे नाटक ते स्वत: सादर करणार आहेत. त्यानंतर मी



नाट्यलेखन गांभीर्यानं घेण्यास सुरुवात केली. मग तेच माझ्या आयुष्याचा मुख्य भाग बनलं. त्यानंतर मग संघर्ष, देहधून, बलरामाचं गाणं ही नाटकं लिहिली गेली.

डॉ.लागू असं म्हणत की, नाटक हे काही फक्त मनोरंजनाचं किंवा समाजप्रबोधनाचं साधन नाही, ते नाट्यमय अनुभव इतरांशी शेअर करण्याचं माध्यम आहे. मलाही असं वाटतं. आणि एका चर्चेत मी तसं बोललोही आहे की, संगीत हे माणसाला शांत करतं, तर नाटक हे त्याला अस्वस्थ करत असतं. आणि म्हणून, माझ्या अस्वस्थतेत इतरांना सामील करून घेण्यासाठी मी नाटक लिहितो. माझा लिहिण्याचा उद्देशच तो असतो.

प्रश्न – मराठी व्यावसायिक रंगभूमीवर जेव्हा निखळ मनोरंजनप्रधान नाटकं होत असत, त्याच काळात शतखंड, डॉक्टर तुम्हीसुद्धा, गांधी विरुद्ध गांधी ही तुमची विचारप्रधान नाटकं आली. 'समाजस्वास्थ्य'प्रमाणेच त्या सर्व नाटकांतून कथानकांच्या अंगाने जाणारी एक तर्कशुद्ध विवेकवादी भूमिका मांडलेली दिसते. आज वाढता भौतिक विकास, माहिती-तंत्रज्ञानातील वाढ आणि चंगळवादी जीवनशैलीचा हव्यास यांमुळे विवेकवादाची पीछेहाट होते आहे, असे तुम्हाला वाटते का?

– साधारणत: १९९० चा तो काळ असेल. त्या वेळी फक्त माझीच नव्हे, तर अनेक लोकांची विचारप्रधान नाटकं रंगभूमीवर आली होती. त्यात त्या नवनाटककार कार्यशाळेतलेही लेखक होते. उदाहरणार्थ– प्रेमानंद गज्वींचं 'घोटभर पाणी' हे नाटक होतं, शफाअत खानचं 'शोभायात्रा' हे नाटक होतं, जयंत पवारचं 'अधांतर' होतं, संजय पवारचं 'कोण म्हणतंय टक्का दिला' होतं आणि प्रशांत दळवीचं 'चारचौघी', आणि माझं 'डॉक्टर तुम्हीसुद्धा' ही नाटकं त्यात होती. तेव्हा अनेक लोक नव्या प्रकारचं नाटक लिहीत होते आणि प्रथमच असं दिसलं की, मराठी प्रेक्षकही ते बघत होता. माझं 'डॉक्टर, तुम्हीसुद्धा?' हे चंद्रकांत कुलकर्णीदिग्दर्शित नाटक महेश मांजरेकरांनी रंगभूमीवर आणलं; तेव्हा आधी वाटलं होतं की, थोडे प्रयोग करून बघू. कारण प्रेक्षक असं नाटक स्वीकारतील का, हे माहीत नव्हतं. पण मला वाटत होतं की, ते खूप लोकांपर्यंत जाईल. आणि नंतर खरोखरच असं दिसलं की, प्रेक्षक ते नाटक बघायला उत्सुक असत. ते महत्त्वाचं होतं. त्याचप्रमाणे प्रेक्षक उत्सुक नसते, तर 'गांधी विरुद्ध गांधी' या गंभीर नाटकाचेही इतके प्रयोग होऊच शकले नसते. त्या नाटकात अनेक छोटे-छोटे प्रवेश होते. आणि प्रत्येक प्रवेशानंतर अंधार होत असे. तेव्हा नाटक पाहिल्यानंतर महेश एलकुंचवार मला म्हणाले की, प्रवेशांमधल्या अंधारांमुळे मला सावरायला वेळ मिळत होता. नाही तर मला त्रास झाला असता ते नाटक बघून. म्हणजे त्या काळात अशी वैचारिक नाटकंसुद्धा प्रेक्षकांनी स्वीकारली होती, ही फार मोठी गोष्ट आहे. आणि कलाकारांनीसुद्धा ती नाटकं आवर्जून केली. शफाअत खानचं 'शोभायात्रा' हे नाटक कलाकारांनी एक पैसाही न घेता केलं. त्यात सयाजी शिंदे, किशोर कदम, नंदू माधव हे आज रंगभूमीवर मोठे असणारे सगळे नट त्यात होते. हे नाटक व्हायला पाहिजे, या जिद्दीनं त्यांनी कामं केलेली होती. म्हणजे त्या काळी प्रेक्षक तर अशी नाटकं बघायला आलेच, पण कलाकारही अशी नाटकं करायला पुढे आले, हा नवा विचार समजून घेणारे दिग्दर्शकही या नाटकांना मिळाले आणि अशी नाटकं लिहिण्याची ऊर्मी बाळगणारे लेखकही तयार झाले. असा तो काळ होता. तो काळ आता पुन्हा निर्माण करणं हे आपल्या हातात नसतं. आजच्या काळात थोडं मिश्र स्वरूपाचं चित्र दिसतंय, असं मला वाटतं. आता विवेकवादाला धोका कशाचा आहे? तर, आज आधुनिक तंत्रज्ञान किंवा भौतिकता यांचा नव्हे, तर चंगळवादाचा मात्र फार मोठा धोका विवेकवादाला आहे असं मला वाटतं.

प्रश्न – आता नवं एखादं नाटक लिहिताय का? किंवा ज्याच्यावर लिहावं, असा एखादा विषय डोक्यात आहे का?


– असे विषय नेहमीच असतात आणि अनेक बीजं असतात. पण म्हणून लिहिलं जातंच असं नाही. मी नेहमी माझी पत्नी अनुया, भाऊ प्रशांत, चंदू (चंद्रकांत कुलकर्णी), माझी मुलं यांच्याशी बोलतो. काय महत्त्वाचं आहे, काय नाही, कशावर लिहावं– हे चर्चेतून ठरवतो. आणि मग लिहिण्यासाठी कोणता विषय निवडायचा, हे नक्की करतो. त्यामुळे माझ्या नाट्यलेखनात खूप दिवसांचं अंतर पडलेलं असतं. अलीकडे मला आपण पोस्ट-ट्रुथ संकल्पनेविषयी लिहावं, असं वाटतंय. म्हणजे आता इलेक्ट्रॉनिक माध्यमं आणि निरनिराळी संवाद-माध्यमं (सोशल मीडिया) यांत सत्याचा अपलाप करून किंवा वस्तुनिष्ठता बाजूला सारून काल्पनिक गोष्टींवर आधारित सिद्धांत पुढे रेटण्याची जी धडपड सुरू असलेली दिसते, त्याबद्दल काही लिहावं असं मला वाटतंय. पण केव्हा लिहीन, हे आज सांगता येत नाही.

संवादक : विजय दिवाण Mob. 9422706585



कार्यकर्ता : असंघटित कष्टकरी

चेतना गाला-सिन्हा



आज आमच्या माणदेशातल्या खेड्यातल्या उद्योजिका आणि न्यूयॉर्कमधली उद्योजिका, दोघीही मोबाईलवरून आर्थिक व्यवहार करतात. आपल्या व्यवसायाचं प्लॅनिंग आणि मार्केटिंग करतात... हे खऱ्या अर्थाने सबलीकरण आहे, असं मला वाटतं. आमच्या महिला नेहमी म्हणतात, ''व्यवसायात उतार-चढाव होतच असतात, पैसा कमी-जास्त होतच असतो; पर माणदेशीनी आम्हाला जे धाडस दिलंय, तेच आमचं खरं भांडवल आहे.''



चेतना गाला-सिन्हा,
म्हसवड, सातारा
Mob. 9765000013



मुंबई ते म्हसवड व्हाया संघर्ष वाहिनी

श्रीमती चेतना गाला-सिन्हा... एक लोभसवाणं व्यक्तिमत्त्व. माझी आणि त्यांची पहिली भेट २०११ मध्ये झाली... गांधीविचारांच्या कार्यकर्त्यांवर १० फिल्म्स बनवायच्या कामात गुंतले होते, तेव्हा एकीकडे गांधींचे साहित्य वाचन सुरू आणि दुसरीकडे गांधींचे विचार, त्यांची तत्त्वत: प्रत्यक्षात उतरवू पाहणाऱ्या कार्यकर्त्यांची कामं बघून, त्यातून फिल्मसाठी कार्यकर्ते/उपक्रम निवडणे- अशा व्यापात असताना चेतना सिन्हांची माझी ओळख झाली... शिक्षणाने अर्थतज्ज्ञ, पण आपलं पूर्ण शिक्षण व अनुभव हे ग्रामीण महिलांसाठी वापरणाऱ्या.... ग्रामीण महिलांकडून त्यांना काय हवंय हे जाणून घेऊन, ते त्यांना मिळवून देण्यासाठी धडपड करणाऱ्या आणि नुसतं मिळवून देऊन न थांबता प्रत्येक स्त्री चिरंतन सबल होईल यासाठी प्रयत्नशील राहणाऱ्या.... अशा चेतना सिन्हा मला भेटल्या.

पुढे विविध कारणांनी आमचा संपर्क येतच राहिला... त्यांची आणि त्यांच्या कामांची विविधांगी माहिती होत राहिली... थोडक्यात सांगायचं तर मुंबईतल्या एक मध्यमवर्गीय जैन मारवाडी कुटुंबात त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. अर्थशास्त्र आणि फायनान्स यामध्ये पदव्युत्तर शिक्षण त्यांनी घेतलं.

जयप्रकाश नारायण यांच्या संघर्षवाहिनीशी त्या विद्यार्थिदशेत असताना जोडल्या गेल्या आणि त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली.... याच चळवळीत त्यांना त्यांचे जोडीदार भेटले- विजय सिन्हा. तेही हाडाचे कार्यकर्ते. नववीपर्यंत शिकलेले आणि सातारा जिल्ह्यातल्या माण तालुक्यातल्या म्हसवडमध्ये शेती करणारे. घरून होणारा विरोध पत्करून चेतना अन् विजय यांनी लग्न केलं आणि चेतना म्हसवडला स्थायिक झाल्या. गावोगावी फिरणं, महिलांना एकत्र आणणं, विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करणं सुरूच होतं. घरात असणारा शेळीपालनाचा व्यवसाय पुढे नेण्याचं ठरवलं. शास्त्रोक्त शिक्षण घेऊन त्या शेळीपालनाच्या व्यवसायात उतरल्या. इतर महिलांनासुद्धा हे प्रशिक्षण दिलं. होता-होता गावांमध्ये बचतगट तयार होऊ लागले. जवळजवळ शंभरच्या वर छोटे-मोठे बचतगट तयार झाले. या प्रत्येक गटाशी चेतना अगदी वैयक्तिक संबंध ठेवून होत्या. पुढे या भागात छोट्या ग्रामीण उद्योजिकांसाठी माणदेशी बँक सुरू केली, महिलांना उद्योग प्रशिक्षण देण्यासाठी माणदेशी उद्योगिनीची स्थापना झाली. आज माणदेशी फाउंडेशन गुजरात, ओडिशामध्ये पण काम करतंय. आजपर्यंत तीन लाख महिलांच्या आयुष्यात बदल घडवून आणण्यात माणदेशी उद्योगिनी यशस्वी ठरली आहे. हा पूर्ण प्रवास जितका रोमांचकारी आहे, तितकाच प्रेरणादायी पण आहे...

प्रश्न – मुंबईतल्या एका जैन मारवाडी कुटुंबात तुमचा जन्म झाला. शिक्षणानंतर तुम्हाला खूप संधी मिळाल्या असत्या... पण संघर्ष वाहिनीकडे पाय कसे वळले?

– अगदी खरंय, खूप संधी मिळाल्या असत्या. पण आजपर्यंत माझ्या आयुष्यात अपेक्षित ते घडलंच नाहीये... अपेक्षेपेक्षा चांगलंच सगळं होत आलंय. १९७९-८० मध्ये डॉक्टर्स आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा संप होता. तेव्हा कॉलेजच्या इतर मुला-मुलींबरोबर मी गव्हर्न्मेंट हॉस्पिटलमध्ये स्वयंसेवक म्हणून गेले आणि माझ्या लक्षात आलं की, जर तुमच्याकडे पैसे नसतील, तुम्ही गरीब असाल; तर प्रत्येक प्रश्न हा तुम्हाला अधिक तीव्रतेने भेडसावतो. मी ज्या शहरात लहानाची मोठी झाले, जिथे सर्व सोई उपलब्ध आहेत, तिथे जर पैशांअभावी माणसांची इतकी दैना उडू शकते; तर जिथे अगदी साध्या सोईसुद्धा नाहीत आणि गरिबी आहे, तिथे



लोकांचं काय होत असेल? हा प्रश्न मला शांत बसू देत नव्हता आणि मी संघर्षवाहिनीशी जोडले गेले... शेतकरी संघटनेबरोबरसुद्धा काम करू लागले. संघर्ष वाहिनीतर्फे मी बिहारला शेतकऱ्यांना जमीन मिळवून देण्याच्या चळवळीत सहभागी झाले.

'जो जमीन जोते बोए, वो जमीन का मालिक होए...''

या चळवळीत बऱ्याच महिला कार्यरत होत्या... त्या शेतीसुद्धा करायच्या. अखेर प्रशासनाने जमीन शेतकऱ्यांमध्ये वाटायचे ठरवले, पण महिलांना ही जमीन मिळणार नव्हती. आमचा संघर्ष सुरूच राहिला. काही काळाने चळवळीतले कार्यकर्तेसुद्धा महिलांचा मुद्दा सोडून द्यायला तयार झाले, पण मी अडून बसले होते. त्या शेतकरी महिला माझ्यामागे ठामपणे उभ्या होत्या. सरते शेवटी महिलांच्या नावावर जमिनी करायला प्रशासनाने मान्यता दिली. ही मान्यता मिळाल्यावर मुशहर समाजातील मांझर बीबी नावाची महिला माझ्याजवळ आली आणि तिला हव्या असलेल्या जमिनीच्या तुकड्याबद्दल मला उत्साहाने सांगू लागली... तोच तुकडा तुला का हवा आहे, हे विचारल्यावर तिने सांगितलं, ''तिथून हायवे दिसतो... हायवेवरचे दिवे दिसतात...''

वास्तविक, मुशहर समाज म्हणजे डुकरं पाळणारे. त्यांची घरंसुद्धा गलिच्छ असतात आणि समाज त्यांच्यापासून लांब राहतो. स्वत:च्या घरात दिवे नसले, तरी तिला हायवेवरचे दिवे सुखावत होते. विकासाची चाहूल देत होते...

तर विकास आणि सुखसोई लांबून बघूनसुद्धा जे धन्यता मानतात अशा वंचितांसाठी काम करावं, असं तेव्हा मी ठरवलं...

प्रश्न – मुंबई ते म्हसवड या प्रवासाबद्दल आम्हाला सांगाल?

– जे. पीं.च्या चळवळीत माझी आणि विजय यांची ओळख झाली. मी मुंबई विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेत होते. विजयनं नववीनंतर शाळा सोडली होती आणि तो शेती करत होता. हे तर नक्की होतं की, तो म्हसवड सोडणार नाही... मलासुद्धा ग्रामीण भागातच काम करायचं होतं. आम्ही लग्न केलं. तेव्हा मी मुंबई विद्यापीठात शिकवत होते. लग्नानंतर मुंबई-म्हसवड करणं शक्य नव्हतं, म्हणून मी म्हसवडला गेले. मी जेव्हा पहिल्यांदा म्हसवडला येत-जात होते, तेव्हाचा एक अनुभव सांगते. मी मुंबई-म्हसवड एस. टी.मध्ये होते. जसजसं आपण फलटण सोडतो, तसतसा अगदी ग्रामीण भाग सुरू होतो. गाडी या भागात शिरली, त्यादरम्यान मला खूप भूक लागली. 'दहिवडी' स्टँडवर एस.टी. थांबली. दहिवडी नाव वाचल्याबरोबर माझ्या मनात आलं की, इथे दहिवडे तरी नक्की मिळतील. मी उतरले. सकाळपासून काहीच खाल्लेलं नव्हतं... खूप भूक लागली होती, पण खाण्याचं काहीच दिसत नव्हतं. मी एकाला विचारलं, ''इथे दहिवडे मिळतात का?'' तो उत्तरला, ''ते काय असतं?'' मी लाजून म्हटलं– ''तुमच्या स्टँडचं नाव 'दहिवडी' आहे, म्हणून मला वाटलं इथे दहिवडे मिळतील.'' खूप शोध प्रकल्पांवर काम केल्याने, खूप वाचन केल्याने ग्रामीण भागाची खूप माहिती आपल्याला आहे, असं मला वाटत होतं; पण ती माहिती पुस्तकी आहे, हे माझ्या तेव्हा लक्षात आलं. ग्रामीण वातावरणात मी किती 'उपरी' होते, हे माझ्या तेव्हा लक्षात आलं आणि मला अजून खूप काही शिकावं लागणार आहे, हेसुद्धा लक्षात आलं.

ग्रामीण आणि शहरी भागातील फरकातील तीव्रता मला हळूहळू उमगू लागली. आजही हा फरक अस्तित्वात आहेच.

मी जेव्हा पहिल्यांदा म्हसवडला गेले, तेव्हा दुसऱ्या दिवशी सकाळी पहिला प्रश्न उभा राहिला तो शौचाचा. विजयच्या घरात शौचालय नव्हते. ते माझं आणि त्याचं पहिलं भांडण म्हणता येईल. दोन दिवसांत शौचालय बांधून काढलं त्यानं. अख्ख्या गावात हा चर्चेचा विषय झाला होता. खास शौचालय बघायला लोक आमच्या घरी यायचे. प्रमाण आता कमी झालं असलं, तरी उघड्यावर शौच करण्याचा प्रश्न अजूनही आमच्याकडे आहेच.

तिथल्या जीवनमानाशी हळूहळू जुळवून घेऊ लागले. दुसऱ्या गावी जायचं तर एस.टी.ची चार-चार तास वाट बघणं, वीज नाही म्हणून दोन-दोन दिवस कामं थांबणं. असो. एक लक्षात येत होतं की– म्हसवड, माणदेश हा सर्वांत दुर्लक्षिलेल्या भागांपैकी एक. दर वर्षीच निसर्ग इथली कठोर परीक्षा पाहतो.... त्याला जोड प्रशासनाची. म्हणूनच की काय, इथल्या माणसांमध्ये कष्ट करायची, जिद्दीने प्रत्येक प्रश्नाला भिडायची, हवं त्यासाठी झगडा द्यायची ताकद आहे आणि तयारीसुद्धा आहे.

महिलांचे बचत गट बांधायला हळूहळू सुरुवात केली.



त्यांचे दबावगट आपोआप तयार झाले. इथल्या महिलांमध्ये मी जितकी वावरले, तितकं मला जाणवू लागलं की- त्यांना काय हवंय, हे त्यांना माहिती आहे. गरज आहे ती फक्त त्यांचं ऐकून घेऊन त्यांना दिशा दाखवायची. हळूहळू लक्षात येत होतं की- यांच्यासाठी जर काम करायचं असेल, तर 'महिला सक्षमीकरण', 'फेमिनिझम', 'सोशॅलिझम' वगैरे सगळे पुस्तकी 'इझम' आपल्या डोक्यातून काढून टाकून, त्यांनी काय केलं पाहिजे हे त्यांना (आपल्या कल्पनांप्रमाणे) न सांगता, त्यांना काय हवं आहे, हे विचारून कामाला लागलं पाहिजे.

थोडक्यात, माझ्या बुद्धीवरची शिक्षणाची पुटं पुसून पाटी कोरी केली, तरच मला काही करता येईल, हे माझ्या लक्षात आलं... त्यामुळे मुंबई ते म्हसवड हा प्रवास फक्त ठिकाणाचा बदल नव्हता, तर माझ्या दृष्टिकोनातील पूर्ण बदल होता.

प्रश्न – 'माणदेशी बँक' कशी सुरू झाली?

– मी आधी सांगितलं तसं ज्यांच्यासाठी आपण काम करतो, त्यांना असणारे प्रश्न त्यांना माहिती असतात आणि त्या प्रश्नांची उत्तरंसुद्धा माहिती असतात; गरज असते ती फक्त त्यांचं म्हणणं ऐकण्याची. बचतगटांच्या एका सभेत एक विळा-खुरपी बनवून विकणारी बाई माझ्याजवळ आली. तिला बँकेत खातं उघडायचं होतं, कारण तिला पैसे साठवून बचत करायची होती. मी तिला बँकेत जायचा सल्ला दिला. ती आधीच बँकेत जाऊन आली होती आणि बँकेनं तिचं खातं उघडायला नकार दिला होता, कारण तिची रोजची बचत फक्त तीन रुपये असणार होती. मी तिला तिचं बचत करण्यामागचं कारण विचारलं. ती म्हणाली, ती रस्त्यावर राहते. तिच्याकडे हक्काचा आडोसा नाही; उन्हाळ्यात तिच्या मुलांना फीट येऊ नये, म्हणून कागद-प्लॅस्टिक असं काही तरी वापरून आडोसा करता यावा, म्हणून बचत करायची होती. म्हणजे तिचा प्रश्न तिला माहिती होता आणि तो सोडवायचं उत्तरही तिला माहीत होतं. मग मी तिच्याबरोबर सर्व बँकांमध्ये जाऊन आले. पण तिचं खातं त्यांना परवडणारं नसल्यामुळे त्या खातं उघडायला नकार देत होत्या. ही बाई वास्तविक इतकी नडलेली होती, तरीही ती सरकारकडे तक्रार करत नव्हती किंवा गाऱ्हाणं सांगत नव्हती. अडचणीच्या वेळेसाठी बचत करता यावी, एवढीच फक्त तिची इच्छा होती. मग अशा बाईला संधी का मिळू नये? जे. पीं.चा वसा असल्यामुळे, आपणच बँक उघडू' असं माझ्या मनात आलं आणि महिला पटापट तयार झाल्या.

आम्ही आरबीआयला प्रपोजल पाठवलं, ते आरबीआयने नाकारलं. कारण सर्व सभासदांची स्वाक्षरी जिथे लागते, तिथे सगळ्यांचे अंगठे होते. हे ऐकून मी खजील झाले. पण आमच्या महिला म्हणाल्या, ''त्यात काय? आम्ही लिहायला-वाचायला शिकतो. मग आमचे साक्षरतेचे वर्ग सुरू झाले. परत आरबीआयमध्ये जाताना या सर्व महिला माझ्यासोबत आल्या. आरबीआयच्या गव्हर्नरला त्यांनी ठणकावून सांगितले- ''आम्हाला लिहिता-वाचता येत नाही, म्हणून तुम्ही आमचा परवाना नाकारलात, पण आमचं तुम्हाला एक आव्हान आहे. तुम्ही आम्हाला कुठल्याही रकमेचं व्याज मोजायला सांगा आणि ते आम्हाला जमलं नाही तर परवाना देऊ नका. पण आमच्याबरोबरीने तुम्ही तुमच्याही अधिकाऱ्याला कॅल्क्युलेटरशिवाय त्याच मुदलाचं व्याज मोजायला सांगा आणि त्यात कोण वेगानं मोजतंय, ते आपण बघू.'' आम्हाला परवाना अशा रीतीने मिळाला, आणि आमची बँक सुरू झाली. आम्ही बऱ्याचशा बचत योजना त्यांच्या गरजांप्रमाणे सुरू केल्या. मुलांच्या शाळेची फी भरायच्या वेळेला मॅच्युअर होणाऱ्या एफडी, असे वेगवेगळे प्रयोग आम्ही करून पाहिले. एक घटना सांगते- काही खातेदार महिला पासबुक बँकेतच ठेवू लागल्या. हे नियमाविरुद्ध आहे. त्यांचं म्हणणं होतं की,





पासबुक घरी नेलं तर नवऱ्याला, मुलाला माझी बचत किती आहे, हे कळेल. माझी बचत फक्त मला कळेल आणि फक्त मलाच माझ्या खात्यातून पैसे काढता येतील, असं काही तरी पाहिजे. मग आम्ही त्यांना डिजिटल पासबुक दिले. त्यातही त्यांना पिन लक्षात ठेवायची भानगड नको होती, कारण लक्षात ठेवायचं म्हणजे पीन कुठे तरी लिहून ठेवायची किंवा कुणाला तरी ते आकडे दाबायला सांगायचे. म्हणून मग आम्ही 'बायोमॅट्रिक एनेबल कार्ड' त्यांना दिले.

सांगायचा मुद्दा हा की, या महिलांना त्यांना काय हवंय, हे चांगलंच माहितीये. गरज आहे आपण त्यांचं ऐकायची. ग्रामीण भागातल्या गरिबांना फक्त बँकिंग सुविधांचा ॲक्सेस नकोय... त्यांना त्यांच्या अर्थकारणावर कंट्रोल हवा आहे.... त्यांना त्यांच्याकडे असणारा पैसा वाढवायचा आहे.... तो कसा वाढवायचा, हेसुद्धा त्यांना माहिती आहे. त्यामुळेच मला या सगळ्यांमध्ये वावरताना- जसं फेमिनिझम वगैरे हे पुस्तकी शब्द वाटतात, तसंच- फायनान्शियल इन्क्लूजन वगैरे शब्दसुद्धा फोल वाटतात.

या देशातील गरीब जितके प्रयत्नशील आणि क्रिएटिव्ह आहेत, तितके कुठलेच नाहीत. पैसा कसा कमवायचा, तो कसा साठवायचा, तो कसा वाढवायचा, हे यांना माहिती आहे. गरज आहे, त्यांना हव्या त्या सुविधा पुरवण्याची. विशेषत: महिलांच्या बाबतीत मला वाटतं... जर घराचं अर्थकारण महिलांच्या हातात आलं, तर प्रत्येक घराचं चित्रच पालटेल... महिला बचत तर करतातच; पण घरातली प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक प्राणी आणि वस्तूवर त्यांचं प्रेम असतं, त्यामुळे त्या सर्व काही जिवंत ठेवतात... वाढवितात. आपला समाज सजग आणि सृजनशील आहे तो महिलांमुळेच, असं माझं मत आहे.

प्रश्न – या वर्षीच्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या तुम्ही को-चेअरपर्सन असणार आहात, तिथे कोणते मुद्दे मांडायचे तुम्ही ठरवले आहेत?

– महिलांना बँकिंग सुविधा पुरवणं हे फायद्याचं आहे, हे महिलांनी गेल्या २५ वर्षांत दाखवून दिलं आहे. आज २० वर्षांनंतर मोठ्या बँका मायक्रोफायनान्समध्ये शिरण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पण त्यांनी या महिला किंवा इथले गरीब शेतकरी यांचा आणि त्यांच्या गरजांचा नीट अभ्यास केलेला नाही. भारतातल्या प्रत्येक ग्रामीण महिलेमध्ये तिचा व्यवसाय उभा करण्याची- त्यातून उत्पन्न घेऊन, बचत करून- इन्व्हेस्टमेंट करून, व्यवसाय वाढवायची क्षमता आहे आणि ही क्षमता आज कल्टिव्हेट करायची गरज आहे, असं मला वाटतं.

त्यामुळे वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये माझं सांगणं हेच राहील की, जगातल्या इन्व्हेस्टर्सनी मायक्रोफायनान्समध्ये तर इन्व्हेस्ट करावंच, ते नक्कीच फायद्याचं आहे; पण ते जर जास्त फायद्याचं ठरायचं असेल, तर महिला व्यावसायिकांमध्ये त्यांनी इन्व्हेस्ट करावं. सगळ्यात आधी तर या व्यावसायिकांच्या आर्थिक गरजांचा अभ्यास करावा, त्यांना कमीत कमी व्याजदरात कर्ज कसं देता येईल. याचा अभ्यास करावा. या व्यावसायिकांना खूप भांडवल/पैशांची गरज नसते; पण व्यवसायाच्या रीतीभाती समजून घ्यायची, त्यांचे पारंपरिक प्रश्न सुटायची जास्त गरज असते. जर या सगळ्यांचा अभ्यास मोठ्या-मोठ्या इन्व्हेस्टर्सनी केला आणि त्यातून नव्या प्रकारच्या आर्थिक योजना उभ्या राहिल्या, तर छोटे व्यावसायिक व मोठे इन्व्हेस्टर्स, दोघांनाही फायद्याचं राहील.

याव्यतिरिक्त मला वाटतं की, मायक्रोफायनान्सकडे फक्त इन्व्हेस्टमेंटची एक संधी म्हणून बघू नये. त्यांची इन्व्हेस्टमेंट ही व्यवसायांमध्ये तर होतेच, पण ती त्या समाजातल्या माणसांमध्ये होते. जर समाजातल्या माणसांमध्ये गुंतवणूक झाली, तर त्याचा फायदा खूप जास्त पटींनी आणि जास्त काळ टिकणारा असतो. म्हणून माणसांमध्ये- समाजामध्ये इन्व्हेस्टमेंट होणं खूप आवश्यक आहे.

अजून एक तिसरा आणि महत्त्वाचा मुद्दा जो मी मांडणार आहे, तो हा की- पिढीजात व्यवसाय करणाऱ्यांचे व्यवसाय निसर्गाशी जोडलेले आहेत. बोर्डरूममध्ये बसून ग्लोबल वॉर्मिंगवर चर्चा तर सगळेच करतात; पण ज्यांच्या पारंपरिक व्यवसायांवर या जागतिक प्रश्नांचा परिणाम होतो आहे, ते व्यवसाय कशा पद्धतीने वाचवता येतील किंवा त्या व्यवसायांना बदलत्या निसर्गाशी कसं जुळवून घेता येईल, यावर शोध घ्यायला हवा. छोट्या व्यावसायिकांमध्ये आणि समाजामध्ये जर अशा पद्धतीने गुंतवणूक होऊ लागली तर आणि तरच माणसांमधील दरी कमी व्हायला मदत होईल.

आज आमच्या माणदेशातल्या खेड्यातल्या उद्योजिका आणि न्यूयॉर्कमधली उद्योजिका, दोघीही मोबाईलवरून आर्थिक व्यवहार करतात. आपल्या व्यवसायाचं प्लॅनिंग आणि मार्केटिंग करतात.... हे खऱ्या



अर्थाने सबलीकरण आहे, असं मला वाटतं.

आमच्या महिला नेहमी म्हणतात, ''व्यवसायात उतार-चढाव होतच असतात, पैसा कमी-जास्त होतच असतो; पर माणदेशीनी आम्हाला जे धाडस दिलंय, तेच आमचं खरं भांडवल आहे.'' म्हणून मी नेहमी म्हणते की, लोकांचं व्यवसायाचं धाडस आणि क्षमता यामध्ये इन्व्हेस्टमेंट हीच सगळ्यात फायद्याची इन्व्हेस्टमेंट ठरेल...

प्रश्न – तुम्ही काम सुरू केलं तेव्हाचा ग्रामीण भारत आणि आजचा ग्रामीण भारत, यात तुम्हाला काय फरक/तफावत जाणवते?

– महात्मा गांधींनी म्हटलंय की, खरा भारत खेड्यात राहतो. पण पूर्वी सारखी खेडी आता राहिली नाहीत. प्रत्येक खेडेगावानं आता अगदी छोट्या शहराचं रूप घेतलं आहे. तंत्रज्ञानामुळे घरांनी, शाळांनी इतर इमारतींनी शहरी रूप तर धारण केलंच आहे, पण माणसांची मनंसुद्धा हळूहळू शहरी होताना दिसत आहेत. तंत्रज्ञान आणि माहिती अगदी बोटाशी आल्यामुळे शहरांसारखीच वेगवान प्रगती आपण करावी, असा मानस इथल्या माणसांमध्ये तयार होऊ लागला आहे. त्यांची ध्येये उंचावू लागली आहेत. विशेषत: तरुणांमध्ये हा बदल जास्त जाणवतोय. तरुण मंडळी परंपरांचं ओझं झिडकारताना दिसतात. म्हणूनच पारंपरिक चालीरीती मोडून नवे अनुभव घ्यायची, नवा व्यवसाय करायची तयारी दाखवत आहेत. उदाहरणार्थ- आमच्या माणदेशीमध्ये येणाऱ्या तरुण मुलींचा कल हा शिवणकाम वगैरेपासून हटून शेळ्यांचे कृत्रिम रेतन करणे, कॉम्प्युटर ग्राफिक्स वगैरेकडे वळला आहे. आम्हाला आमच्या फाउंडेशनतर्फे नवे-नवे कोर्स त्यामुळे सुरू करावे लागत आहेत. या मुली येऊन आम्हाला वेगवेगळ्या नव्या व्यवसायांचे प्रशिक्षण द्यायला सांगतात. आम्हाला हे करणं भाग आहे, कारण तंत्रज्ञान हाताशी आलेलं असताना आणि माहितीचा महापूर या तंत्रज्ञानाने प्रत्येक घरापर्यंत आणून ठेवलेला असताना; जर या तरुणांच्या गरजांकडे लक्ष देऊन त्यांना योग्य दिशा नाही दाखवली गेली, तर खूप मोठ्या प्रमाणात ही तरुण पिढी भरकटण्याची शक्यता आहे. आणि याला जबाबदार हा समाज अन् आपणच असू.

या ग्रामीण भागात राहणाऱ्या तरुण पिढीला भौतिक सुखं खुणावत आहेत. यामुळे ते आपापली गावं सोडून शहराकडे तरी झेपावतील, नाही तर पैसा कमवायचे वेगवेगळे मार्ग शोधतील. हे मार्ग नेहमीच चांगले असतील, असंही नाही. म्हणून जाणकार समाजाने या पिढीच्या इच्छा-आकांक्षा समजावून घेऊन, ही पिढी भरकटणार नाही यासाठी ठोस पावलं उचलणं फार आवश्यक आहे.

प्रश्न – पण या तंत्रज्ञानाचे काही फायदेही असतीलच की...

– हो, नक्कीच आहेत. तंत्रज्ञानाचा फायदा घेऊन ही नवी पिढी नवा प्रयोग करत आहे. नवी वस्तू, सुविधा तयार करते आहे.... त्यांची मनं खुली आहेत... ते नवे धोके पत्करायला तयार आहेत आणि नवे व्यवसाय त्यांना खुणावत आहेत. जुने व्यवसाय, मोठ्या कंपन्या, गावातील बडी धेंडं यांची मोनोपॉली त्यामुळे गळून पडली आहे. आर्थिक दृष्ट्या दोन माणसं एका पातळीवर आली की, समाजात सकारात्मक बदल आपोआप होताना दिसतात. तसंच काहीसं होऊ लागलंय. या माहिती तंत्रज्ञानामुळे पारंपरिक व्यवसाय, त्यांच्याबरोबर येणारा सामाजिक आकस हे सगळं बदलायला लागलंय, जी विकासाच्या दृष्टीने खूपच चांगली गोष्ट आहे.

प्रश्न – बदलत्या भारताबद्दल अजून काय म्हणाल?

– तरुण पिढी व्यवसायाकडे नव्या दृष्टीने बघते आहे, ही चांगली गोष्ट आहे. पण त्यांना साथ देऊ शकणारे दोन घटक सरकार आणि बँका हे कुठे तरी मागे पडत आहेत.

ज्या वेगाने माहिती तंत्रज्ञान पसरतंय, त्या वेगाने सरकार त्यावर अंकुश ठेवू शकत नाहीये किंवा असं म्हणू या की, त्याचा उपयोग नीट करून घेत नाहीये.

दुसरं एक जे मला वारंवार जाणवतं, ते म्हणजे- घोषणाबाजी. सरकारची मीडिया कॅम्पेन जितकी इनोव्हेटिव्ह असते, तेवढे इनोव्हेटिव्ह त्यांचे उपक्रम असतीलच असं नाही.

तसंच बँकासुद्धा जाहिरातींवर खूप खर्च करतात, पण गरीब लोकांसाठी बँकेच्या प्रक्रिया सोप्या करणं, हे अजून त्यांना शक्य होताना दिसत नाही...


मला वाटतं, समाजातले आर्थिक प्रश्न सोडवायचे असतील, तर लोकांना-तरुणांना हाताशी घेऊन, समस्येच्या मुळाशी जाऊन, प्रयोग करून, रिस्क घेऊन उत्तरं शोधणं आवश्यक आहे आणि त्यासाठी राजकारणी, प्रशासन व आर्थिक निर्णयकर्त्यांनी ए.सी. रूममधून बाहेर पडून लोकांशी संवाद साधला पाहिजे.

संवादक : रिमा अमरापूरकर Mob. 9920348006



कार्यकर्ता : मुस्लिम महिलांच्या प्रबोधनासाठी

रुबिना पटेल



मुस्लिम धर्मीयांत आढळून येणारा शरियतचा कायदा, बुरखापद्धती आणि बहुपत्नीत्व प्रथा या सर्व कारणांमुळे प्रत्येक तीन मुस्लिम घरांमागे एका घरातील महिला पीडित आहे. ही परिस्थिती निश्चितच फार गंभीर आहे. खऱ्या अर्थाने आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जर सर्वांत जास्त गरज कोणाला असेल, तर ती दलित पीडितांपेक्षाही मुस्लिम महिलांना आहे. नऊ वर्षांपासून शरियतच्या कायद्यामध्ये बदल व्हावा, यासाठी अनेक आंदोलने केली. विविध चळवळींच्या माध्यमातून अद्याप आमचे प्रयत्न सुरू आहेत आणि ते सुरूच राहणार. आमच्या या कार्याला अनेकांचा विरोध आहेच. विरोधक सतत वेगवेगळ्या पद्धतींनी आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न करतात. पण दरवेळी मी डॉ.बाबासाहेबांना आठवते.



रुबिना पटेल, नागपूर
Mob. 9923162337



Date of Publication - 13-01-2018

जात-धर्माची बेडी तोडून टाकायची आहे !

धर्म कोणताही असो- त्याच्या आड जेव्हा कोणाच्या मौलिक अधिकारांचे हनन किंवा शोषण केले जाते, तेव्हा त्याचा परिणाम समाजासाठी नेहमी घातक सिद्ध होऊ शकतो. अशाच धर्म आणि पुरुषी अहंकाराची शिकार झालेल्या नागपूरच्या ४४ वर्षीय रुबिना पटेल यांनी धर्माच्या सर्व बेड्यांमधून स्वतंत्र होऊन माणुसकीचा मार्ग निवडला आणि स्वत:सारख्या पीडित महिलांसाठी त्या आधारवड बनल्या; पण हा आधारवड होण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास मात्र किती बिकट होता याचा आपण विचारही करू शकत नाही.

आज रुबिना पटेल अख्ख्या महाराष्ट्राला परिचित आहेत त्या मुस्लिम महिलांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या लढवय्या कार्यकर्त्या म्हणून. मुस्लिम महिला मंचच्या संस्थापक म्हणून. रुबी ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या डायरेक्टर म्हणून. अनेक ड्रॉपआऊट मुलींना १० वी चे शिक्षण घेण्यास मदत करणाऱ्या म्हणून. अनेक तलाकपीडितांची आधारवड म्हणून.

प्रश्न – रुबिना, तुझं बालपण कसं गेलं? तुझी जडण-घडण कशी घडली? नेमकं कुणाचं सहकार्य लाभलं तुला, तुझ्या डोळे दिपवून टाकणाऱ्या कार्याला? कारण गेल्या आठ-दहा वर्षांपासूनच आम्ही तुला या सोशल ॲक्टिव्हिटीमध्ये बघतो आहोत; कमी काळात तू खूप काम केल्याचं दिसतं आहे.

– माझं बालपण फारच बिकट गेलं. कुणाच्याही वाट्याला असं बालपण येऊ नये. मी नागपूरजवळच्या उमरेड तालुक्यातील. खरं तर आम्ही पटेल लोक एकदम सधन, पण माझे वडील खूपच दारू प्यायचे. दारूमध्ये त्यांनी आमची पूर्ण इस्टेट उधळली. त्यांच्यावरही देशी दारू पिण्याची वेळ आली आणि आम्ही- मी, माझा भाऊ आणि माझी आई आम्ही- एक वेळच्या जेवणालासुद्धा मोताद झालो. माझ्या आईवर मोलमजुरी करून पोट भरण्याची वेळ आली. माझे वडील स्वभावाने इतके दुष्ट होते की, ज्या दिवशी माझी आई पोटभर जेवण बनवू शकत होती त्या दिवशी ते त्यांचं जेवण झालं की गंजात पाणी टाकून ठेवायचे किंवा राक्षसासारखे स्वत:च सगळं फस्त करायचे किंवा फेकून द्यायचे. आमच्यावर पाणी पिऊन झोपण्याची वेळ यायची. मारपीट तर आमच्या पाचवीलाच पूजलेली होती. रात्री झोपेतून केस पकडून, लाथा मारून उठवायचे. बऱ्याचदा थंडीत, पावसात घराबाहेर हाकलून द्यायचे. नातेवाइकांकडूनही आमची अवहेलना सतत होत होती. मी आणि माझा लहान भाऊ त्यांनी सांगितलेली सगळी कामं मुकाट ऐकायचो, तरीही ते लोक आम्हाला मारपीट करायचे. त्यामुळे मी 'रम्य ते बालपण' वगैरेसारख्या गोष्टी फक्त पुस्तकातच वाचल्या आहेत.

यात एकच जमेची बाजू होती, तीच मला जगण्यास प्रेरणा देत होती. ती म्हणजे, मला लहानपणापासून शिक्षणाची खूपच आवड होती. प्रत्येक गोष्टीबद्दल मला जिज्ञासा असायची. हुशार होते मी. तेव्हासुद्धा माझ्या मनात सारखं हे असायचं की- आमच्यासारख्या गरीब पण होतकरू, हुशार मुलांच्या शिक्षणासाठी सरकारनेच काही तरी करायला हवे किंवा आम्हाला लवकरात लवकर कौशल्यविकासाचं काही तरी ट्रेनिंग द्यायला हवं; जेणेकरून आम्ही लौकर आमच्या पायावर उभे राहू शकू. कारण मला तर एक-एक दिवस कठीण होता. कधी मी शिकते, मोठी होते आणि माझ्या पायावर उभी राहते, असं मला झालं होतं; पण दुर्दैव माझा पिच्छा सोडत नव्हतं.

मी बारावी झाले आणि अचानक ध्यानी-मनी नसताना माझ्या वडिलांनी माझा निकाह एका मास्तरसोबत लावून



दिला. खरं तर मला एवढ्या लवकर लग्नच नव्हतं करायचं; पण वडिलांसमोर बोलण्याची सोयच नव्हती. त्यातल्या त्यात मला या गोष्टीचं समाधान होतं की, माझा निकाह एका शिक्षकाशी होतो आहे. मला वाटलं की, माझा होणारा नवरा जर शिक्षक आहे तर तो मला खूप छान नक्कीच शिकू देईल. लग्नानंतर लगेच माझ्या लक्षात आलं की, छळ माझ्या पाचवीलाच पूजलेला आहे. फरक एवढाच होता की, लग्नाआधी जन्मदाता मला छळत होता आणि आता ज्याच्यासोबत जन्मभर आनंदानं संसार करेन, असे स्वप्न उराशी बाळगून ज्याच्या भरवशावर मी या घरात पाऊल टाकलं होतं, तोच माझ्या जीवावर उठला होता. त्याने मला माझ्या आग्रहास्तव शिकू दिले, कारण त्यामुळे त्याला समाजात पुढारलेल्या विचारांचा शौहर म्हणून मान्यता मिळत होती; पण घरात मात्र त्याची मारझोड नित्याचीच होती. मला राहायला छान घर, कपडेलत्ते, खायला भरपूर हे सारं होतं; पण शारीरिक, मानसिक, लैंगिक छळ मात्र खूप होता.

अशातच मुलगा झाला. त्याही परिस्थितीत हट्ट करून मी बी.ए. प्रथम वर्षाची परीक्षा दिलीच आणि त्यात मी पासही झाले. त्यामुळे माझ्या स्वत:बद्दलच्या अपेक्षा आणखीच वाढल्या. मला उंच आकाशात उडायचे होते; पण नवरा माझे पंख कापायला सतत टपलेलाच असायचा. एक दिवस घरात खूप भांडण झाले. त्याने मला इतके मारले की, मी जवळजवळ मृतावस्थेतच रात्रभर पडून राहिले. पण जाऊ कुठे? मला माहेर तर नव्हतेच. माझ्या आईच्या हातात काहीच नव्हतं. नातेवाईक, समाज माझे हितचिंतक कधीच नव्हते. मी मनाशी काही तरी निर्धार केला आणि जशी मला संधी मिळाली, तशी १९९४ मध्ये मी माझ्या ११ महिन्यांच्या मुलाला घेऊन घर सोडलं आणि बडवानीजवळ कसरावादला तेव्हा बाबा आमटे राहायचे, त्यांच्यापर्यंत पोचले. मला त्यांच्यासोबत राहून समाजसेवा करायची होती. साधनाताई आणि बाबा आमटेंना माझी सगळी कर्मकहाणी सांगितली. त्यांनी मला सहानुभूती दाखविली. माझी सांत्वना केली. पण माझ्या नकळत माझ्या नवऱ्याला टेलिग्राम पाठवून बोलावून घेतलं, त्याला पुन्हा असं न वागण्याची समज दिली आणि मला त्याच्यासोबत जायला सांगितलं.

तिथेच सगळं चुकलं. तेव्हा जर मला बाबा आमटेंनी समजून घेतलं असतं, आधार दिला असता, माझ्या नवऱ्यावर विश्वास टाकला नसता; तर पुढे मला जो भयंकर मन:स्ताप झाला, तो झाला नसता. माझ्या संसाराला १२ वर्षं झाल्यानंतर पुढे त्यानं माझी इच्छा नसताना मला तलाक दिला. स्वत: दुसरे लग्नही केले. ते लग्न थांबवायला पोलिसांना मदत मागितली, तर त्यांनी मला मदत केली नाही. उलट पोलिसांनी मलाच 'गप्प बसा, नाही तर तुमच्यावरच गुन्हा दाखल करू' म्हणून धमकी दिली. नवऱ्यानेच माझ्यावर खोट्या केसेस दाखल केल्या. अन्याय माझ्यावर होत होता; पण सर्व लोक त्याच्याच बाजूने होते. माझा मुलगाही मला मिळाला नाही. मुलगी मात्र मला दिली, कारण त्याला मुलीची जबाबदारी घ्यायची नव्हती. त्याच्यासोबत भांडत असताना त्याने मला विहिरीत ढकलले. त्यातून मी कशीबशी वाचले, तर आत्महत्येचा प्रयत्न केला म्हणून त्याने माझ्याविरुद्ध पोलिसांत तक्रार केली. माझ्यावर कोर्टात केस चालू झाली. मी निर्दोष आहे, असं त्यांना रडून-भेकून सांगत होते; पण न्यायाधीश मॅडमही 'हिलाच अटक करा' म्हणून माझ्यावर ओरडल्या. वकील करायला माझ्याजवळ पैसा नव्हता. कायद्याचे मला ज्ञान नव्हते. त्यामुळे मी केस हरले; पण तिथून पुढे मी कायद्याचा बारकाईने अभ्यास केला. बी.एस.डब्ल्यू., एम.एस.डब्ल्यू केले. हिमतीनं उभी राहिले आणि जी काय आहे ती आज मी तुमच्यासमोर उभी आहे.

प्रश्न – कोर्टात तुम्ही 'मुस्लिम पर्सनल लॉ'ला चॅलेंज केलं, ते खरं आहे काय?

– मी 'मुस्लिम पर्सनल लॉ'ला चॅलेंज केलं नाही. माझ्यावर जो अन्याय झाला होता, त्यासाठी मी कोर्टात न्याय मागितला. सामाजिक चाली-रीती आणि पुरुषी मानसिकतेविरोधात मी उभी राहिले. 'मुस्लिम पर्सनल लॉ'नुसार खरं तर निकाहच्या वेळी मुलीची संमती घेण्याचा नियम आहे. 'कुबूल है?' असं मुलीलाही विचारलं जातं. मुलीच्या सुरक्षिततेसाठी पतीकडून मेहेर देण्याची पद्धत आहे. परंतु धर्माचा पुरुषांच्या बाजूने त्यांच्या फायद्यासाठी धर्मगुरुंद्वारे चुकीचा अर्थ सांगण्यात येतो. 'मुस्लिम पर्सनल लॉ'च्या तरतुदीचा अभ्यास मीही माझ्या केससाठी केला होता. त्यामुळे माझ्या ते लक्षात आलं. अर्थात पुरुषांनी सगळे नियम-कायदे आपल्या हितासाठीच बनवले आहेत, असं दिसून येतं.

मुस्लिम पर्सनल लॉ (शरियत कायदा) हा सांविधानिक कायदा नाही, तो कस्टमरी लॉ आहे. याचा अर्थ धार्मिक रीती-रिवाजाने आलेले नियम, प्रथा आहे ते मानणं



बंधनकारक नाही. अनेक वेळा मुस्लिम पुरुष शरियत कायद्याचा आधार घेऊन स्त्रियांवर अन्याय करतात. चार लग्नांचा अधिकार आहे असे समजून वाटेल तेव्हा पत्नीला तलाक दिला जातो. खरं तर अनेक इस्लामी देशांमध्ये शरियत कायद्यात सुधारणा झाल्या आहेत. आपल्याही देशात अशा सुधारणा होणे ही काळाची गरज आहे.

माझ्या केसमध्ये मी अशी बाजू मांडली की, मला हा तलाक मान्य नाही. शरीयत अदालतीमधील मुफ्तींनी जो तलाकचा फतवा बनविला, तो कायद्यास धरून नाही. माझ्या आयुष्याचा निर्णय घेण्याचा मुफ्तींना कसा अधिकार आहे? त्यांना हा अधिकार कुणी दिला? अनेक वेळा व्यक्तीला जिवानिशी मारण्याचाही फतवा दिला जातो. मोबाईलवर, एसएमएसद्वारे, इंटरनेटद्वारेही तलाक दिला जातो. परंतु संविधानाच्या अनुच्छेद १४ मध्ये प्रत्येक व्यक्तीला समानतेचा मूलभूत अधिकार आहे; तर १५ नुसार सरकार कुठल्याही धर्म, जाती, लिंग, वयाच्या आधारे भेदभाव करू शकत नाही. असे असताना माझ्याबाबत हा सांविधानिक भेदभाव का? तलाक मान्य करणे माझ्या सांविधानिक अधिकाराचे हनन नाही का? मी माझे मुद्दे मांडत असताना वकील लोक माझी बाजू कौतुकाने ऐकत होते. कौटुंबिक न्यायालयातील जज मॅडम मला म्हणाल्या, ''तुम्हारी बात सही है. तुम तुम्हारे जैसे लडकियोंके लिये काम करो. लेकिन पहले एलएल.बी करो.'' मी त्यांना सांगितलं, मी आजही माझ्यासारख्याच अनेक स्त्रियांसाठी लढतेच आहे. शहाबानोनंतर आजही मुस्लिम महिलांच्या पोटगीचा प्रश्न सुटलेला नाही.

प्रश्न – तुमच्यावर कुणाचा प्रभाव आहे?

– ज्यांच्यामुळे आम्ही तमाम स्त्रीवर्ग आज इथवर पोचलो, आम्हाला शिक्षणाचा अधिकार मिळाला ते महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा माझ्या आयुष्यावर खूप प्रभाव आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमध्येच मुस्लिम महिलांचे स्वातंत्र्य आणि मुक्तीचा विचार समाविष्ट आहे. संविधानामधील १४४ कलम हे स्त्री–पुरुष समानता समस्त भारतीय नागरिकांना प्रदान करते. मात्र मुस्लिम धर्मीयांत आढळून येणारा शरियतचा कायदा, बुरखापद्धती आणि बहुपत्नीत्व प्रथा या सर्व कारणांमुळे प्रत्येक तीन मुस्लिम घरांमागे एका घरातील महिला पीडित आहे. ही परिस्थिती निश्चितच फार गंभीर आहे. खऱ्या अर्थाने आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जर सर्वांत जास्त गरज कोणाला असेल, तर ती दलित पीडितांपेक्षाही मुस्लिम महिलांना आहे.

नऊ वर्षांपासून शरियतच्या कायद्यामध्ये बदल व्हावा, यासाठी मी अनेक आंदोलने केली. विविध चळवळींच्या माध्यमातून अद्याप आमचे प्रयत्न सुरू आहेत आणि ते सुरूच राहणार. आमच्या या कार्याला अनेकांचा विरोध आहेच. विरोधक सतत वेगवेगळ्या पद्धतींनी आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न करतात. त्या प्रयत्नात त्यांची मजल माझ्यावर खुनी हल्ला करण्यापर्यंत गेली. पण दरवेळी मी डॉ.बाबासाहेबांना आठवते. आम्ही २५ डिसेंबरनंतरचा संपूर्ण पंधरवडा स्त्रीमुक्तिदिन म्हणून साजरा करतो. 'तू शिल्पकार हो तुझ्या भवितव्याचा, घे लाभ करूनी यास्तव या दिव्यतेचा,' या डॉ.आंबेडकरांच्या संदेशाला मी माझ्या हृदयावर कोरून ठेवले आहे.

माझ्यासाठी दुसरा आदर्श किंवा माझी प्रेरणा माझी आई आहे. माझ्या आयुष्यातल्या प्रत्येक क्षणात ती माझ्या पाठीशी आहे. माझ्या संघर्षात मला तिची साथ आहे. ती माझ्या सोबत आहे, म्हणूनच मी या दुनियेशी लढण्याची हिंमत करू शकले.

प्रश्न – मुस्लिम समाजात अल्पवयीन मुलींचे विवाह होण्याची कारणं काय आहेत? ते रोखण्यासाठी कायदे सक्षम नाहीत काय?

– 'मुस्लिम पर्सनल लॉ'मुळे मुस्लिम समाजात अल्पवयीन मुलींचे विवाह वाढत आहेत. भारतीय घटना अमलात आल्यानंतर कुठलाही लॉ अस्तित्वात नसले पाहिजेत. तथापि, 'मुस्लिम पर्सनल लॉ'च्या नावाखाली





मौलानांकडून जाचक फतवे काढले जाताहेत. आपले अथवा आपल्या समाजातील व्यक्तींचे भले कशात आहे, याचा विसर पडल्याने हे होत आहे. परिणामी, समाजातील बालविवाहांचे प्रमाण वाढते आहे. त्याला अशिक्षित–पणाही कारणीभूत आहे. कुराणामध्ये महिलांना सन्मान आहे, चांगले अधिकार आहेत. मात्र त्याबाबत पुरुष मंडळी आग्रही नाहीत, उलट महिलांचे शोषण कसे होईल याचाच विचार केला जातो.

अल्पवयीन मुलींचे विवाह रोखण्यासाठी कायदे सक्षम असले तरी त्यांची अंमलबजावणी कशी होते, यावर बरेचसे अवलंबून आहे. एखाद्या ठिकाणी अल्पवयीन मुलीचा विवाह होत असल्यास पोलीसही कागदपत्रांची मागणी करतात. आश्चर्याची बाब म्हणजे, अनेकदा हे विवाह उन्हाळ्यात होतात. हा काळ सुट्टीचा असतो. त्यामुळे शाळांमधून कागदपत्रे मिळणे अशक्य असते. आईने जी आपल्या मुलीची जन्मतारीख सांगितली, तीच सत्य मानावी.

प्रश्न – मुस्लिम महिलांच्या नेमक्या समस्या कोणत्या आहेत?

– महिलांचा आदर करावा, असे मुस्लिम धर्मात सांगितले आहे. मात्र तसे होत नाही. शरियतमधील (धर्म) काही नियम या महिलांवर लादले जातात. बुरखा पद्धत व पर्सनल लॉ अर्थात चार लग्नांची प्रथा हे ते प्रमुख नियम म्हणता येतील. या धर्मातील पुरुषांना चार विवाह करता येतात. पत्नी नकोशी झाली की, तीनदा तलाक म्हणून काडीमोड होतो. अशा वेळी ही अज्ञानी महिला एकटी पडते. हे प्रमाण खूप आहे.

या पर्सनल लॉला संविधानाची मान्यता नाही. तीनदा तलाकलाही सर्वोच्च न्यायालयाची परवानगी नाही. केवळ शरियतचा आधार त्यासाठी घेतला जातो. शासनाचेही या बाबीकडे दुर्लक्ष आहे. त्यासाठीच आम्ही समुपदेशन केंद्र चालवतो. पण आम्ही केवळ महिलांच्याच बाजूने बोलतो, त्यांना भडकवतो, अशा खोट्या भ्रमाने लोकांचा आमच्यावर खूप रोष होता. पण आम्ही कुटुंब तोडण्याचे नाही, जोडण्याचेच काम करत असल्याचे कालांतराने कळल्यानंतर अनेक सुजाणांनी आमच्या कार्याची प्रशंसाही केली. मात्र आजही काही परंपरावादी लोकांच्या रोषास आम्हाला बळी पडावे लागते.

पवित्र कुराणमध्ये एक आयत आहे–

मर्दोसे कहो नजरे निची रखे,
औरतोंसे कहो चादरे खिचे!

'स्त्रियांचा सन्मान करा' असा अर्थ असलेल्या या आयतीतील 'तिने बुरखा घ्यावा' एवढाच अर्थ पुरुषप्रधान व्यवस्था लक्षात घेते. अशाच अनेक चांगल्या गोष्टींचा विपर्यास करून स्त्रीची गळचेपी करण्याचे प्रघात पाडून ठेवले आहेत. शहरी भागात तरी आता बरीच प्रगती झालेली आहे, पण ग्रामीण भागात मात्र अजूनही विदारक चित्र दिसत आहे. आज महाराष्ट्रात मुस्लिमांची लोकसंख्या सुमारे १ कोटी ५० लाखांच्या जवळपास आहे. त्यात शिक्षित पुरुषांची संख्या ५० लाखांच्या वर तर स्त्रियांची संख्या ३५ लाखांच्या वर आहे. याचाच अर्थ आणखी शिक्षणाची गरज आहे.

प्रश्न – तुमचे भविष्यातील संकल्प काय आहेत?

– बरंच काम अजून करायचं आहे. स्त्रियांसाठी मी काम करतेच आहे. दारात गरजू स्त्रिया रोज असतातच. लखनौची सायरा शेख हिला तिच्या नवऱ्याने चाकू मारून रेल्वेतून बाहेर फेकून दिले होते. तिची नागपूरला आम्ही देखभाल करून तिला तिच्या पायावर उभे केले आहे. अशा खूप सायरा शेख समाजात आहेत. त्यांच्यासाठी वसतिगृह काढायचे आहे. तलाकमुळे एकाही मुलीचे आयुष्य बर्बाद होऊ नये, असे मला वाटते.

आज मी वस्ती–वस्तीमध्ये जाऊन जे समुपदेशन करते, रुबी सोशल वेलफेअर, रुबी सोशल इन्स्टिट्यूटमधून मुलींना वेगवेगळं शिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित करण्याचा, त्यांच्या पायावर त्यांना उभं करण्याचा प्रयत्न करते; ते काम मला आणखी खूप वाढवायचं आहे. आपल्या देशातला प्रत्येक जातीचा माणूस जातीच्या जाणिवेनं झपाटलेला आहे. व्यक्ती माणूस म्हणून जन्माला येतो, जात किंवा धर्म म्हणून नाही. जात आणि धर्म माणसाला नंतर चिकटतो. ही जाती–धर्माची बेडी मला तोडून टाकायची आहे.

प्रश्न – रुबिना, तू संस्था स्थापन केली, मुलींच्या तलाकसाठी काम करते वगैरे आम्ही ऐकत असतो; पण तुझ्या कामाचं नेमकं स्वरूप काय आहे? आणि मागच्या वर्षी तू मुलींचा पतंगीचा खेळ किंवा सायकल रेस असे काही उपक्रम राबवलेस, त्यामागची तुझी नेमकी भूमिका काय होती?

– २००५ मध्ये मास्टर इन सोशल वर्क्सच्या शिक्षणादरम्यान, मी माझ्या सोसायटीतील गरीब व



गरजवंत महिलांचे काऊन्सिलिंग करायला सुरुवात केली आणि किरायाच्या खोलीत रुबी सोशल वेल्फेअर सोसायटीची स्थापना केली. या संस्थेअंतर्गत अनेक प्रोजेक्ट्सवर काम केले जाते. यामध्ये सर्व धर्म व समाजाच्या महिलांसाठी काऊन्सिलिंग सेंटर आणि ट्रेनिंग इन्स्टिट्यूट आहे. ग्राफिकींग, कॉम्प्युटर, फॅशन डिझायनिंग, इंग्लिश स्पिकींगचा कोर्स करविला जातो. आम्ही सोशल अवेअरनेस प्रोग्रामही घेतो. याच संस्थेअंतर्गत मुस्लिम महिला मंच असाही एक फोरम आहे, ज्याच्या अंतर्गत ट्रिपल तलाक, बहुविवाह, फतव्याचा विरोध आणि मेंटेनन्स, महिलांच्या संपत्तीच्या अधिकारासाठी लढले जाते. हा फोरम केवळ मुस्लिम महिलांसाठीच काम करतो.

मुलींना शिक्षणाबाबत जागरूक करण्याबरोबरच असहाय आणि ड्रॉप मुलींना शाळेत पाठविले जाते. रोजगारासाठी प्रोफेशनल ट्रेनिंग दिले जाते. बेघर झालेल्या स्त्रियांच्या राहण्याची, त्यांच्या रोजगाराची आणि त्यांना मानसिक आधार देण्याचे काम आमची संस्था करते. कुही, उमरेड, पवनी अशा ग्रामीण भागातही आमचे काम चालते. तलाकसंबंधित मुद्यांवर मुस्लिम महिलांना लीगल काऊन्सिलींग केले जाते. अनेक महिलांना मेंटेनन्स मिळवून देण्यात आला आहे.

पतंग किंवा सायकल रेसबद्दल तुम्ही बोललात. मॅडम, आमच्या मुस्लिम स्त्रिया किती दिवस 'गुंगी गुडिया की तरह' राहतील? माझ्या मैत्रिणींनीसुद्धा 'हम भी किसिसे कम नहीं' म्हणत पतंगासारखं उंचच उंच उडायला हवं, हा विचार माझ्या मनात आला. मुस्लिम मुली आणि टेरेसवर पतंग उडवत आहेत, हे फक्त दिवास्वप्नच असू शकतं; पण मी ते सत्यात आणायचं ठरविलं. मला माझ्या मुली टेरेसवर ओरडताना, गोंधळ घालताना, चित्कारताना बघायचं होतं. हमारी लड़किया ऐसा नही करती, वो सिर्फ बुरखेमेंही रहती, हे मला बंद करायचं होतं. ऐसा नही करती, म्हणजे कैसा नही करती? बुरख्यातच त्या सुखी आहेत? या पुरुषी विचारसरणीला, पितृसत्ताक धारणांना कुठेतरी शह द्यायलाच हवा होता.

आमच्या मुली स्वप्नही बघत नाहीत. कारण त्यांना ती ठाऊकच नाहीत. आम्ही त्यांना सक्षम करतो, स्वप्न दाखवतो. त्यांना स्वप्न दाखवणं हे आमचं कामच आहे असं आम्ही समजतो. ही स्वप्न त्यांच्या जाणिवा समृद्ध करायला मदत करतात. त्यांच्या भूतकाळातील जखमांवरील मलम ठरतात. जगण्याची नवी उमेद देतात. 'मै एक आझाद पतंग हूँ', असं म्हणत उडायला, बागडायला लावणं हीच त्या उपक्रमामागची माझी भूमिका. १५ जानेवारी २०१७ ला आमच्या टेरेस ५० च्या वर मुलींनी आणि लहान मुलांनी पतंगाचा खेळ बहरून आला. आमच्या टेरेसवर रंगीबेरंगी जिवंत मुली जणू पतंगच झाल्या होत्या. पतंग उडवले गेलेत, चक्री धरल्या गेली, आणि 'ओ काट'च्या गगनभेदी आवाजाने आमचा ताजबाग परिसर घुसळून निघाला. मुलींचं थुईथुई नाचणं, त्यांच्या डोळ्यांतला तो आनंद, त्यांचं मनमोकळं जोरात गडगडून हसणं बघून त्यांच्या आयांच्याही डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. मुली थकेपर्यंत पतंग उडवत राहिल्या. किती छोटी गोष्ट होती खरं तर ही. साधा पतंग उडवला त्यांनी; पण हा खेळ त्यांना एक नवा आत्मविश्वास देऊन गेला.


त्यानंतरच्या रविवारी म्हणजे २२ जानेवारीला आम्ही सायकल फेरी काढली. ताजबाग ते सक्करदरा. याही मागे माझा तोच उद्देश होता की आपण मुलांना सहज सायकल घेऊन देतो; पण मुलींना सायकल मिळतच नाही. तिची शाळा किंवा कॉलेज दूर असलं तरीही. याच्या उलट मुलं नापास झालेले असले, हुल्लडबाजी करत फिरत असले तरी त्यांच्या सेवेत मात्र सायकल असतेच. मला हा फरक मिटवायचा होता. सायकल आणि पतंग या दोन्हींशी आरोग्य आणि आत्मविश्वास जुळलेले आहेत. आमची सायकल फेरी खूप यशस्वी झाली. सायकली मुलींनीच गोळा करायच्या होत्या. त्यात त्या यशस्वी झाल्यात. भाऊ, वर्गमित्र, शेजारी कुणाकुणाकडून त्यांनी सायकली आणल्या आणि त्यांची रॅली निघाली. त्यांच्या जवळ फलक होते. त्यावर 'वुई वॉन्ट फिअरलेस लाइफ', 'लिंगभेदभाव नष्ट करा, हिंसा थांबवा', अशा घोषणाही त्या देत होत्या. त्या प्रत्येकीच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास झळकत होता.

मॅम, या दोन्ही उपक्रमातून मुलींना काय मिळालं? बेखौफ जगण्याची आस. आपण ठरवलं तर काहीही करू शकतो, हा स्वत:बद्दलचा विश्वास आणि स्वप्न पहायची असतात, ही समज. माझा प्रयोग यशस्वी झाला. हे मी नाही, माझ्या मुली म्हणतात.

संवादक : अरुणा सबाने
Mob. 9970095562



कार्यकर्ता : सामाजिक प्रश्नांच्या संघर्षासाठी



अरुण जाधव

आमचे कार्यकर्ते तुम्ही पाहिलेत तर त्यांचं शिक्षण कमी दिसेल, पण अनुभव आणि तडफ जोरदार असणार. खर्डा किंवा सोनईसारख्या घटना घडल्या तेव्हा आम्ही पोलीस, मीडिया, राजकीय दबावतंत्र यांचा जितका उपयोग करता येईल तितका केला. म्हणून ते प्रश्न जास्त चर्चेत आले. आता एवढं करूनही खर्ड्यातील हत्याकांडातले साक्षीदार फिरले... आम्ही पुन्हा ती केस रिव्हिजनसाठी दाखल करतोय... भाऊ... व्यवस्था आपला अपमान सारखा करणारच. कोल्हाटी समाजाच्या एका बाईनं आपले दागिने विकून आपल्या पोराला शिकवलं. डॉक्टर केलं. पण त्या पोराला बापाचं नाव नाही म्हणून मेडिकलचं शिक्षण घेणाऱ्यांनी इतकं डिवचलं की, ते पोरगं आत्महत्या करून मेलं.



अरुण जाधव,
जामखेड, अहमदनगर
Mob. 9422226066



प्रश्न नसलेला दिवसच आमच्या वाट्याला येत नाही ...

ॲड.अरुण जाधव हे शाहू-फुले-आंबेडकरी विचारांचे भटके-विमुक्त समाजाचे प्रतिनिधित्व करणारे कृतिशील व्यक्तिमत्त्व. टकूऱ्यावर बसला तर अचूक वेध घेणारा नि माया लागली तर पाघळणारा हा काळ्या मातीतल्या ढेकळासारखा रांगडा कार्यकर्ता. रेशनकार्ड नाही, मतदारयादीत नाव नाही, बँकेत खातं नाही, गावात घर नाही नि शहरवस्तीतल्या झोपडपट्टीतही सन्मान नाही- अशा माणसांना आधार देत अरुणभाऊ आपली एक पायवाट चालताहेत. आपल्या ओबड-धोबड जगण्याचा विस्तार करत अरुणभाऊंनी गेल्या दहा वर्षांत अहमदनगरमध्ये एका व्हायब्रंट संघटनेचं बीज रोवलंय. 'लोक अधिकार आंदोलन' या संघटनेमार्फत त्यांचे कार्यकर्ते कुठेही जातीय अन्याय-अत्याचार झाला की, धावून जातात. जातीय अत्याचार प्रतिबंधक कायद्याआधारे ग्रासरूटवर सामाजिक अभिसरणाचं कर्मकठीण काम ही मंडळी करत आहेत.

कोल्हाटी समाजात जन्मलेल्या हिराबाईनं चार अपत्यांना जन्म दिला. दोन मुली व दोन मुलगे. या पोरांना आपल्या वडिलांचं नेमकं नाव-गाव ठाऊक नाही. भटक्या जमातींना ब्रिटिशांनी १८७१ मध्ये कायदा करून जन्मजात गुन्हेगार ठरवलं. स्वातंत्र्यानंतर १९५२ मध्ये त्या कायद्यातून भारत सरकारने या जमातींना 'विमुक्त' केलं. अरुणभाऊ मात्र या चोरपणातून मुक्त झाले नव्हते. या मुलाला शाळकरी वयात कुणीही केली नसेल अशी चोरी करावी लागली. नावाची चोरी! त्यांनी आपल्या एका बहिणीच्या 'मालकाचं' नाव चोरलं. गॅझेटियर प्रसिद्ध करून त्यांनी वडिलांच्या नावाठिकाणी एक नाव मिळवलं. पण चळवळीत स्वत्वाचं भान येत गेलं तसतसा हा माणूस जागा झाला. आता ते 'अरुण हिराबाई जाधव' हेच आपलं नाव समाजाच्या नाकावर टिच्चून मिरवताहेत. लोक अधिकार आंदोलन, समता आंदोलन, भारिप बहुजन महासंघ इत्यादी व्यासपीठांवरून ते अत्याचारग्रस्तांची लढाई लढताहेत. पारधी विकास आराखडा मोहीम, कौटुंबिक हिंसाविरोधी अभियान यामार्फत ते वंचितांच्या न्याय्य हक्कांसाठी झटताहेत. त्याप्रमाणेच कला केंद्रांमध्ये नाचणाऱ्या नायकिणींच्या अनाथ बालकांसाठीही निवारा प्रकल्पाचं काम त्यांनी हाती घेतलंय. त्यांच्या या धडपडीची दखल घेऊन महाराष्ट्र फाउंडेशनने वंचिताहून वंचित घटकांच्या प्रश्नांना नव्याने उजाळा दिला आहे....

प्रश्न – अरुणभाऊ, पुरस्कारप्राप्त व्यक्तींची मुलाखत म्हटली की, एक टिपिकल प्रश्न मनात येतो... 'हा सन्मान मिळाल्यानंतर तुमच्या मनात कोणत्या भावना आहेत?'

– खरं सांगू का भाऊ...? खरं सांगायची लाज कशाला... बरं वाटतंय!

आजवर आम्हाला धड कुणी शेजारी बससुद्धा म्हटलेलं नाही. चारचौघांत मिरवायची हौस कुणाला नसतीय? सगळ्याला ते आवडतं. पण आम्हाला जी हाडतूड सहन करावी लागतीय, ती कशी सांगू? मी खूप लहान होतो... तेव्हा एका पिराचा दर्गा असलेल्या गावात शाळा शिकायला मला ठेवलेलं. त्या शाळेतली सगळी पोरं माझ्यावर हसायची. मला बापाचं नाव नव्हतं म्हणून... माझी आई एका लग्नाच्या वरातीत नाचत होती. ते कामच ना आमच्या समाजाचं... तर, त्या वरातीत आमच्या गुरुजीलाच मी माझ्या आईला पैसे सोडताना बघितलं... डोळ्यांत पाणी आलं... पण सांगणार कुणाला? ज्या गुरुजींकडून सन्मान शिकायचा, तोच माझ्या माऊलीला हीन बघत होता. आईला व माझ्या मावश्यांना लग्नाच्या वरातीत नाचायची सुपारी मिळायची. मी आईच्या मागं-मागं तिचा पदर धरून जायचो. तिची पिशवी सांभाळायचो. त्या पिशवीत घुंगरं, साडी, मेकपचं सामान



वगैरे असायचं. जिथं सुपारी असायची तिथले लोक आईशी जे बोलायचे ते ऐकून कान बधिर व्हायचे. लय दिसात भेट न्हाई... आमची आठवण येती का न्हाई... आता कधी भेट व्हनार? ही नेहमीची वाक्यं. पण ती कोड्यातली आहेत, हे माझ्या बालमनाला तेव्हाही जाणवायचं. नजरांचे, स्पर्शांचे अर्थ कळायचं वय नव्हतं, पण ते सर्व अपमानजनक आहे, हे मात्र नक्की कळत होतं...

शाळेतले दोस्तही तसंच वागायचे. कारण त्यांना शिकवलेलं- डुकराचं मटण खाणं घाण असतंय...! आता आम्हाला कुठं कळत होतं काय घाण न् काय चांगलं... मुसलमानाची पोरं मोठ्याचं मटण खात्यात. तेबी वाईटच मानायचे की सगळे... पण ती पोरं सगळ्याला चालायची. आम्ही मात्र अस्पृश्य! आम्ही दोस्तांच्या घरी गेलो तर प्यायला पाणी मागायची चोरी! आमच्या एका मामाचं लग्न मला आठवतंय... त्या लग्नातल्या जेवणासाठी सगळा शिधा आम्ही घेऊन दिलेला. अन्न शिजवलं गावकऱ्यांनी. आधी ते जेवले, मंग आमच्या पंगती बसवल्या. म्हंजी, सुखाचा प्रसंग आमचा; तो साजरा करायला आमच्या कष्टाचं गोडधोड अन्न. आमचा बाट होईल म्हणून शिजवणार ते न् तेबी आम्हाला पुन्हा वरून वाढणार! ह्याला काय सन्मानाचं जगणं म्हणायचं? देवळातसुद्धा हे आम्हाला जाऊ देत नसत. आम्हाला प्रश्न पडायचा... आम्हीच काय गुन्हा केलाय?

लांब कशाला, कोपरगाव तालुक्यातल्या पुणतांब्याचा गोळीबार तुम्हाला आठवत असेल. त्या गोळीबारात तीन लोकांना पोलिसांनी गोळी घालून मारलं. प्रदीप दुसिंग हा ख्रिस्ती समाजातला तरुण, इंदुताई मांजरे ही वडार समाजातली महिला आणि जॉन हा कार्यकर्ता. हे मोर्चाने हक्काची जमीन मागायला गेलेले. त्यांना पोलिसांनी सर्वदेखत कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून गोळ्या घालून ठार केलं. आम्ही दहा-पंधरा कार्यकर्ते त्या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी व्हावी या मागणीसाठी एस.पी. ऑफिसमध्ये गेलेलो. त्याच वेळी फटाक्यांच्या व्यापाऱ्यांचं एक शिष्टमंडळही आलेलं. त्यांना दुकानं मांडायला परवानगी पाहिजे होती. एसपींनी त्यांना वेळ दिला; आम्हाला नाही. का? तर आम्ही म्हणे नेहमीच त्यांना भेटायचो. आमच्या प्रश्नांपेक्षा त्यांना फटाकड्याच्या दुकानांचा प्रश्न महत्त्वाचा वाटत होता. आणि हे काही अपवादाने घडत नाही. त्यामुळे सन्मानाच्या वागणुकीची आम्हाला समाजाकडून फारशी आशाच राहिलेली नाही... कधी कधी वाटतं, आमच्यासारख्याला सन्मान द्यावा अशी या समाजाची औकात तरी आहे का? पण आपल्या लोकांत आलं की बरं वाटतं. हा पुरस्कार आपल्या लोकांत बसाय-उठायची संधी म्हणूनच मी बघतो. म्हणूनच मला खूप बरं वाटतंय...

प्रश्न – यानिमित्ताने तुमच्या चळवळ्या स्वभावाचा सन्मान होत आहे... तुमच्यातला हा चळवळ्या कधी व कसा जागा झाला?

– मी खूपच कमी वयात चळवळीकडे आकर्षित झालो. मी दहावीला शिकत होतो, तेव्हा माझ्या आयुष्याला वळण देणारी एक घटना घडली. तेव्हा मी नुकताच मोटरसायकल चालवायला शिकलो होतो. कुणाची गाडी फिरवायला भेटली की, मला मजा यायची. तर, त्या दिवशी असाच मी मोटरसायकलची फेरी मारायला गेलो. गोरोबा टॉकिजजवळ माझ्याकडून एक अपघात घडला. एका बाईला माझ्या गाडीची ठोकर बसली. त्या बाईच्या कडेवर लेकरू होतं. ते लेकरूही खाली पडून रडायला लागलं. मी घाबरलो. तिथून मी पळून आलो. माझ्याकडून अपघात झाल्याचं कळल्यावर माझी आई व मामाचीही पाचावर धारण बसली. त्यांना वाटलं, 'आता पोरावर पोलीस केस होणार. चांगली शाळा शिकणाऱ्या पोराची जिंदगी बरबाद होणार.' ते घाबरले होते. अशात दारावर पोलीस आला. 'धडक देणारं पोरगं कोल्हाट्याचं होतं' हे कळल्यावर त्या पोलिसालाही चेव आला होता. तो दमदाटी करू लागला. माझी आई गयावया करायला लागली. पदर पसरू लागली. तिच्या विनवण्या बघून पोलिसाचं काळीज विरघळलं नाही. पण त्याची नजर माझ्या बहिणीकडं पाहून पाघळली. त्या हरामखोरानं 'केस काढतो- ह्या पोरीला माझ्याकडे पाठवा' असली नीच मागणी केली. या घटनेमुळं मला आमच्या लाजिरवाण्या जगण्याची तीव्रतेने जाणीव झाली. तोपर्यंत मला मोठं होऊन पोलीस व्हावं असं वाटायचं. पण त्या पोलिसामुळं माझ्या मनात जी चीड बसली, ती अजून गेलेली नाही... पोलिसाने पैसे घेऊन मामला रफादफा केला. पण मी एकदम अस्वस्थ-निराश झालो होतो.

त्या काळात भूतवाडा गावात बंटी सदाफुले या बौद्ध तरुणाने मंदिरप्रवेश केला म्हणून वातावरण तापलं होतं. मानवी हक्क अभियानचे वाल्मिक निकाळजे त्या संघर्षाचं नेतृत्व करत होते. गुलामाला गुलामीची जाणीव झाली की, तो पेटून उठतो म्हणतात. त्याप्रमाणे मलाही जाणीव झाली



होती. मी भूतवाडाच्या संघर्षाकडे आकर्षित झालो. त्या संघर्षात सहभागी असतानाच मी माझ्या मनाच्या निराश अवस्थेची कहाणी वाल्मिकभाऊंना सांगितली. त्यांनी 'त्या फौजदाराविरोधात मोर्चा काढायचा का?' असं सुचवलं. मलाही जोश आला. केवळ पाच कार्यकर्त्यांनी मिळून तो मोर्चा काढला होता. संबंधित फौजदाराला त्या मोर्चाने अद्दल घडली नि माझ्यात चळवळीचं वारं भरलं... हा १९९०-९१ चा काळ.

याचदरम्यानच्या काळात लक्ष्मण गायकवाड यांच्या संपर्कात आल्याने आमच्या जामखेडच्या कोल्हाटी वस्तीत मंदा चंदन यांचं नेतृत्व पुढं आलं होतं. मंदाताईंचं सप्तसूर नावाचं कलाकेंद्र होतं. पण त्या चळवळीतही आघाडी घेऊ लागल्या होत्या. तोपर्यंत मला आमच्या समाजातल्या स्त्रिया केवळ बारीवर नाचतानाच दिसत होत्या. मंदा चंदन यांना मी समाजाच्या विरोधात दंड थोपटताना पाहिलं. एका पारधी पुरुषानं दलित महिलेशी लग्न केलेलं. तो पुरुष वारला. त्यानं जातीबाहेर लग्न केलं म्हणून त्याच्या प्रेताला कुणी हात लावायला तयार नव्हतं. मंदाताईंनी त्या प्रेताचे संस्कार करायचा निर्णय घेतला. आम्ही चार-दोन पोरं त्या अंतिम संस्कारात सामील झालो नि त्याच वेळी मी माझ्या समाजातील अनिष्ट चालीरीतीला मनातल्या मनात अग्नी दिला...

कोल्हाटी बाईच्या मृत्यूनंतर जातपंचायत तिच्या कुटुंबाकडून दंड वसूल करते. तिने नाच केला, हा तिचा अपराध-पाप. म्हणून तिचा अंतिमसंस्कार करण्याआधी तिच्या पापाची भरपाई म्हणून हा दंड वसूल केला जायचा. त्याला तीन देणे असं म्हणतात. तीन रुपयांचा दंड. या अन्यायाविरोधात आम्ही आवाज उठवायचं ठरवलं. मढी, जेजुरी, सोनाळी व माळेगाव इथं जातपंचायती भरतात. आम्ही या जातपंचायतीतल्या कोल्हाटी समाजाच्या प्रमुखांविरोधात पोलिसांत तक्रारी दाखल केल्या. पोलिसांनी त्या पंचांना बोलवलं. त्यांची चौकशी केली. यामुळं जातवाले आमच्यावर खवळले. माझ्यावर, माझ्या कुटुंबावर बहिष्कार टाकला गेला. माझं वय तेव्हा १७-१८ वर्षांचं होतं. घरातून 'जाचपंचायतीची माफी माग' असा खूप दबाव होता. पण चळवळीतले मित्र सुनील जावळे, बापू ओहोळ, अनिल समुद्रे यांनी मला खूप सांभाळलं. ताटातली अर्धी भाकर खाऊ घातली. राहायला आसरा दिला. म्हणून मी चळवळीतच सामील झालो...

प्रश्न – म्हणजे सुरुवातीपासूनच तुम्ही जातीय अन्याय-अत्याचारांच्या प्रश्नांकडे वळलात...

– हो... आमचा महत्त्वाचा प्रश्न जातिव्यवस्थेचे चटके हाच होता... त्यामुळं आम्ही आपोआपच त्या प्रश्नांचा सामना करायला लागलो. मानवी हक्क अभियानातून ॲड.एकनाथ आवाड म्हणजे जिजा तेव्हा जोशात होते. आम्ही त्यांच्याकडे पाहूनच संघर्षात उतरलो. जमीन अधिकार आंदोलनाच्या माध्यमातून पारधी समाजाला गायरानांवर अतिक्रमणासाठी संघटित केलं. हा संघर्ष तर संविधानाच्या चौकटीत जातिव्यवस्थेवर सरळ-सरळ केलेला प्रहार आहे. त्या पाठशाळेतच मी कार्यकर्ता झालो.

पण केवळ कार्यकर्त्याला लोक फारसं महत्त्व देत नाहीत. लोकांवर प्रभाव पडावा असंही काय तरी लागतं... म्हणून त्या गरजेतून मी व्हेटर्नरी डॉक्टरची पदवी मिळवली. नावापुढं डॉक्टर हा शब्द लिहू लागलो. पण हेही लक्षात आलं, नुसता प्रभाव पाडून प्रश्न सुटत नाहीत. म्हणून मग कायद्याचंही शिक्षण घेतलं. चळवळीने अन्याय, अत्याचारांशी दोन हात करायला शिकवलं होतं. आयपीसी, सीआरपीसी, रोजगार हमी इत्यादी कायद्यांची माहिती चळवळीतच झाली होती. पण प्रस्थापित समाज कायद्यांना फाटे देऊन अन्यायकारक व्यवस्था कशी चालू ठेवतो, ते कायद्याच्या शिक्षणामुळं समजलं. त्यामुळं आम्ही आता न्याय मिळवताना कायद्यातल्या फटींवरही लक्ष ठेवून असतो...

प्रश्न – अहमदनगर जिल्ह्यातील खर्डा, सोनई इत्यादी जातीय हत्याकांडांना पटलावर आणण्यात तुमच्या संघटनेने महत्त्वाची भूमिका निभावली आहे, त्याबद्दल सांगा...

– आमच्या संघटनेतले कार्यकर्ते संघर्षातून निर्माण झालेत. ज्यांच्यावर अन्याय झाला, त्यांचे प्रश्न घेऊन संघटना त्यांच्यासोबत उभी राहिली. या लढाईतच कार्यकर्ते घडतात. म्हणून आमचे कार्यकर्ते तुम्ही पाहिलेत तर त्यांचं शिक्षण कमी दिसेल, पण अनुभव आणि तडफ जोरदार असणार. खर्डा किंवा सोनईसारख्या घटना घडल्या तेव्हा आम्ही पोलीस, मीडिया, राजकीय दबावतंत्र यांचा जितका उपयोग करता येईल तितका केला. म्हणून ते प्रश्न जास्त चर्चेत आले. आता एवढं करूनही खर्ड्यातील हत्याकांडातले साक्षीदार फिरले... आम्ही पुन्हा ती केस रिव्हिजनसाठी दाखल करतोय... भाऊ... व्यवस्था आपला अपमान सारखा करणारच. कोल्हाटी समाजाच्या



एका बाईनं आपले दागिने विकून आपल्या पोराला शिकवलं. डॉक्टर केलं. पण त्या पोराला बापाचं नाव नाही म्हणून मेडिकलचं शिक्षण घेणाऱ्यांनी इतकं डिवचलं की, ते पोरगं आत्महत्या करून मेलं. आम्ही ती केस लढलो... ती केस काही मीडियात गाजली नाही... अशा अनेक केसेस आहेत. मीडियात आल्या नाही, म्हणून त्या समाजाला माहीत नसतीलही... पण मला वाटतं, या केसेसच अन्यायाला वाचा फोडणाऱ्या तोफा आहेत... ज्याचं जळतं त्याला बरोबर कळतं... तुम्ही कितीबी दाबून ठेवा... भडका उडणारच...! आज ना उद्या माझ्यासारखे अनेक जण पुढं येणारच आहेत...

प्रश्न – भटके-विमुक्त समाजाच्या कळीच्या प्रश्नांबद्दल काही....

– भाऊ... प्रश्न नाहीत असा दिवसच आमच्या वाट्याला येत नाही. पण या समाजाला मुख्य धारेत आणायचं तर शासनाकडं ठोस कार्यक्रम पाहिजे. पारधी विकास आराखडा मोहिमेतून आम्ही हाच प्रयत्न करतोय. पारधी समाजाला संघटित करून त्यांचे प्रश्न त्यांनाच मांडायला सांगतोय. रेशनकार्ड वगैरेंसारखे नेहमीचे प्रश्न येतातच. ते सोडवण्यासाठी खास सल्ला-मार्गदर्शन केंद्र चालवतोय. पण हे प्रश्न मुळापासून सोडवण्यासाठी ठोस धोरण ठरवलं गेलं पाहिजे. त्यासाठी भटके-विमुक्त समाजाची नीट जनगणना झाली पाहिजे. आणि त्यांच्यासाठी स्वतंत्र बजेट मांडले पाहिजे. शेतीसाठी, आरोग्यासाठी स्वतंत्र बजेट पाहिजे अशा मागण्या होत असतात. काही प्रदेश किंवा समाजघटकही स्वतंत्र बजेटची मागणी करतात. त्यामुळे कोणाकोणासाठी स्वतंत्र बजेट मांडायचे असे काही लोक म्हणतील. मग तरीही आमची मागणी कशासाठी? तर बजेटमधील तरतूद अन्यत्र वळवली जाऊ नये, भटक्या-विमुक्तांसाठीच खर्च व्हावी यासाठी. यातला अडसर महाराष्ट्रातल्या मातब्बर जातींचाच आहे. भटके-विमुक्तांची जनगणना झाली तर विधीमंडळात, नोकऱ्यांमध्ये या समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान द्यावं लागेल. सध्या ज्या जातीचं वर्चस्व आहे, त्यांना हा धोका पत्करायचा नाही. हीच आमची कळीची समस्या आहे...

प्रश्न – तुम्ही सुरू केलेल्या निवारा प्रकल्पाबद्दल...

– भाऊ, जामखेड हे गाव कलाकेंद्रांसाठी प्रसिद्ध आहे. पूर्वी कोल्हाटी समाजातल्या महिलाच या कलाकेंद्रांमधून उपजीविका चालवायच्या. आता मुस्लिम, बौद्ध, मातंग व भटके-विमुक्त समाजात न मोडणाऱ्या महिलाही या व्यवसायात येऊ लागल्यात. का? कारण की, समाजात वाढायला लागलेले अन्याय-अत्याचार! अत्याचारपीडित महिला आसरा शोधत कलाकेंद्रात येते. शौकिन लोक त्यांची कला बघतात. पण त्या महिलांच्या पोरांच्या भविष्याची पर्वा कोण करणार? मी अशी मुलं नेहमी पाहत होतो. आई नाचत असताना ही पोरं तिथंच घुटमळायची. गिऱ्हाइकांना सिगारेट-गुटखा आणून द्यायची. अशा चार-पाच पोरांसाठी मी सुरुवातीला वसतिगृहाची सुरुवात केली. मग लक्षात आलं- खेड्यात अनेक अनाथ मुलं शिक्षणावाचून अशीच बेसहारा जिंदगी काढायला लागलेत. पाहता-पाहता आमच्याकडं पंधरा गावांतली अशी वीस मुलं आली. त्यांच्यासाठी निवासी वस्तीशाळा म्हणजे आमचा निवारा प्रकल्प. त्यासाठी आम्ही धडपडत आहोत. विशेष म्हणजे या पोरांच्या शिक्षणासाठी बहुरूपी समाजातली पोरं महाराष्ट्रभरातून मदतनिधी जमवत आहेत. हे बहुरूपी पोलिसाचा वेश करून भीक मागायचे. पण लोक आता या कलेला भाव देत नाहीत. बहुरूप्याला रुपया द्यायचीही लोकांची दानत नाही. पण या कलाकार मुलांनीच आता निवारा प्रकल्पासाठी मदतनिधी जमवण्याची जबाबदारी घेतली आहे. ते सरकारी कचेरीत, दुकानदारांकडे जिथं कुठं उदार मनाचा माणूस भेटेल त्याला आपल्या उपजत कलेच्या माध्यमातून आपल्या बांधवांच्या शिक्षणाची गरज सांगतात. रीतसर पावती देऊन मदत घेतात. या मदतनिधीतली काही रक्कम त्यांच्या उदरनिर्वाहाला मदत करतेच; पण महत्त्वाचं हे आहे की, काही अनाथ मुलांच्या भवितव्याची घडणही त्यामुळे होत आहे. असा एक ताळमेळ घालून आम्ही आमचं काम करतोय...

प्रश्न – अरुणभाऊ, तुम्ही व तुमच्या संघटनेतील कार्यकर्त्यांनी केलेले संघर्ष, लढवलेल्या केसेस यांचं चांगलं डॉक्युमेंटेशन तुम्ही केलंय... खरंच याचं पुस्तक केलंत तर चळवळीसाठी तो महत्त्वाचा दस्तावेज ठरेल, असं वाटत नाही का?

– कार्यकर्त्यांची हीच तर अडचण आहे ना भाऊ... लढायचं का फायली ठेवायच्या...? पण कुणी तरी हे डॉक्युमेंटेशन करायला पाहिजे... आज खर्डा केसमध्ये काय घडलं... सोनई हत्याकांडाचा निकाल काय लागणार? याचा नीट पाठपुरावा करून ही व्यवस्था आमच्याशी कशी वागते याच्या नोंदी ठेवल्या गेल्या, तर



पुढं कधी तरी त्या नक्की उपयोगात येणार...

प्रश्न – अखेर तुमच्या सध्याच्या सुरू असलेल्या काही उपक्रमांबद्दल सांगा...

– भाऊ खूप वेगवेगळ्या पातळ्यांवर आम्ही काम करतोय. एकीकडं रोज अन्याय अत्याचाराच्या घटना घडतात. रोज त्यामागं धावपळ करावीच लागती. आता बघा भीमा कोरेगावची घटना ताजी आहे. ही दंगल मुख्य कार्यक्रमाच्या ठिकाणापर्यंत पोचली असती तर काय घडलं असतं त्याची कल्पनाही करवत नाही. आता या घटनेच्या फॅक्ट फायंडिंग कमिटीत आम्ही लक्ष घालतोय, तर हे सगळं सुरूच राहणार... पण तेवढ्यावर थांबून चालत नसतं ना भाऊ... आपल्याला, समाजाला घडवायचंय... प्रस्थापित समाज अन्याय-अत्याचार करतो तसं आपल्या समाजातही अन्यायाचा कळस गाठला जातोच ना... आता बघा आम्ही श्रीगोंदा तालुक्यात कौटुंबिक हिंसा मुक्ती अभियान दहा गावांमध्ये राबवतोय. या अभियानातून आम्ही १००० कुटुंबांना जोडलंय.

भाऊ, कौटुंबिक हिंसा म्हटलं की, आपल्या डोळ्यांपुढं नवरा-बायकोची घरगुती भांडणं असं काहीतरी येतं... पण आम्ही ज्या भटके-विमुक्त महिलांच्या प्रश्नांवर काम करतोय तिथली तऱ्हाच निराळी. शेजारच्या बाईच्या अंगात देव येतो, माझ्याच बायकोच्या अंगात देव का येईना... हिला पाळीच का येईना... ही भानामतीच करती... आता बघा हा समाजभटकंती करतो... तर एखाद्या मुलीला नाही आवडत असं वणवण करायला तर तर हिचं गावात कुणासंगट लफडं असंल म्हणूनच ही आमच्यासोबत भटकायलं नगं म्हणतीय... असल्या कारणांनी बायकांना टाकलं जातं. बरं एकदा का बाईला सोडलं की तिनं पुन्हा म्हणून लग्न करायचा नाही असला जुलमी न्याय... बाईला जातपंचायतीसमोर आणून जिभेनं विष्ठा उचलायला लावायची, दातात चप्पल धरायला लावायची, तापत्या तेलातून पैसा काढायला लावायचा, असल्या शिक्षा पत्कराय लावल्या जातात. तर आम्ही बाईवर होणाऱ्या या हिंसेविरूद्ध जनमानस घडवायचं काम करतोय. या कामातून आम्ही आजवर साधारणत: ६० तरी जोडप्यांना पुन्हा सलोख्यानं नांदायला राजी केलंय. जातपंचायतींच्या ढवळाढवळीशिवाय. या प्रोसेसमध्ये तयार झालेल्या मुली डोळे दिपतील अशी कामं आज करू लागल्यात. पारधी समाजाच्या काजल पवार, दुर्गा पवार, श्रुती भोसले या मुली अशाच प्रोसेसमधून पुढं आल्या. या मुली अशा तयार झाल्या की श्रीगोंदा तालुक्यात एका बौद्ध समाजाच्या मुलीवर अत्याचार झाला होता. तेव्हा या पारधी समाजातल्या मुलींनी आवाज उठवला. ही काय साधी गोष्ट आहे का?

दुसरा आमच्या कामाचा पैलू आहे पुनर्वसनाचा. श्रीगोंदा तालुक्यात बिरमाली नंदीवाले समाजाची शंभर-दीडशे लोकांची वस्ती. या वस्तीला त्यांच्या जातीनं बहिष्कृत केलं होतं. का? तर ५० वर्षांपूर्वी या वस्तीतल्या कुणीतरी आंतरजातीय विवाह केलेला. आम्ही या वस्तीवरचा बहिष्कार काढण्यासाठी झटतोय. हे झालं समाजांतर्गत बहिष्कार काढण्याचं काम. पण बाहेरच्या समाजानं जे आम्हाला अघोषितपणे बहिष्कृत केलंय त्याचं काय? तर तो बहिष्कार निर्मूलन करण्यासाठीही आम्ही काही कामं करतोय. त्याचं उदाहरण द्यायचं झालं तर पारधी समाजातल्या पोरांच्या पोलिस भरतीच्या एका उपक्रमाबद्दल सांगता येईल. पोलिस नि पारधी हे साप-मुंगसाचं नातं आहे. पोलिस अजूनही चोरी झाली की पारधी पोरांना उचलतात. ही मानसिकता बदलण्यासाठी आम्ही पोलिस, आदिवासी विकास विभाग व वनविभाग मिळून एक उपक्रम चालवतोय. या उपक्रमातून नुकतीच १५० पारधी समाजातल्या तरुणांची निवड केली. या पोरांना पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण आम्ही दिलं. यातल्या काही पोरांवर गैरसमजातून गुन्हे दाखल झाले होते. त्या गुन्ह्यांच्या कलंकातून त्यांची मुक्तता व्हावी म्हणून आम्ही पोलीस-न्याययंत्रणेला सोबत आणलं. पोरांवरचे गुन्हे काढले नि त्यांनाच आता पोलिस भरतीचं प्रशिक्षण देतोय. विशेष म्हणजे या उपक्रमात ३५ पारधी समाजातल्या मुलीही आहेत. ही पोरं-पोरी उद्या पोलिस होतील तेव्हा पारंपारिक गुन्हेगारीचा कलंक पुसून टाकायला तेच पुढाकार घेतील. पण तो दिवस अजून खूप दूर आहे... तोवर आम्ही आपलं रोज नवनव्या लढाया लढत राहणार...दुसरं काय करणार?

संवादक : प्रशांत खुंटे
Mob. 9764432328





महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) मराठी साहित्य पुरस्कारांचे मानकरी

जीवनगौरव पुरस्कार

नारायण सुर्वे १९९४
मेघ:शाम पुंडलिक रेगे १९९४
मालतीताई बेडेकर १९९५
य. दि. फडके १९९५
श्रीपाद नारायण पेंडसे १९९६
विष्णू भिकाजी कोलते १९९६
गो. वि. तथा विंदा करंदीकर १९९७
वसंत पळशीकर १९९७
विजय तेंडुलकर १९९८
रा. भा. पाटणकर १९९८
पु. ल. देशपांडे १९९९
रा. चिं. ढेरे २०००
भालचंद्र नेमाडे २००१
ग. प्र. प्रधान २००२
मारुती चितमपल्ली २००३
दिलीप पुरुषोत्तम चित्रे २००४
बाबूराव बागूल २००५
रा. ग. जाधव २००६
भा. ल. भोळे २००७
रावसाहेब कसबे २००८
गो. पु. देशपांडे २००९
अरुण टिकेकर २०१०
मंगेश पाडगांवकर २०११
जयंत नारळीकर २०१२
कुमार केतकर २०१३
श्याम मनोहर २०१४
सुरेश द्वादशीवार २०१५
अरुण साधू २०१६
अनिल अवचट २०१७

विशेष पुरस्कार

भा. रा. भागवत : बालसाहित्य १९९६
उमा कुलकर्णी : भाषांतर १९९७
बाबूराव बागूल : दलित साहित्य १९९८
वसंत दावतर : मराठी भाषा, संशोधन व समीक्षा १९९९
रा. वि. सोवनी : मराठीतून विज्ञानप्रसार २०००
गंगाधर मोरजे : लोकसाहित्य २००१
दत्ता भगत : दलित साहित्य २००२
केशव मेश्राम : दलित साहित्य २००२
रा. रं. बोराडे : ग्रामीण साहित्य २००३
भास्कर चंदनशिव : ग्रामीण साहित्य २००३
मनोहर शहाणे २००५
रत्नाकर मतकरी २००६
महादेव मोरे २००७

प्रकाशन संस्था

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९९४
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९९५
देशमुख आणि कंपनी, पुणे १९९६
मौज प्रकाशन गृह, मुंबई १९९७
साधना प्रकाशन, पुणे १९९८

नियतकालिके / अनियतकालिके

नवभारत, वाई १९९४
आजचा सुधारक, नागपूर १९९४
मराठी संशोधन पत्रिका, मुंबई १९९४
समाज प्रबोधन पत्रिका, पुणे १९९५
भाषा आणि जीवन, पुणे १९९५
विचारशलाका, लातूर १९९५
अर्थसंवाद, कोल्हापूर १९९६
संशोधक, धुळे १९९६
पंचधारा, हैदराबाद १९९७
परिसर-वार्ता, पुणे १९९७
मराठी विज्ञान परिषद पत्रिका, मुंबई १९९८
पुरोगामी सत्यशोधक, पुणे १९९८
ताज (Thinkers' Academy Journal), मुंबई १९९९
सृष्टिज्ञान, पुणे २०००
बायजा, पुणे २००१
शब्दवेध, बुलडाणा २००४
अभिधानंतर, मुंबई २००५



Date of Publication - 13-01-2018

परिवर्तनाचा वाटसरू २००६
पालकनीती, पुणे २००७

ग्रंथ पुरस्कार : ललित
ताम्रपट : रंगनाथ पठारे १९९४
दिवसेंदिवस : अनुराधा पाटील१९९४
भाऊ पाध्ये यांच्या श्रेष्ठ कथा : भाऊ पाध्ये १९९५
उदकाचिया आर्ती : मिलिंद बोकील १९९५
वनवास : प्रकाश नारायण संत १९९६
एकूण कविता : दोन : दिलीप पुरुषोत्तम चित्रे १९९६
युगान्त : महेश एलकुंचवार १९९७
कार्यरत : अनिल अवचट १९९८
शुभ्र काही जीवघेणे : अंबरीश मिश्र १९९८
अधांतर : जयंत पवार १९९९
कबीर : अनुवाद : मंगेश पाडगावकर १९९९
तणकट : राजन गवस २०००
आतंक : विलास सारंग २०००
कोरडी भिक्षा : श्रीनिवास कुलकर्णी २००१
तिची कहाणी : ना. धों. महानोर २००१
गल्ली बदललेला मोर्चा : राम दातोंडे २००१
मन्वंतर : दीनानाथ मनोहर २००१
तिरिछ आणि इतर कथा :
अनु. जयप्रकाश सावंत २००१
उत्तरायण : रवींद्र शोभणे २००२
हिरोशिमाच्या कविता :
अनुवाद : निरंजन उजगरे २००२
राहिले दूर घर माझे : शफाअत खान २००२
वकिल्या पारधी : लक्ष्मण गायकवाड २००३
जीवनायन : यशवंत मनोहर २००३
येरवडा विद्यापीठातील दिवस : कुमार सप्तर्षी २००३
राहीच्या स्वप्नांचा उलगडा : भारत सासणे २००३
आषाढमाती : श्रीकांत देशमुख २००४
खूप लोक आहेत : श्याम मनोहर २००४
पिढीजात : सतीश आळेकर २००४
भूमी : आशा बगे २००५
व्यवहाराचा काळा घोडा : अजीम नवाज राही
२००५
निशाणी डावा अंगठा : रमेश इंगळे-उत्रादकर २००६
हॉटेल माझा देश : धम्मपाल रत्नाकर २००६
नंतर आलेले लोक : अरुण काळे २००७
आवानओल : अजय कांडर २००७
दर साल दर शेकडा : वीरधवल परब २००७
कुठल्याही विरामचिन्हाशिवाय :
अविनाश साळापुरीकर २००७
इडा-पिडा टळो : आसाराम लोमटे २००८
मी भिडवू पाहतेय समग्राशी डोळा :
प्रज्ञा दया पवार २००८
कवितान्तरण : चंद्रकान्त पाटील २००९
रिबोट : जी. के. ऐनापुरे २०१०
तृतीय पुरुषाचे आगमन :
मंगेश नारायणराव काळे २०११
अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट :
आनंद विंगकर २०१२
पडझड : अशोक पवार २०१३
राखीव सावल्यांचा खेळ : किरण गुरव २०१४
तांडव : महाबळेश्वर सैल २०१४
खेळघर : रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ २०१५
विरंगी मी, विमुक्त मी : अंजली जोशी २०१६
धग असतेच आसपास : कल्पना दुधाळ २०१७

ग्रंथ : वैचारिक
आस्तिक शिरोमणी चार्वाक : आ. ह. साळुंखे
१९९४
आधुनिक मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी :
गो. म. कुलकर्णी १९९५
हिंदू-मुस्लिम प्रश्न आणि सावरकरांचा हिंदू राष्ट्रवाद :
रावसाहेब कसबे १९९५
समाजपरिवर्तनाच्या दिशा : जनार्दन वाघमारे १९९६
जाळ्यातील चंद्र : म. वा. धोंड १९९६
नव वसाहतवाद आणि आधुनिक भारत :
गोपाळ राणे १९९७
तुकाराम दर्शन : सदानंद मोरे १९९७
नारायण मेघाजी लोखंडे : मनोहर कदम १९९७
आंबेडकर : नलिनी पंडित १९९८
साहित्यविवेक : म. द. हातकणंगलेकर १९९८
काश्मीर प्रश्न : ना. य. डोळे १९९९
दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार :
श्री. रं. कुलकर्णी १९९९
ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना :
संपादक : विलास खोले १९९९



शोकात्म विश्वरूप दर्शन : जीवन आणि साहित्य : स. रा. गाडगीळ २०००
नवरात्र : अशोक चौसाळकर २०००
कर्मयोगी संन्यासी : नरेंद्र चपळगावकर २०००
मार्क्सचा मानव विचार : मुरलीधर पवार २००१
प्राचीन भारत : समाज आणि संस्कृती : म. अ. मेहेंदळे २००२
वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपट : जया दडकर २००२
साहित्य प्रत्यय : भा. ल. भोळे २००३
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे : जीवन व कार्य : गो. मा. पवार २००५
तुकाराम : अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे : म. सु. पाटील २००५
मराठी साहित्य : इतिहास आणि संस्कृती : वसंत आबाजी डहाके २००६
वानप्रस्थ : गणेश देवी २००७
समाचार : जयदेव डोळे २००८
बदलते विश्व : कुमार केतकर २००९
साम्राज्यवादविरोध आणि जातिविनाश : आनंद तेलतुंबडे २०१०
महापुरुषांच्या नजरेतून स्त्री : मंगला आठलेकर २०११
बाईमाणूस : करुणा गोखले २०१२
डाकीण : संध्या नरे-पवार २०१३
समग्र निरीश्वरवाद : शरद बेडेकर २०१५

ग्रंथ पुरस्कार : अ-पारंपरिक

जिहाद : हुसेन जमादार १९९४
आक्रोश : भीमराव गस्ती १९९५
दशक्रिया : बाबा भांड १९९६
लॉरी बेकर : अतुल देऊळगावकर १९९७
विमुक्तायन : लक्ष्मण माने १९९८
दुष्काळ आवडे सर्वांना :
अनुवाद : हेमंत कर्णिक २००४
आयदान : उर्मिला पवार २००४
खाली जमीन वर आकाश : सुनीलकुमार लवटे २००७
तमाशा : एक रांगडी गंमत : संदेश भंडारे २००७
कथा मुंबईच्या गिरणगावाची : नीरा आडारकर व मीना मेनन २००८
एका साळियाने : लक्ष्मीनारायण बोल्ली २००९
आणि दोन हात : वि. ना. श्रीखंडे २०१०
दगडावरची पेरणी : सय्यदभाई २०१०
वाचणाऱ्याची रोजनिशी : सतीश काळसेकर २०११
आपुलाचि वाद आपणासि : चंद्रकांत वानखडे २०११
आश्रम नावाचे घर : अचला जोशी २०११
जाग मना जाग : लीला आवटे २०१२
प्लॅटफॉर्म नंबर झिरो : अमिता नायडू २०१३
चित्रव्यूह व चलत्‌चित्रव्यूह : अरुण खोपकर २०१४
प्रतिमा-प्रचिती : नितीन दादरावाला २०१५
इर्जिक : अरुण जाखडे २०१६
सय : माझा कला प्रवास : सई परांजपे : २०१७

रा. शं. दातार नाट्य पुरस्कार

ढोलताशे : चं. प्र. देशपांडे २००३
कळा या लागल्या जीवा : किरण पोत्रेकर २००४
छोट्याश्या सुट्टीत : सचिन कुंडलकर २००५
मळभ : किरण यज्ञोपवीत २००६
निब्बाण : अरुण मिरजकर २००७
ते पुढे गेले : मकरंद साठे २००८
खेळीमेळी : चंद्रशेखर फणसळकर २००९
आनंदभोग मॉल : आशुतोष पोतदार २०१०
बया दार उघड : सुषमा देशपांडे २०११
काय डेंजर वारा सुटलाय : जयंत पवार २०१२
राजकुमार तांगडे (अभिनय व लेखनासाठी) २०१३
हिंमाशू स्मार्त : जत्रेतलं जायंट व्हील २०१४
सुसाट : अजित देशमुख २०१५
अनिलकुमार साळवे (एकूण नाट्यलेखन) २०१६
समाजस्वास्थ्य : अजित दळवी : २०१७

नाट्य क्षेत्रातील विशेष कामगिरीसाठी पुरस्कार

रा. शं. दातार विशेष नाट्यपुरस्कार

अतुल पेठे २००६
मराठी रंगभूमीच्या तीस रात्री : मकरंद साठे २०१३





महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) समाजकार्य पुरस्कारांचे मानकरी

१९९६
समाजप्रबोधन (संस्था) :
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सातारा
समाजप्रबोधन (व्यक्ती) : विलास वाघ, पुणे
पर्यावरण-संवर्धन (व्यक्ती) :
वासुदेवराव चित्रे, पालघर
स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : विजया चौक, धुळे
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
रा. वि. भुस्कुटे, अंबरनाथ

१९९७
स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत, पुणे
समाजप्रबोधन (संस्था) : लोकविज्ञान संघटना, पुणे
स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : शुभदा देशमुख, गडचिरोली
पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
विजय नारकर, देवरूख
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
लीला पाटील, कोल्हापूर

१९९८
पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) :
निसर्ग मित्र मंडळ, औरंगाबाद
समाजप्रबोधन (व्यक्ती) : जयंत गडकरी, मुंबई
स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
बापूसाहेब नागाप्पा म्हेत्री, गडहिंग्लज
पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
हुमायून अब्दुलअली, मुंबई
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
सुरेखा दळवी, पेण

१९९९
प्रबोधन (संस्था) : समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी
समाजप्रबोधन (व्यक्ती) : मोहन हिराबाई हिरालाल, चंद्रपूर
स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : रेहाना बैलिम, अमरावती
पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
कुसुम कर्णिक, पुणे
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
भरत कावळे, नाशिक

२०००
स्त्रियांचे प्रश्न (संस्था) :
महिला हक्क संरक्षण समिती, नाशिक
समाजप्रबोधन (व्यक्ती) : मनोहर कदम, मुंबई
पर्यावरण-संतुलन / संरक्षण (व्यक्ती) :
चिं. धों. आसवले, पुणे
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
संजय संगवई, पुणे.

२००१
पर्यावरण-संतुलन / संरक्षण (संस्था) :
ॲकॅडमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स, कर्जत
समाजप्रबोधन (व्यक्ती) : मु. ब. शहा, धुळे
स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : कुमुद पावडे, नागपूर
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
काळुराम दोधडे, पालघर
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : प्रभाकर म्हसकर, अंमळनेर

२००२
समाजप्रबोधन (संस्था) :
डॉ. पी. व्ही. मंडलीक ट्रस्ट, मुंबई
स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) :
भुरीबाई मानसिंग शेमळे, नंदुरबार
वैशिष्ट्यपूर्ण समाजकार्य (व्यक्ती) :
रजिया सुलताना, अमरावती
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : दत्ता इस्वलकर, मुंबई
डॉ. विवेक माँटेरो, मुंबई, डॉ. राम पुनियानी, मुंबई

२००३
समाजप्रबोधन (संस्था) :
कोयना जीवन हक्क संरक्षण संघटना, कोरेगाव, सातारा



स्त्रियांचे प्रश्न (व्यक्ती) : रझिया पटेल, पुणे
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
शेख वजीर पटेल, अमरावती
सुरेश शिपूरकर, कोल्हापूर
आनंद पटवर्धन, मुंबई
उल्का महाजन, रोहा, रायगड

२००४
समाजप्रबोधन (संस्था) :
समाज विज्ञान अकादमी, पुणे
मासूम, पुणे
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
तिस्ता सेटलवाड, मुंबई
रमेश हरळकर, मुंबई
पोपटराव पवार, अहमदनगर
डॉ. मोहन देशपांडे, पुणे
विलास भोंगाडे, नागपूर

२००५
समाजप्रबोधन (संस्था) :
लोकपंचायत, संगमनेर, जि. अहमदनगर
श्रमिक महिला विकास संघ, वसई
समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
श्री. लीलाधर हेगडे, मुंबई
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
प्रा. यशवंत सुमंत, पुणे
श्री. लक्ष्मण माने, करंजे, जि. सातारा
श्रीमती प्रतिभा शिंदे, नंदुरबार
श्रीमती पूर्णिमा मेहेर, पालघर
श्रीमती सुषमा शर्मा, वर्धा
सत्कार : श्री. सुरेश खोपडे, मुंबई

२००६
समाजप्रबोधन (संस्था) :
आंबेडकर अकादमी, सातारा
पुणे शहर मोलकरीण संघटना, पुणे
समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
पन्नालाल सुराणा
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) :
रूपा कुळकर्णी, नागपूर
अनंत फडके, पुणे
वाहरू सोनवणे, नंदुरबार
सत्कार : मनीषा वर्मा

२००७
समाजप्रबोधन (संस्था) :
हॅलो मेडिकल फाउंडेशन, अणदूर, जि. उस्मानादाबाद
स्त्री मुक्ती संघटना, मुंबई
समाजकार्य सन्मान (विशेष पुरस्कार) :
प्रा. एन. डी. पाटील, सातारा
समाजकार्य सन्मान (व्यक्ती) : प्रदीप प्रभू, डहाणू
अन्वर राजन, पुणे, राजन इंदुलकर, चिपळूण
सत्कार : प्रकाश विश्वासराव

२००८
समाजकार्य जीवनगौरव (व्यक्ती) :
डॉ. बाबा आढाव, पुणे
समाजप्रबोधन (व्यक्ती) : डॉ. आनंद तेलतुंबडे
पर्यावरण संरक्षण संवर्धन (व्यक्ती) : कुंजबिहारी
परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य (व्यक्ती) :
अर्जुन कोकाटे
दलितांचे प्रश्न : व्यंकप्पा भोसले
सामाजिक सलोखा : सुरेश खैरनार
युवा कार्यकर्ता : सिम्प्रित सिंग

२००९
जीवनगौरव (व्यक्ती) : व्यंकटअण्णा रणधीर
समाजप्रबोधन : सुभाष वारे
सामाजिक प्रश्न : बंड्या साने
असंघटित कष्टकरी : श्रीनिवास कुलकर्णी
युवा कार्यकर्ता : योगिनी खानोलकर

२०१०
जीवनगौरव (व्यक्ती) : नागनाथअण्णा नायकवडी
विशेष कार्य : चंद्रकांत केळकर
समाजप्रबोधन : सत्यपाल महाराज
असंघटित कष्टकरी : बस्तू रेगे
सामाजिक प्रश्न : हरीष सदानी
युवा कार्यकर्ता : नीलेश निमकर
लक्षवेधी प्रशासकीय कार्य : लक्ष्मीकांत देशमुख

२०११
समाजकार्य जीवनगौरव : जी. जी. परीख



समाजप्रबोधन : सुनीती सु. र.
असंघटित कष्टकरी : सुभाष लोमटे
सामाजिक प्रश्न : ब्रायन लोबो
विशेष कार्य : ज्योति म्हापसेकर
विशेष कार्य : नीलिमा मिश्रा

२०१२
समाजकार्य जीवनगौरव : ठाकूरदास बंग
समाजप्रबोधन : माधव बावगे
सामाजिक प्रश्न : बाळकृष्ण रेणके
असंघटित कष्टकरी : शिवाजी कागणीकर

२०१३
समाजकार्य जीवनगौरव : रयत शिक्षण संस्था
समाजप्रबोधन : गजानन खातू
असंघटित कष्टकरी : धनाजी गुरव
सामाजिक प्रश्न : डॉ. अशोक बेलखोडे

२०१४
समाजकार्य जीवनगौरव : पुष्पा भावे
समाजप्रबोधन : रमेश गावस
सामाजिक प्रश्न : बिंदुमाधव खिरे
असंघटित कष्टकरी : मनीषा तोकले

२०१५
समाजकार्य जीवनगौरव : विद्या बाळ
समाजप्रबोधन : भीम रासकर
असंघटित कष्टकरी : पल्लवी रेणके
सामाजिक प्रश्न : कृष्णा चांदगुडे

२०१६
समाजकार्य जीवनगौरव : हमीद दलवाई (मरणोत्तर)
समाजप्रबोधन : देवजी तोफा
सामाजिक प्रश्न : विजय दिवाण
असंघटित कष्टकरी : सुशीला नाईक

२०१७
समाजकार्य जीवनगौरव : गंगाप्रसाद अग्रवाल
समाजप्रबोधन : रुबिना पटेल
असंघटित कष्टकरी : चेतना गाला-सिन्हा
सामाजिक प्रश्न : अरुण जाधव

डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृति-पुरस्कार :
विवेक सावंत / २०१३
निखिल वागळे / २०१४
उत्तम कांबळे / २०१५
अतुल पेठे / २०१६
अरविंद गुप्ता / २०१७



डॉ.नरेंद्र दाभोलकर संस्थापक-कार्याध्यक्ष राहिलेल्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला महाराष्ट्र फाउंडेशनचा पहिला समाजकार्य पुरस्कार (१९९६ मध्ये) मिळाला होता आणि ‘दशकातील सर्वोत्तम कार्यकर्ता’ हा दहा लाख रुपयांचा पुरस्कार (२००६ मध्ये) डॉ.दाभोलकरांना अमेरिकेत बोलावून दिला गेला होता. २००९ मध्ये महाराष्ट्र फाउंडेशनच्या साहित्य व समाजकार्य पुरस्कारांचे संयोजन साधना ट्रस्टकडे आल्यानंतर, सर्व नियोजन डॉक्टरांच्या नेतृत्वाखाली केले जात होते. त्यामुळे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ फाउंडेशनने एक नवीन पुरस्कार सुरू करणे अगदीच साहजिक होते.

डॉ.दाभोलकर स्मृतिपुरस्कारासाठी व्यक्तीची निवड करताना चार प्रमुख निकष लावले जातात.

१. धर्मनिरपेक्षता व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार करण्यात त्या व्यक्तीचे योगदान असले पाहिजे.
२. त्या व्यक्तीने आपल्या कार्यक्षेत्रात काही एक ध्येयवाद समोर ठेवून व सामाजिक बांधिलकी मानून कार्य केले असले पाहिजे.
३. पुरोगामी संस्था-संघटना-चळवळी यांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष बळ देणारी ती व्यक्ती असली पाहिजे.
४. मागील किमान दोन दशके काम केले आहे आणि पुढील दशकभर काम करण्याची क्षमता त्या व्यक्तीमध्ये असली पाहिजे.



Maharashtra Foundation Projects

Over the last decade, Maharashtra Foundation has gained visibility and recognition in India through its prestigious Literature and Social Service awards. Every year, we honor individuals and institutions in India that have achieved distinction in these fields. These awards are now very well recognized in the field.

The bulk of Maharashtra Foundation's work however is less well known. For over 35 years, Maharashtra Foundations has been working to improve the lives of people throughout the state of Maharashtra, the rest of the country, as well as other parts of the world. Some examples of our crisis intervention efforts are:

- Post-Earthquake Rebuilding in Latur, Maharashtra
- Earthquake Relief in Haiti
- Post-Earthquake Rebuilding in Gujarat, India
- Relief for victims after Hurricane Sandy in the Eastern USA.
- Rebuilding in Nepal after the recent Earthquake

Over the last 3 decades we have also partnered with numerous NGOs in India, in an ongoing effort to improve the lives of the needy. Some of our notable partnersare:

- Parivartan - Blind Faith Elimination
- CASP – Sponsorship of children's education and development
- Nari Samata Manch – Women's Rights Advocacy
- Think Maharashtra – Literacy Promotion
- Youssouf Meharalli Foundation – Social Improvement
- Men against violence (MAVA) – Engaging men as partners in Women's Rights

These are only a few examples. Maharashtra Foundation supports over 200 NGO'S In India each year with the aim of creating social and economic impact on the lives of the needy.

Each year the foundation receives up to 50 requests for funding from NGOs in India. We have a standing Project committee that scrutinizes these applications through criteria such as the relevancy of the organization and the project, interviews with office bearers of the organization, review of the project plan and past performance history. We fund projects that fall under the purview of our mission of Social Justice and Women's Empowerment. We are proud to present to you the Projects we have selected this year for funding.

CHAITANYA :

Promote Healthcare Jankar (Healthcare)

Aim is to provide access to quality healthcare and absorbing health shocks financially. The operational areas will focus

on rural and semi-urban villages, where there is a significant population living below the poverty line. The primary occupation of the households is agriculture.

PROJECT OBJECTIVES: 1. Chaitanya is launching a comprehensive community-based micro-health insurance model that enables members to share their risks of illness as a community. 2. To decrease the burden of health illnesses, those who purchase the product receive discounted out-patient (OPDs) and inpatient services, medicines, and diagnostic tests at network facilities. 3. To increase the quality of care received. 4. The product promotes preventative care measures. Chaitanya will appoint one doctor for every 500 self-help groups to visit remote underserved regions where medical facilities are not as available. The doctor will be assisted by Jankar (Jaankaar).

Jankars are members of the local community recruited to serve as health resource persons. They will be trained in preventative health care through the certificate program offered by the state open university. The Jankars will focus on increasing awareness through relevant health camps, encouraging proper health care usage, promoting preventative measures, providing referrals to network hospitals, and assisting with minor health problems; the Jankars will serve as an interface between members, the insurers, and medical facilities.

WRCS -
Wildlife Research Conservation Society :
Prevent Deforestation
(Environment Protection)

Vision and Mission Statement of Organization is to bring about a society that respects nature, upholds these principles in its policies and laws, and uses natural resources judiciously so that wildlife and forests are conserved. Goal of the Organization is to ensure that India's wildlife and forests are well protected and safe for posterity.

PROJECT OBJECTIVES: 1. to carry out research studies that will generate scientific information that will help to guide management actions for wildlife conservation. 2. To implement projects with participation of local community and government agencies for wildlife and forest conservation. 3. To carry out advocacy to bring about policy changes that will be beneficial for conservation of wildlife and forests. 4. To create awareness about wildlife and forest conservation in the public, the government executives and the policy makers. Major area of work is conservation of private forests; WRCS has carried out studies that help to further information on conservation of private forests in Western Ghats of Maharashtra. WRCS is carrying out a project for conservation of private forests at Koyna with participation of local community.

JVK -
JAMKHED VIKAS KENDRA :
Support for orphans and
vulnerable groups
(Underprivileged)

Support for Orphans & Vulnerable. GraminVikas Kendra, Jamkhed was founded in 1995 as non-profit organization in Ahmednagar of Maharashtra. It was started by a team of dedicated persons with the aim of helping the children from paradhi community and orphans children and also children affected and infected with HIV/AIDS.

Gramin Vikas Kendra, Jamkhed (GVK) would like to secure funding to provide a small orphanage which will provide children with a safe and stable home, education and



support throughout their childhood. JVK is seeking funds to provide shelter home for 50 children & remaining 50 children with substitute parents near the shelter home; mostly from Pardhi community. There are about 300 more such children but there is lack of funds, which prevents implementation of rehabilitation services. Maharashtra Foundation's funding will be a catalyst for the future activity & sustainability of this program.

Save Indian Farmers (SIF) :
Adopt-a-widow
(Empowerment)

Save Indian Farmers (SIF) is a registered non-profit organization [501 C (3) status] here in United States. SIF's main objective is to promote awareness regarding the issue of farmer suicides, help the families of the victims and fund projects that will help the farmers and their families in long term. The goal is to create rural entrepreneurs with sustainable monthly income and independent, self-reliant contributors to Indian society.

Adopt-a-widow project details: Through small businesses such as clothing store, goat keeping, flour mill, tailoring, grocery, stationary store and milk dairy, ladies from 7 talukas of the Yavatmal district will earn daily income to sustain and support their families.

Quest :
Train-the-trainer, Math education
(Education)

One of the major factors, which influence the developmental process of children, is 'Elementary Education'. The most influencing factor affecting the quality of 'Elementary Education' is teachers' professional development. In-service teacher education has emerged as a critical area for intervention in the Indian education system. Results of various surveys persistently show poor levels of achievements in basic mathematics and literacy among the students of elementary schools. Intervention is needed at various levels for effective change and desired results. Educators almost unanimously agree that long-term interventions are helpful to bring positive transformation.

To address this need QUEST has taken an initiative for capacity building of in-service teachers. Goal is to address pedagogical issues faced by practicing teachers at a scale through blended learning programs. Objectives are: 1 - To enhance teachers' subject matter knowledge and pedagogical understanding through focused theoretical and practical input and to design and 2 - develop a system for teachers' professional development which could be further scaled up to reach to the teachers working in the remote areas, using appropriate technology.

Suhrud Mandal :
Education development for Hearing and Speech impaired
(Disabled)

Suhrud Mandal is a registered NGO, working for Educational & Vocational training rehabilitation of children with hearing impairment. Schools have been using regular schools' Balbharati textbooks for years together. There are no special textbooks available for the children with hearing impairment. In year 2011-12 teachers worked to develop partial adaptation of textbooks. The encouraging results of the project made Suhrud Mandal to decide on rewriting entire text books for all school subjects for grade I to IV. And also to prepare formal textbooks which can be provided to all the special schools for



children with hearing impairment in Maharashtra State. Nearly 20,000 children from special schools and from inclusive education program of Maharashtra state will benefit from this work.

Books on environmental Sciences and History (4 Books) will be ready by October 2015. Suhrud Mandal would like to expand this project up to 8th grade in next three years. Children have been deprived of appropriate educational learning material. Hence they lagged behind scholastically for years together, which reflected in poor job employment opportunities. This newly developed material will enhance children's reading and writing skills in the formative years, and they will be ready for inclusive education at the early stage, which is the main objective of Suhrud Mandal.

Punyabhushan Foundation/ Samkaleen Prakashan : **Inspirational books for rural schools (Welfare)**

With roughly 94,000+ schools spread across 35 districts within Maharashtra, 20+ districts have limited-to-no access to libraries neither have any good reading books. In addition, news about corruption, rape & atrocities that shape the daily media coverage is making responsible people uncomfortable. There is a dire need to provide equally un-biased view of good things happening around & inspire the young generation to keep them motivated to lead well-cultured & satisfying life. Samkaleen Prakahashan, along with Unique Features has taken- up this challenge & developed a set of 14- such inspirational books covering various fields from technology to governance to social work to history with each set worth Rs. 2,500/ & have distributed them to roughly 3,500 schools so far. Response has been extremely positive confirming the need to expand the coverage. First phase is to distribute these sets to 10,000 additional schools within next 10+ years. This specific project will help distribute this set to 100 schools.

MAVA : **Men against violence and abuse (Anti violence against women)**

Gender Sensitization and Mentoring of young men - Men against Violence & Abuse (MAVA) (3-yearproject, $12K for second year) MAVA is the first men's organization in India directly intervening against gender-based violence on women. Established in 1993, MAVA is working towards building A movement that explores the role of men as 'partners' and 'stakeholders' – addressing gender issues (including women's empowerment) through cultural advocacy, direct intervention and youth education initiatives. In this project, young adult trainers will conduct gender sensitization workshops largely focused on youth between 18-25 years of age. Workshops include interactive sessions, experimental learning and personal dialog, leveraging youth-friendly media e.g. film-screenings, skits, youth "melavas", awareness songs etc. Expected outcomes include - youth talking comfortably about gender and masculinity issues. Project will develop action plans to address issues of gender based violence through networking and tie-ups.







‘महाराष्ट्र फाउंडेशन’कडून अनुदान मिळविण्याकरता प्रक्रिया

ज्यांचे आर्थिक व्यवहार पारदर्शक आहेत अशा महाराष्ट्रातील सामाजिक काम करणाऱ्या संस्थांकडून अभिनव प्रकल्पांचे ‘महाराष्ट्र फाउंडेशन’ स्वागतच करते. **अशा संस्थांनी एफ.सी.आर. ॲक्टखाली** (Foreign Contribution Act) **केंद्र सरकारच्या गृहखात्याकडे नोंदणी केलेली असणे आणि प्राप्तीकर कायद्याच्या ८०-जी कलमाप्रमाणे त्यांच्याकडे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.** एफ.सी.आर. नोंदणीशिवाय प्रस्तावाचा विचार होऊ शकणार नाही.

‘महाराष्ट्र फाउंडेशन’कडे अनेक संस्थांकडून अनुदानासाठी नवीन प्रकल्प सतत येत असतात. हे अर्ज स्वीकारताना पुढील निकष लावले जातात :

- संस्था समाजातील खालच्या थराकरिता कार्य करणाऱ्या, स्थिरावलेल्या व काही प्रकल्प यशस्वीपणे राबवलेल्या असावयास हव्यात.
- संकल्पित प्रकल्पाचा वा योजनेचा उद्देश गरीब व दुर्बल (vulnerable) अशा समाजघटकांचे जीवनमान गुणात्मकदृष्ट्या सुधारणारा असायला हवा.
- प्रकल्पाचे लाभ दीर्घकाळ टिकणारे व दारिद्र्य दूर करणारे असायला हवेत.
- शिक्षण, आरोग्य, आर्थिक सक्षमीकरण, पर्यावरण व स्त्रियांचे सबलीकरण ही महाराष्ट्र फाउंडेशनच्या कार्याची प्रमुख क्षेत्रे आहेत.

महाराष्ट्र फाउंडेशनकडे साहाय्यासाठी येणाऱ्या प्रस्तावाचे स्वरूप थोडक्यात (चार पृष्ठांपर्यंत) असे असावे :

- प्रकल्पाची पार्श्वभूमी : स्थानिक परिस्थितीचे विश्लेषण व प्रकल्पाची गरज.
- प्रकल्प : प्रकल्प कशाकरता (थोडक्यात), संकल्पित कामाचे स्वरूप, त्या कामाचे फलित.
- प्रकल्पाकरता संस्थेकडे असलेले विशेष तज्ज्ञ मार्गदर्शक व संस्थेचा त्या क्षेत्रातील अनुभव.
- खर्चाचे अंदाजपत्रक : प्रकल्पाच्या पूर्तीकरता लागणारे मनुष्यबळ, साहित्य व सामान, कार्यालय, प्रवास व इतर खर्चाचे अंदाज. (एक पृष्ठ).
- प्रकल्प पूर्ण होण्याचा अपेक्षित काळ.
- प्रकल्पाची कार्यवाही व देखरेख करणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे.
- संस्थेला मदत करणाऱ्या इतर देशी व विदेशी संस्थांची नावे.

(या पत्रासोबत इतर कागदपत्रे जोडू नयेत.)

महाराष्ट्र फाउंडेशनकडे नवीन प्रकल्पांच्या सूचना सतत येत असतात; परंतु आलेल्या सर्व प्रकल्पांचा विचार वर्षातून एकदाच केला जातो. प्रकल्पाविषयी अधिक माहिती आवश्यक वाटल्यास ती त्यावेळी मागवण्यात येते.

जर महाराष्ट्र फाउंडेशनकडे आलेला प्रकल्प स्वीकारला गेला, तर संस्थेला तसे कळवून संस्थेशी करार केला जातो. करारावर सह्या झाल्यावर मंजूर केलेल्या रकमेपैकी पहिला हप्ता संस्थेकडे पाठविला जातो. प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल व खर्चाचा तपशील कळविल्यावर मंजूर अनुदानाचे पुढील हप्ते दिले जातात व प्रकल्प पूर्ण झाल्याचा अहवाल पाठविल्यानंतर अनुदानाचा शेवटचा हप्ता पाठविला जातो.

अनुदानासाठी महाराष्ट्र फाउंडेशनकडे मोठ्या प्रमाणावर सूचना येत असल्यामुळे वरील निकष लावून त्यातील काही प्रकल्पांचीच निवड करणे महाराष्ट्र फाउंडेशनला शक्य होते.


महाराष्ट्र फाउंडेशनशी करावयाचा पत्रव्यवहार e-mail द्वारा करणे सोयीचे आहे. हा पत्रव्यवहार महाराष्ट्र फाउंडेशनच्या अध्यक्षांच्या नावे करावा.

संस्थेकडे e-mail ची सोय उपलब्ध नसेल तर अशा संस्थेने आपली वरील प्रकारची माहिती महाराष्ट्र फाउंडेशनच्या पुढील पत्त्यावर पाठवावी :

Maharashtra Foundation
Post Box 2287, Church Street Station
New York, NY 10008-2287
www.maharashtrafoundation.org







महाराष्ट्र फाउंडेशन
पुरस्कार निवड समित्या : २०१७

भारतातील निवड समित्या

साहित्य : ग्रंथ पुरस्कार
- मुकुंद टाकसाळे (अध्यक्ष)
- रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ
- अतुल देऊळगावकर

सामाजिक कार्यकर्ते पुरस्कार
- विजया चौहान (अध्यक्ष)
- डॉ. शशिकांत अहंकारी
- डॉ. सतीश गोगुलवार
- राजन इंदुलकर
- राजेंद्र बहाळकर

समन्वयक : महाराष्ट्र फाउंडेशन पुरस्कार
विनोद शिरसाठ

अमेरिकेतील निवड समित्या

साहित्य पुरस्कार
- सुनील देशमुख
- शोभा चित्रे
- विद्युल्लेखा अकलुजकर

समाजकार्य पुरस्कार
- सुनील देशमुख
- शिरीष गुप्ते
- अरुंधती विनोद
- शैला विद्वांस
- मंजुषा नाईक
- सुनीता धुमाळे
- मनीषा केळकर

रा. शं. दातार नाट्य पुरस्कार
- सुनील देशमुख
- रजनी शेंदुरे

साहित्य व समाजकार्य पुरस्कारांसाठी कोणाकडूनही अर्ज मागवले जात नाहीत. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील ५०० मान्यवरांना पत्र पाठवून त्यांच्याकडून शिफारसी मागवल्या जातात. त्यांचा विचार करून भारतातील निवड समित्यांनी प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस केली होती, त्यातून प्रत्येक पुरस्कारासाठी एक नाव अमेरिकेतील निवड समितीने निश्चित केले. साहित्य जीवनगौरव, समाजकार्य जीवनगौरव आणि डॉ.नरेंद्र दाभोलकर स्मृति-पुरस्कार या तीन पुरस्कारांची निवड, महाराष्ट्रातील मान्यवरांकडून मागवलेल्या शिफारशींचा एकत्रित विचार करून संयोजक व महाराष्ट्र फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी समन्वयाने केली.

Date of Publication - 13-01-2018



परिचय
पुरस्काराचे प्रवर्तक



सुनील देशमुख



सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळवली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

सुनील देशमुख हे यु.एस्.मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या सर्वांत जुन्या 'सियारा क्लब' या संस्थेचे सक्रिय सभासद आहेत. सियारा क्लबमार्फत भारतामध्ये पर्यावरणाच्या संवर्धनाचे कार्य करणाऱ्या संस्थांना एक लाख डॉलर्सचा पुरस्कार देण्याच्या योजनेचे ते शिल्पकार आहेत. तसेच त्यासाठी करावयाच्या निधी संकलन समितीचे प्रमुख आहेत.

श्री.देशमुख यांनी महिला सक्षमीकरणासाठी अमेरिकेत केलेल्या कामाबद्दल त्यांना न्यूयॉर्कमधील 'टाइम स्केअर'मध्ये श्रीमती हिलरी क्लिंटन यांच्यासमवेत 'फुल वीक सॅल्यूट'चा सन्मान मिळाला.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून त्यांनी महाराष्ट्र फाउंडेशनला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून महाराष्ट्र फाउंडेशनचे मराठी साहित्य पुरस्कार ही योजना सुरू केली. १९९६ पासून सामाजिक कार्य पुरस्कार योजनेसाठीही त्यांनी तेवढ्याच रकमेची व्यवस्था केली. २००८ पर्यंत या पुरस्कारांची निवड व वितरण कार्यवाही मुंबई येथील 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' मार्फत होत होती; त्यानंतर ही कार्यवाही पुणे येथील साधना ट्रस्टमार्फत होत आहे. या वर्षीच्या संयोजनात दोन्ही ट्रस्टचा सहभाग आहे.

Sunil Deshmukh
Tele/Fax : 305-918-0755
email : sunild@aol.com



परिचय



Shirish Gupte

Shiris horiginally joined the Board of Directors of Maharashtra Foundation in 1985– a charitable organization with the goal of providing the promotion of economic empowerment and social justice for all. He participated in various fund raising activities, not only in NJ but several other states in the US for this cause. He worked in the capacity of Vice President and then President of MF. The highlight during his term on the Board was the overwhelming support provided after the massive earthquake in Latur and the establishment of the Progressive Literature award in India. He also authored several changes to the constitution and By-Laws of the foundation to streamline them with the current situations. Since there were term limits, he had to leave the Board of Maharashtra Foundation after serving for ten years. He still remained active in supporting the activities of the foundation after he left the Board. In 2013 at the request of then President he re-joined the board of the foundation. He was quickly appointed as Vice-President and eventually was elected by the Board to become the President for a second time in July 2015. The only President to hold two terms in this organization to date.

His dedication to support the mission of foundation "Social Justice and Economic Empowerment for all and Women's causes" is undaunted.



Manjusha Naik

Manjusha Naik has been an active member of the Indian and South Asian communityfor the last several years. She has spearheaded several community service projects in the Tampa Bay area.

Since 2006, she began volunteering for PEHCHAAN (Providing Educational, Humanistic, and Cultural Hope for the south Asian American Network), a non-profit voluntary organization with the mission to provide psychosocial support and services to South Asian community. She now serves as the President of the organization.

Due to her passion for reading, her Marathi reading group has focused on discussing different authors, their writing styles, and topics of cultural importance for the Indian community. During this exchanges, came the idea of starting a annual Marathi magazine,Abhiruchi in 2006. She is the founding member and has served as a co-editor and co-publisher for this magazine for the last ten years.


Manjusha hails from Nashik and was educated in Nagpur and Mumbai.She lives in Tampa, FL with her husband, Dr. Eknath Naik, staff physician and Assistant Director of Emergency Department at James A. Haley VA Hospital, son, Sameer, who is in college and her cute dog, Millie.

दिलीप चित्रे यांना

रसज्ञ, मर्मज्ञ आणि तत्त्वज्ञ

दिलीप चित्रे गेले... खरंच गेले? छट्, कसे जातील? जोपर्यंत त्यांचा आमच्यावरचा प्रभाव कायम आहे, तोपर्यंत ते खात्रीने जिवंत आहेत. शरीराने आमच्यात नसतील कदाचित... परंतु गेल्या तीसेक वर्षांच्या सान्निध्यात त्यांनी आमच्यात जे रूजवलंय ते कुठून असं जायला? ते जाणं शक्यच नाही. कारण त्यांनी एकप्रकारे जगणंच शिकवलं आम्हाला. जगाकडे पाहण्याचं भान दिलं, त्यातलं सौंदर्य शोधण्याची दृष्टी दिली आणि जे समोर आहे, त्याचा रसिकतेनं आस्वाद कसा घ्यायचा, हेही शिकवलं. चित्रे खऱ्या अर्थाने रसज्ञ, मर्मज्ञ आणि तत्त्वज्ञ होते. त्यांच्या या व्यक्तिमत्त्वाचा आम्हा मित्रमंडळींवर एवढा प्रभाव आहे की, साधं जेवणाचं टेबल सजवताना किंवा मद्याचा पेलाही भरताना, अरे चित्र्यांनी असं केलं असतं, असं मनात येतं... मग सांगा चित्रे कुठे गेलेत, ते तर आमच्यातच राहून आयुष्याची सुरेख मैफल साजरी करतायत...

... साठ-सत्तरच्या दशकात भारत सोडून जे परदेशात स्थायिक झाले, त्या पिढीचे प्रमुख प्रतिनिधी म्हणजे दिलीप आणि शोभा चित्रे हे दांपत्य. सुरुवातीला काही काळ ते लंडनला होते, पण नंतर अमेरिकेला आले आणि इथलेच बनून गेले. दोन संस्कृतींमधलं अंतर भेदणं सोपं नसतं. अन्यथा मनातल्या मनात संस्कृतीसंघर्ष होत राहतो. दिलीप चित्र्यांनी हे अंतर भेदलं, मात्र कायमचं पुसून टाकलं नाही. आपली भारतीय, त्यातही मराठी संस्कृती जतन करतानाच, त्यांनी अमेरिकन संस्कृतीही स्वीकारली, आपलीशी केली. नाहीतर, अमेरिकेत येऊन स्थायिक झालेल्या, परंतु इथल्या स्थानिक समाजकारण-राजकारण आणि संस्कृतीकारणाशी जराही समरस न झालेली अनेक उदाहरणं इथे आहेत. परंतु चित्र्यांनी तसं केलं नाही. आपलं मराठीपण जपतानाच, ते इथल्या जीवनशैलीशीही समरस झाले. आम्ही जसे त्यांचे मित्र होतो, तसेच त्यांचे इथले अनेक अमेरिकन्सही चांगले मित्र होते आणि दोन्ही कंपूत चित्रे अगदी सहज सामावून जायचे. हा जो त्यांचा पाण्यासारखा, म्हणजे कविवर्य बा.भ. बोरकर म्हणतात त्याप्रमाणे- 'जळापरी मन निर्मळ ज्याचे गेले तेथे मिळले हो' असा स्वभाव होता, तो खासच होता. यामुळेच ते सतत आनंदी, निर्मळ आणि निर्भर असायचे. त्यांच्या स्वभावाचा महत्त्वाचा गुण म्हणजे, ते स्पष्टवक्ते होते. ते कधीच कुणाच्या मागे बोलत नसत. एखादी गोष्ट आवडली किंवा नावडली तर ते थेट तोंडावर सांगून मोकळे होत. याचा अर्थ ते समोरच्यातले



दोष शोधत असा नाही. उलट कुणामध्ये दोष असला, तरी ते त्याच्यात चांगलं काय आहे, त्याचा शोध घेत आणि ते गुण वाढवण्यासाठी प्रयत्न करत.

जगण्यातला काटेकोरपणा व विचारातील पुरोगामीत्व हेही त्यांचे खास पैलू. जात-पात धर्माच्या ते पलीकडे गेलेले होते. मनुष्यत्व हेच खरं असं ते म्हणायचे. त्यामुळेच स्त्री-पुरुष असा भेदाभेदही ते करत नसत. घरात पार्टी असली, काही कार्यक्रम असला, तर शोभावहिनी जेवढं काम करत, तेवढंच तेही करत आणि तेही रसिकतेनं. साधं जेवणाचं टेबल सजवायचं असो, ते एवढं मन लावून ते करत की, येणाऱ्या प्रत्येकाची नजर टेबलाच्या सौंदर्याची दखल घेत असे. आमची पार्टी असली की, मद्याचे पेलेही अशा नजाकतीने भरत की, त्यातही सौंदर्य असायचं. त्यांचा जगाकडे-जगण्याकडे बघण्याचा दृष्टिकोनच आस्वादक होता. पूर्वी ते वॉशिंग्टनला राहायचे, अलीकडे काही वर्षं ते मी राहतो त्या फ्लोरिडालाच राहायला आले होते. माझ्या घरातून उगवणारा सूर्य दिसतो. माझ्याकडे आले की, ते रोज सकाळी उगवणाऱ्या सूर्याचे फोटो काढायचे. खरं तर रोज उगवणारा सूर्य तोच असायचा. परंतु चित्र्यांच्या कल्पक नजरेला तो रोज नवा दिसायचा. मात्र गंमत अशी की या प्रत्येक फोटोत चित्र्यांना शोभावहिनी हव्या असायच्या. शोभावहिनींच्या पार्श्वभूमीलाच त्यांचा उगवणारा सूर्य असायचा!

स्वीकारलेलं काम चोखपणे करण्यात तर त्यांचा हात कुणीच धरू शकणार नाही. साहित्यिक-सामाजिक योगदानासाठी आम्ही जेव्हा महाराष्ट्र फाऊंडेशनतर्फे पुरस्कार द्यायला सुरुवात केली, तेव्हा ते आमचे प्रमुख मार्गदर्शक तर होतेच, परंतु पुरस्कारासाठी आलेलं प्रत्येक पुस्तक त्यांनी वाचलेलं असायचं. स्पर्धेसाठी आलेल्या पुस्तकांनी बॉक्स भरलेला असायचा. त्या बॉक्समधल्या प्रत्येक पुस्तकावर त्यांनी वाचून खुणा केलेल्या असायच्या. ही त्यांची जाणकार रसज्ञ-मर्मज्ञाची नजर प्रत्येक गोष्टीत असायची. साधी त्यांची घरातली लायब्ररी. मी खात्रीने सांगतो की, इतर कुठल्याही लायब्ररींपेक्षा ती अधिक टापटीप आणि नेमस्त होती. ती इतक्या विविध विषयांवरील पुस्तकांनी समृद्ध होती की, त्यांच्या घरी गेल्यावर आमची नजर त्यांच्या लायब्ररीवर रोखलेलीच असायची. त्यांनी इतक्या सुरेख पद्धतीने लायब्ररीही लावलेली-सजवलेली असायची की, त्यातही त्यांची सौंदर्यदृष्टी कायम दिसायची.


चित्रे स्वभावाने उमदे आणि मोकळेढाकळे होते. त्यांनी स्वतःला बांधून ठेवलेलं नव्हतं. प्रत्येक नव्या गोष्टीचं, अनुभवाचं ते स्वागतच करीत. परंतु एका बाबतीत मात्र ते पक्के सीकेपी होते, ते म्हणजे त्यांची खाद्यसंस्कृती. सीकेपी खाद्यसंस्कृती जणू काही रक्तातूनच वाहत येत असावी. चित्रेंचं आपल्या खाद्यसंस्कृतीवर निरतिशय प्रेम होतं. त्यातही विशेष करून खेकड्याच्या कालवणावर. त्यासाठी ते स्वतः जाऊन खेकडे आणायचे. ते साफ करायचे. त्यासाठीचं वाटणघाटणही तयार करायचे. हे खेकडे त्यांना सीकेपी पद्धतीचेच लागायचे. खेकड्यांच्या या कालवणाचं नावही खास होतं आणि आहे- मिरवणी!

एकूणच जीवनाला कवेत घेण्याची ही जी 'चित्रे'शैली आहे, ती व्यक्तिशः मला कायमच खूप भावत आलीय. जुन्याशी नातं तोडायचं नाही, अन् तरी वर्तमान-भविष्याच्या स्वागताला कायम संगमोत्सुक भावनेनं तयार असायचं, हे मला एकदम भारी वाटतं. भारत-महाराष्ट्रातून इथे येणारे कायमच कंपू करून राहतात. आपल्या भविष्यासाठी ते इथे दूर परदेशात येतात. मात्र इथे येऊन आपला भूतकाळ-संस्कृतीची आठवण काढत खंतावत बसतात. चित्रेंनी ते नेमकं टाळलं. त्यांना आपल्या मुळांचा कधीच विसर पडला नाही. किंबहुना आम्हा सगळ्यांपेक्षा भारतीय-महाराष्ट्रीय संस्कृतीची जाण-ओळख त्यांना अधिक होती. मात्र त्यांनी पाश्चात्य संस्कृती अव्हेरली नाही. त्यांनी दोन्ही संस्कृतींना आपल्या हृदयात उदारपणे आश्रय दिला. म्हणून तर ते पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा दुवा म्हणून प्रख्यात होते. ते एक सांस्कृतिक सेतूच होते!

तो दुवा आज कदाचित व्यक्तिरूपाने, शरीररूपाने राहिलेला नसेल, पण म्हणून दिलीप चित्रे आपल्यात नाहीत, असं कोण म्हणेल... त्यांनी मांडलेली-सजवलेली मैफल सुरूच आहे यारों... कमी फक्त तुमची आहे!

सुनील देशमुख (अमेरिका)
sunild@aol.com

'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाच्या ९ जुलै २०१७ च्या अंकात प्रसिद्ध झालेला लेख इथे पुनर्मुद्रित केला आहे.
– संपादक



परिचय :
समारंभाचे प्रमुख पाहुणे
सिद्धार्थ वरदराजन



समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी विविध क्षेत्रांतील लोक काम करत असतात. त्यापैकी वैचारिक आणि सामाजिक या दोन्ही स्तरांवर काम करताना प्रस्थापित व्यवस्थेशी संघर्ष करण्याचे प्रसंग येतात. अशा वेळी आपल्या देशाच्या सर्वोच्च वर्तुळात उदारमतवादी व परिवर्तनवादी धारणा घेऊन जाणारे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रभाव टाकणारे लोक असणे गरजेचे असते. पत्रकारितेच्या क्षेत्रात अशा स्वरूपाची जी नावे प्रामुख्याने समोर येतात, त्यांत सिद्धार्थ वरदराजन यांचा समावेश करावा लागेल. त्यांचे काम मुख्यतः इंग्रजीत आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहे. वरदराजन यांचे लेखन आणि कर्तृत्व कायम पुरोगाम्यांच्या बाजूने उभे राहिलेले आहे. राजकीय-सामाजिक बाबतीत मूलतत्त्ववादाविरोधी भूमिका त्यांनी सातत्याने घेतली आहे. त्यासाठी ज्या प्रकारची किंमत चुकवावी लागते, तीदेखील त्यांनी चुकवलेली आहे. इंग्रजी पत्रकारितेत या स्वरूपाची उदाहरणे कमी-कमी होत असताना, वरदराजन मात्र अजूनही ठामपणे उभे आहेत. ते 'द हिंदू' या निखळ गुणवत्ता व व्यावसायिकता यासाठी ओळखल्या जाणाऱ्या प्रभावी इंग्रजी वर्तमानपत्राचे वयाच्या चाळिशीतच संपादक झाले होते.

वरदराजन यांचा जन्म १९६५ मधील. त्यांचे वडील भारतीय प्रशासकीय सेवेत होते, तर आई उद्योजिका होती. वडिलांची लंडनमध्ये नियुक्ती झाल्यामुळे जडण-घडण होतानाचा बराच काळ ते इंग्लंड-अमेरिकेत होते. विद्यार्थिदशेत असतानाच ते पुरोगामी राजकारणाकडे ओढले गेले. ब्रिटनमधील 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स'आणि अमेरिकेतील 'कोलंबिया युनिव्हर्सिटी'मध्ये त्यांनी शिक्षण घेतले. ते पीएचडीसाठी अर्थशास्त्राचा अभ्यास करत होते. पत्रकारितेत येण्याआधी ते न्यूयॉर्क शहरात राहत होते आणि 'न्यूयॉर्क युनिव्हर्सिटी'मध्ये शिकवत होते. वयाच्या २९ व्या वर्षी त्यांनी पत्रकार होण्याचा निर्णय घेतला आणि ते भारतात परत आले.

वरदराजन यांची पत्रकारितेतील सुरुवात 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या संपादकीय विभागापासून झाली. १९९५ ते २००४ अशी नऊ वर्षे ते 'टाइम्स'मध्ये होते. त्यांनी २००२ मध्ये गुजरात दंगलीवर 'गुजरात : द मेकिंग ऑफ अ ट्रॅजेडी' हे पुस्तक संपादित केले. त्या पुस्तकात रामचंद्र गुहा, महाश्वेतादेवी, राजदीप सरदेसाई, बरखा दत्त आदींचे लेख आहेत. आजही त्या पुस्तकाला टाळून गुजरात दंगलीचा अभ्यास करता येत नाही.

२००४ ते २०११ अशी सात वर्षे ते 'द हिंदू'मध्ये पत्रकार होते. त्या काळात त्यांनी भारत-अमेरिका यांच्यातील अणुकरार, भारत-इराण संबंध, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि चीन यावर वार्तांकन केले होते. (त्यांनी 'टाइम्स'मध्ये असतानाही आग्नेय युरोप, पश्चिम आशिया आणि अफगाणिस्तान येथील युद्धांच्या, संघर्षांच्या प्रत्यक्ष तिथे जाऊन बातम्या दिल्या होत्या.) २००५ मध्ये अणुकराराच्या मुद्यावरून भारताने आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगातील मतदानात इराणच्या विरोधात भूमिका घ्यावी यासाठी अमेरिका कसा दबाव टाकत आहे, याची

सनसनाटी बातमी त्यांनी दिली होती. (आणि भारताने अमेरिकेच्या दबावापुढे झुकून तेव्हा इराणच्या विरोधी मत दिले होते.) मनमोहनसिंग सरकारने हा करार प्रतिष्ठेचा केला होता आणि त्या करारावरून हे सरकार टिकते की पडते, असा पेच निर्माण झाला होता. देशाच्या अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनेसुद्धा या कराराला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. त्या बातमीसाठी वरदराजन यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिक मिळाले होते. पुढे २०१० मध्ये त्यांना 'द इंडियन एक्स्प्रेस'चा प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'रामनाथ गोएंका पुरस्कार' मिळाला होता. ते 'द हिंदू'मध्ये वरिष्ठ पदावर असतानाच २०१० मध्ये 'विकिलीक्स'ने अमेरिकी परराष्ट्र खात्याची गोपनीय कागदपत्रे खुली केली होती. त्या प्रक्रियेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक (अमेरिकेतील 'न्यूयॉर्क टाइम्स' आणि ब्रिटनमधील 'द गार्डियन'सारखी) प्रतिष्ठित वृत्तपत्रे सहभागी झाली होती. भारतातून 'द हिंदू'चा आणि त्यातही वरदराजन यांचा त्यात सक्रिय सहभाग होता.

'द हिंदू'मध्ये सात वर्षे राहिल्यानंतर २०११ मध्ये वरदराजन त्या दैनिकाचे मुख्य संपादक झाले. 'द हिंदू' या दैनिकाची अशी परंपरा होती की, ते वर्तमानपत्र चालवणाऱ्या कुटुंबातील व्यक्तीच कायम संपादकपदी असे. ती परंपरा १४० वर्षांत फक्त एकदा मोडली गेली आणि वरदराजन संपादक झाले. म्हणजे १९९४-९५ मध्ये पत्रकारितेला सुरुवात करून १७ वर्षांच्या काळात ते एका प्रभावी राष्ट्रीय (आणि इंग्रजी) दैनिकाचे मुख्य संपादक झाले. २०११ ते २०१३ अशी अडीच वर्षे ते संपादक होते. त्यानंतर 'द हिंदू'च्या व्यवस्थापनाने पुन्हा कुटुंबातील व्यक्तीच संपादक बनवण्याचा निर्णय घेतल्याने वरदराजन राजीनामा देऊन बाहेर पडले.

त्यांच्या संपादकपदाच्या काळात 'द हिंदू'ने आंतरराष्ट्रीय बातम्यांसाठी भारतातून फारसे लक्ष दिले न जाणाऱ्या इथिओपिया, इंडोनेशिया आणि ब्राझील अशा देशांमध्ये थेट वार्ताहर नेमले होते. तसेच त्यांनी दक्षिण आशियातील शेजारी देशांकडे अधिक लक्ष द्यायला सुरुवात केली होती. अर्थकारण आणि संपादकीय विभाग यांनी आपापली स्वायत्तता जपायला हवी, बातम्या आणि विश्लेषण यात फरक करायला हवा, असा त्यांचा आग्रह होता. 'द हिंदू'ने शोध पत्रकारितेवर भर द्यावा, असाही त्यांचा प्रयत्न होता. अर्थात, संपादकीय पदावरून तडकाफडकी बाजूला व्हावे लागल्याने हे सर्व काम अपुरेच राहिले.

एकविसाव्या शतकात भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणाची दिशा काय असावी याची चर्चा करणारा निवडक तज्ज्ञांचा एक अभ्यास गट २०१० ते २०१२ या काळात तयार झाला होता. यामध्ये श्याम सरण, प्रताप भानू मेहता, श्रीनाथ राघवन आदींचा समावेश होता. शिवशंकर मेनन आणि नंदन नीलेकणीही त्यात सहभागी होते. या अभ्यासगटात वरदराजन होते. अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयत्न होता. त्यांच्या चर्चेतून तयार झालेले 'नॉन अलाईनमेंट २.०' हे डॉक्युमेंट हे परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासकांनी आवर्जून वाचावे इतके मूलभूत आहे.

'द हिंदू'तून बाहेर पडल्यानंतर दीड वर्षाने वरदराजन आणि त्यांच्या इतर काही सहकाऱ्यांनी मे २०१५ मध्ये 'द वायर' हे वेब-पोर्टल सुरू केले. गेल्या अडीच वर्षांत 'द वायर'ने ऑनलाईन जगतात स्वतःची स्वतंत्र अशी ओळख निर्माण केली आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय बातम्या, विश्लेषक लेख व चर्चा आणि शोध पत्रकारिता यांच्यावर 'द वायर'चा भर आहे. वरदराजन हेच 'द वायर'चा चेहरा आहेत. 'द वायर' आणि वरदराजन यांच्याबाबत एक वर्ग अतिशय कडवा टीकाकार आहे. मात्र एक वेगळा वर्ग त्यांच्याकडे आकर्षितदेखील झालेला आहे.

अशा या वरदराजन यांना लहानपणी राजदूत व्हायची इच्छा होती, मात्र ते संपादक झाले. पीएचडीसाठी अर्थशास्त्राचा अभ्यास करूनसुद्धा त्यांची ओळख राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय राजकारणावरील वार्तांकनासाठी होते. अभ्यासकाचा पिंड असूनही ते पत्रकारितेत आले. संपादक होऊनसुद्धा ते आजही त्यांच्या लेखनासाठी नव्हे तर सामाजिक-राजकीय भूमिकेसाठी प्रसिद्ध आहेत. त्यामुळे देशात प्रस्थापित शक्ती आणि सरकार यांच्या विरोधात ठाम भूमिका घेऊन लढत राहणाऱ्या लोकांमध्ये वरदराजन यांचा समावेश होतो. आपली भूमिका न सोडता प्रस्थापितांना अंगावर घेण्यासाठी धैर्य लागते. सौम्य व्यक्तिमत्त्वाचे वरदराजन आज तेच काम करत आहेत. त्यामुळेच महाराष्ट्र फाउंडेशनच्या मागील वर्षीच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून 'इतिहासकार' रामचंद्र गुहा यांना बोलावल्यानंतर या वर्षी 'संपादक' सिद्धार्थ वरदराजन यांचे येणे खूपच सयुक्तिक ठरते.

संकल्प गुर्जर, नवी दिल्ली
sankalp.gurjar@gmail.com

४ फेब्रुवारी

संकल्पना : डॉ. सुरेश तलाठी

संयोजक :
महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका), मुक्तांगण मित्र आणि
साधना साप्ताहिक

तीन प्रशासकीय अधिकाऱ्यांची मुलाखत

संवादक : निखिल वागळे





मनीषा म्हैसकर (IAS)



ज्ञानेश्वर मुळे (IFS)



महेश भागवत (IPS)

दि. ४ फेब्रुवारी २०१८, पुणे
स्थळ आणि वेळ पुढील अंकात



Date of Publication - 13-01-2018

चैतन्याची फुलवा झाडे,
द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला,
ज्यांना आधाराचा हात हवा

– दिलीप वि. चित्रे

महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका)



▶ 'महाराष्ट्र फाउंडेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली ३९ वर्षे करीत आहे.
आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउंडेशन'या संस्थेद्वारे होत असते.

▶ 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने भारतातील सातशेपन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजराथमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे.

▶ 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने स्त्रियांचे सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. या व्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दु:खद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

▶ 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही हाती घेतले. तर 'समाज परिवर्तनासाठी माहिती-तंत्रज्ञान' हा 'फाउंडेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. 'एक गाव - एक संगणक' हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.


▶ अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउंडेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे : (१) मानवी अपव्यापाराचे नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्याव्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४० टक्के प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचे आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणे व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली/स्त्रियांचे पुनर्वसन करणे या हेतूने हा प्रकल्प योजला आहे. (२) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्थे'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही सुरू केला आहे. (३) निराधार महिला पुनर्वसन/ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसोबत राहून त्यांना साथ देणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.


▶ 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या समाज-परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने १९९६ साली समाजकार्य पुरस्कार योजना सुरू केली.
समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ने १९९४ साली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' सुरू केली आहे.

▶ विशेष अभिमानाची बाब म्हणजे, या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउंडेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउंडेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.
Invest in future of those with no future... So they can reinvest हे 'महाराष्ट्र फाउंडेशन'चे घोषवाक्य आहे.

साधना साप्ताहिक :
२० जानेवारी २०१८

एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ / पोस्टल रजि.क्र. पी.सी.डब्ल्यू./०८०/२०१८–२०२०
Posted at PUNE PSO / Every Thursday, Date of Posting : 13-01-2018 / Date of Publication : 13-01-2018





महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) पुरस्कार २०१७

